• पुणे, शनिवार, १७ मे २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 168 • वर्ष ४ थे, अंक १६८ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



महापालिकेकडून ठेकेदाराची 'पाठराखण'...! P3



१२ शौर्या, सैफची सुवर्ण धाव, स्वानंदीला रौप्य



**जेजुरीगडावर मुसळधार**
जेजुरी गडावर आज शुक्रवारी मुसळधार पाऊस कोसळला. गडावर पसरलेल्या भंडाऱ्यावर पडलेल्या पाण्यामुळे शेवटच्या पायरीपर्यंत अशा ' पिवळसर कोसळधारा' वाहत असल्याचे विलोभनीय दृश्य भाविकांनी पाहिले.
**छायाचित्र:** विजयकुमार हरिश्चंद्रे

# कोट्यवधींचा 'महागफला'

## भविष्य निर्वाह निधीत अधिकारी; ठेकेदारांचा 'कंत्राटी घोळ' : पंचेचाळीस हजार कामगार घायकुतीला

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

■ नाना साळुंके

**पुणे :** वीजकंपन्यांच्या स्थापनेच्या आधीपासून कंत्राटी कामगारांचे आर्थिक शोषण करत असलेल्या तीनही वीजकंपन्यांचे ठेकेदार या कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीतही कोट्यवधी रुपयांचा 'महागफला' करत असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे, या कामगारांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली रक्कम दरमहा भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा करणे आवश्यक असतानाही गेल्या काही वर्षांपासून ती जमाच केली नसल्याचे दाहक वास्तव उजेडात आले आहे. त्याचा तीनही वीजकंपन्यातील तब्बल पंचेचाळीस हजार कंत्राटी कामगारांना त्याचा जबरदस्त फटका सहन करावा लागत असून हे कामगार अक्षरश: घायकुतीला आले आहेत.

विशेष म्हणजे वीजकंपन्यांचे अधिकारीच यासाठी या ठेकेदारांची पाठराखण करत असून त्यामाध्यमातून ठेकेदार आणि ठेकेदार कोट्य वधी रुपयांचा मलिदा लाटत आहेत. मात्र; याची इत्यंभूत माहिती असतानाही राज्य शासन आणि त्यावर देखरेख करणारी सरकारी यंत्रणा मूग गिळून गप्प आहे. त्यामुळे हे अधिकारी आणि ठेकेदारांना भ्रष्टाचारासाठी 'अतिरिक्त बळ' मिळत आहे.

तत्कालीन वीज मंडळ अस्तित्वात असताना उपलब्ध कामगार आणि प्रशासनावर येणारा प्रचंड ताण यामध्ये कमालीची तफावत निर्माण झाली होती, त्यातच कामगारांच्या भरतीवर न्यायालयाने निर्बंध घातले असल्याने कामगारांची भरती रखडली होती. त्यामुळे यंत्रणेतील बिघाड आणि त्या तुलनेत असलेली कामगारांची अपुरी संख्या याचा ताळमेळ बसविताना प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत होती. त्यामुळे हा ताण कमी करण्यासाठी कंत्राटी पद्धतीवर कामगारांची भरती करण्यात आली होती, त्यानंतर वीज मंडळाचे विभाजन होउन तीन कंपन्या अस्तित्वात आल्यानंतरही हे कंत्राटी कामगार कायम ठेवण्यात आले होते.

सध्याच्या परिस्थितीत राज्यात महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या तीन कंपन्या अस्तित्वात आहेत. या कंपन्यांमध्ये सध्या पंचेचाळीस हजार कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. या कामगारांना कामगार कायद्यानुसार वेतन देण्यात यावे, भविष्य निर्वाह निधी, आरोग्य » पान ७ वर





"कंत्राटी कामगारांचे आर्थिक शोषण होत असल्याची बाब यापूर्वी शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती, विशेष करुन असे प्रकार दुष्काळी भागात घडत असल्याने तेथील कंत्राटी कामगारांची अवस्था भयानक आहे. कंत्राटी कामगारांच्या वेतनात करण्यात आलेली वाढही या कामगारांपर्यंत पोचलेली नाही; त्यामुळे या कामगारांना त्याचा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे." **— निलेश खरात** प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ



"भविष्य निर्वाह निधीची रक्कम हडप करणे हा कायद्याने गुन्हा आहे, तरीही शासनाच्या अखत्यारीतील कंपन्यांमध्येच ठेकेदार असा घोळ करत असले तर ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. त्यातूनच या कामगारांची आर्थिक पिळवणूक होत आहे; ही बाब लक्षात घेऊन शासनाने ही बाब अधिक गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे." **— योगेश घोरपडे देशमुख,** संस्थापक अध्यक्ष महाउर्जा इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन

# तुर्कीवर आणखी निर्बंध!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतातील व्यापार पेठेने बहुतांशी आता तुर्कस्तानच्या मालांवर उत्पादनावर बहिष्कार घातल्यानंतर आता भारत सरकार हवाई सेवा संदर्भामध्ये महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याच्या मार्गावर आहे कदाचित एअर इंडिया आणि इंडिगो सोबत तुर्कस्तान एअरलाइन्सचा करार देखील रद्द होऊ शकतो अशी शक्यता आहे.

भारत आणि पाकिस्तानमधील (सुरू असलेल्या तणावादरम्यान, तुर्कीने उघडपणे पाकिस्तानला पाठिंबा दिला. तुर्कीने शेकडो ड्रोन आणि लष्करी कर्मचारी पाठवून पाकिस्तानला तांत्रिक आणि धोरणात्मक मदत केली. त्यामुळे पाकिस्तानसोबतच आता तुर्कीस्तानविरोधात देखील भारतात संताप आहे. त्यामुळे तुर्कीविरोधात भारताने आक्रमक पाऊलं देखील उचलण्यास सुरुवात केली आहे.



भारतात तुर्कस्तानी एअरलाइन्सवरही गंडांतर येण्याची शक्यता आहे. विमानतळावर ग्राउंड सपोर्ट देणाऱ्या कंपनीसोबतचे भारतातील करार रद्द करण्यात आले होते. त्यानंतर आता तुर्कस्तानी एअरलाइन्सदेखील संकटात सापडण्याची शक्यता आहे. भारतीय भागीदारांसोबतच्या करारांची चिकित्सा, पुनरावलोकन सुरू आहे. भारत सरकार पाकला पाठिंबा देणाऱ्या तुर्कस्तानचा फास आवळणार असल्याचे चिन्ह दिसत आहे. एअर इंडिया आणि इंडिगोला तुर्कीच्या विमान कंपन्यांसोबतची भागीदारी तोडायला सांगण्याची शक्यता आहे.

### तुर्की सफरचंद बॉयकॉट-

• तुर्कीचे सफरचंद खरेदी न करण्याचा निर्णय घेतला पुण्यातील व्यापारांनी घेतला आहे. तुर्की सफरचंद बॉयकॉट करणाऱ्या पुण्यातील व्यापाऱ्याला आता थेट पाकिस्तानातून धमकीचे फोन येऊ लागलेत. पाकड्यांच्या या पोकळ धमक्यांचा निषेध म्हणून व्यापाऱ्यांनी तुर्की सफरचंद रस्त्यावर फोडून टाकलीत आणि पाकिस्तान तुर्कस्तान मुर्दाबाद च्या घोषणा दिल्यात.

# वानखेडेवर शरद पवार नावाचे स्टॅन्ड

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उधळली स्तुतीसुमने



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ऐतिहासिक वानखेडे स्टेडियम वरती आज शरद पवार यांच्या नावाचे स्टॅन्ड ( गॅलरी ) उभी करण्यात आली. त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. या निमित्ताने फडणवीस यांनी शरद पवार यांच्या क्रिकेटमधील योगदानाबद्दल स्तुतीसुमने उधळली. शुक्रवारी भारतीय क्रिकेट ज्या स्तरावर आहेत त्याचे श्रेय शरद पवार यांनाच द्यावे लागेल असे फडणवीस यावेळी म्हणाले.

मुंबईतील वानखेडे मैदानावर एमसीएच्यावतीने आयोजित कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा आणि आयसीसीचे माजी अध्यक्ष शरद पवार यांचं तोंड भरुन कौतुक केले. फडणवीसांनी आपल्या भाषणात शरद पवार , रोहित शर्मा यांचे क्रिकेटमधील योगदान सांगत स्तुतीसुमने उधळली. तर, दिवंगत अमोल काळे » पान ७ वर

"**देर आए, दुरुस्त आए :** टीम इंडियाचे माजी कॅप्टन अजित वाडेकर यांचंही नाव वानखेडे स्टेडियमवरील स्टँडला देण्यात आलं. हा निर्णय घेण्यास उशीर झाला अशी खंत अजित वाडेकर यांच्या पत्नींनी व्यक्त केली. तो धागा पकडत मुख्यमंत्र्यांनी यावेळी देर आए, दुरुस्त आए, अशी भावना बोलून दाखवली. अजित वाडेकर यांनी 1971 मध्ये ज्यांनी आपल्याला परदेशात जिंकण्याची भेट दिली. वेस्ट इंडिज आणि इंग्लंड या दोन सीरिज जिंकल्या. भारतीय क्रिकेटमध्ये त्यांचं मोठं योगदान आहे. वहिनी (अजित वाडेकर यांच्या पत्नी) म्हणाल्या की उशीर झाला. पण, मी म्हणेल 'देर आए, दुरुस्त आए' त्यांचं नाव उशीरा आलं असलं तरी प्रत्येक फॅन्सच्या ऱ्हदयात कोरलेलं आहे. ते आज एमसीएच्या स्टँडवर जात आहे. ही आनंदाची बाब आहे."
**— मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

# माजी एअर मार्शलने केला पाकिस्तानचा पर्दाफाश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लाहोर :** भारताने केलेल्या सिंदूर ऑपरेशन मध्ये पाकिस्तानचे प्रचंड नुकसान झाले असून नऊ अड्डे उध्वस्त झालेत परंतु महत्त्वपूर्ण असलेला भोलारी हवाई तळ उद्ध्वस्त झाला आहे. असा खुलासा पाकिस्तानचेच माझे एअरमार्शल मसूद अख्तर यांनी केला त्यामुळे पाकिस्तान पुन्हा एकदा तोंडावर आपटला आहे.

पाकिस्तानचे माजी एअर मार्शल मसूद अख्तर म्हणाले, "मी काही लोकांशी बोललो होतो. हे 10 मे रोजी सकाळी घडले. त्यावर जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे चार ब्रह्मोस क्षेपणास्त्रे डागण्यात आली. यानंतर येथे सर्वप्रथम आमचे वैमानिक धावले आणि ती जहाजे » पान ७ वर

### पाकिस्तान चे झालेले नुकसान

- 02 जेएफ-17 (JF-17) (एक लढाईत आणि एक शाहबाज एअरबेस, जेकोबाबाद येथे उड्डाण करण्याच्या तयारीत असताना ज्यामध्ये स्क्वॉड्रन लीडर उस्मान युसूफसह एकूण 05 हवाई योद्धे शहीद झाले.)
- 1 मिराज फायटर जेट
- 1 एरीआए अवाक्स (AWACS) विमान ज्याबद्दल पाकिस्तानी हवाई दलाच्या माजी एअर मार्शलने खुलासा केला होता
- 01 इतर विमान (कदाचित सी-130 लष्करी वाहतूक विमान. (त्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे)




# महायुतीच्या वाटेवर 'निवडून येण्याच्या निकषाचे' काटे

### मान्सूनपूर्व कामांचा; मोहोळ यांच्याकडून आढावा

आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर मोहोळ यांनी केल्या जाणाऱ्या कामाचा आढावा महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांच्यासह विविध विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत घेतला. यावेळी आमदार भीमराव तापकीर, आमदार हेमंत रासने, भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे, गणेश बिडकर, श्रीनाथ भिमाले यांच्यासह माजी नगरसेवक उपस्थित होते.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागताच या निवडणुका भाजपा , राष्ट्रवादी आणि शिवसेना शिंदे गट यांनी एकत्रित लढवण्याबाबतचा विचार विनिमय सुरू झाला. परंतु आज केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री ना. मुरलीधर मोहोळ यांनी या निवडणुका महायुतीच्या माध्यमातूनच लढविण्याचे वक्तव्य केले असले तरी 'निवडून येण्याचा निकष' महत्त्वपूर्ण आहे , याचेही सुतवाच केले . त्यामुळे महायुतीच्या वाटेवरती त्या त्या प्रभागातील निवडून येण्याचा निकष आता उमेदवारांना पार पाडावा लागणार आहे .या निकषांमध्ये जे बसतील तेच उमेदवार निश्चित केले जातील.

मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी आज मोहोळ यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेतली त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

या बैठकीनंतर बोलताना मोहोळ यांनी सांगितले की, मागील काही वर्षात शहरात कमी वेळात अधिक पाऊस पडण्याचा नवीन ट्रेंड दिसून येत असून या पार्श्वभूमीवर पूरस्थिती टाळण्यासाठी महापालिका प्रशासनाला निर्देश दिले असून कामे वेगाने आणि दर्जेदार करावीत, असे निर्देश महापालिका प्रशासनाला देत मान्सूनपूर्व कामासाठी » पान ७ वर



**पुणे:** अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना ना. मुरलीधर मोहोळ, सोबत शहराध्यक्ष धीरज घाटे, आयुक्त राजेंद्र भोसले

"पुण्यात आधी ११७ क्रॉनिक स्पॉट होते. त्यानंतर २२ गावे समाविष्ट झाल्यावर आता ही संख्या २०१ वर पोहोचली आहे. त्यापैकी ११७ स्पॉटचे काम पूर्ण झाले आहे. त्याजागी नालेसफाई झाली असून उर्वरित ८४ जागांवर काम सुरू आहे. ती कामे पावसाळापूर्व पूर्ण होतील. इतर जे ३९ स्पॉट कामे यंदा पूर्ण होऊ शकणार नाही, त्याठिकाणी तात्पुरते उपाययोजना करण्यात येत आहे. नागरिकांचे हाल होऊ नये, याची दखल प्रशासनाने घ्यावी अशी सूचना मनपाला दिल्या आहे."
**— मुरलीधर मोहोळ**



## बाणेरमध्ये दोन मसाज पार्लरवर छापा


**पुणे :** बाणेर भागात मसाज पार्लरमध्ये सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा प्रकार पोलिसांनी उघडकीस आणला. दोन मसाज पार्लरवर छापा टाकून पार्लरमालकांसह इतरांवर गुन्हे दाखल केले आहेत. बाणेर भागातील '२४ थाई स्पा' या मसाज पार्लरमध्ये सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा प्रकार पोलिसांनी उघडकीस आणला. या मसाज पार्लरमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या माध्यमातून खातरजमा केली. त्यानंतर पोलिसांनी छापा टाकून मसाज पार्लर चालक ज्योतीदेवी देवनारायण घोष (वय ३८, रा. गहुंजे), अमनगिरी गोस्वामी (वय २३, रा. मुकाई चौक, रावेत) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. घोष आणि गोस्वामी यांना अटक करण्यात आली आहे. बालेवाडी फाटा भागात 'वेदा स्पा'मध्ये मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी छापा टाकून मसाज पार्लरचा व्यवस्थापक मोहीमुद्दीन अहमद अली (वय २२), तसेच मसाज पार्लर चालविणारी महिला आणि जागा मालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. याप्रकरणी अनैतिक मानवी व्यापार वाहतूक प्रतिबंधक कायद्यान्वये (पिटा) गुन्हा दाखल करण्यात आला असून, मसाज पार्लरचा व्यवस्थापक मोहीमुद्दीन अली याला अटक केल्याची माहिती बाणेर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांनी दिली.

## महिलेच्या घरात घुसून केली शिवीगाळ व छेडछाड

**पुणे :** घरी एकटी असलेल्या महिलेच्या घरात घुसून शिवीगाळ, दमदाटी व छेडछाड करून किस घेतल्याची घटना घडली आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील कवडी पाट परिसरात घडली आहे. लोणी काळभोर पोलीस ठाण्यात एकाच्या विरोधात विनयभंगासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणेश पंडीत पांडे (वय ३५, रा दिघी पुणे) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी कदमवाकवस्ती येथील ३६ वर्षीय महिलेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या गृहिणी असून त्या कुटुंबासोबत कवडी पाट टोलनाका परिसरात राहतात. मंगळवारी फिर्यादी या एकट्या घरी होत्या. तेव्हा गणेश पांडे याने फिर्यादी यांच्या मोबाईलवर ६६ मिसकॉल दिले. तसेच त्यांच्या पतीलाही फोन करून वारंवार त्रास दिला. दरम्यान, पांडे हा फिर्यादी यांच्या घराजवळ आला. त्याने घराचा दरवाजा वाजवुन गोंधळ केला. तेव्हा फिर्यादी यांनी घराचा दारवाजा उघडला. दरवाजा उघडल्यानंतर त्याने फिर्यादी यांना मिठी मारून किस घेतला. पांडे याने फिर्यादी यांच्या स्त्रीमनास लज्जा उत्पन्न हाईल असे कृत्य केले. तसेच फिर्यादी यांनी शिवीगाळ करुन दमदाटी केली.पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के करत आहेत.

## 'दळवी समजून घेताना' कार्यक्रमाचे आयोजन

**पुणे :** प्रख्यात नाटककार जयवंत दळवी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त, त्यांच्या साहित्याचा वेध



घेणाऱ्या 'दळवी समजून घेताना' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन येत्या शनिवार दि. १७ व रविवार दि. १८ मे रोजी करण्यात आले आहे. पुण्यातील बेलवलकर सांस्कृतिक मंच आणि संभाषा फाऊंडेशन यांच्या वतीने सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून या अंतर्गत होणारे सर्व कार्यक्रम हे विधी महाविद्यालय रस्त्यावरील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय येथे संपन्न होतील. कार्यक्रमाकरीता प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर विनामूल्य प्रवेश देण्यात येणार असून काही जागा या निमंत्रितांसाठी राखीव असतील. आशय फिल्म क्लब यांच्या विशेष सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि. १७ मे रोजी सकाळी १०.३० वाजता एनएफएआय या ठिकाणी 'पुढचं पाऊल' या चित्रपटाचे प्रदर्शन होईल.रविवार दि. १८ मे रोजी सकाळी १०.३० वाजता 'चतुरस्त्र प्रतिभेचा असामी - जयवंत दळवी' हा विशेष दृकश्राव्य कार्यक्रम संपन्न होईल. जयवंत दळवी यांच्या व्यक्तीमत्त्वाची ओळख उपस्थितांना करून देणाऱ्या या कार्यक्रमात रेखा इनामदार, प्रसाद ओक, शरद पोंक्षे, दिलीप प्रभावळकर, विजया मेहेता व कै. विक्रम गोखले यांचा दृक श्राव्य सहभाग असेल.यानंतर 'सारे प्रवासी घडीचे' आणि 'जेव्हा कुणाचा काका वारतो' यांचे अभिवाचन अभिनेते संजय मोने करतील. यानंतर १८ मे, रोजी सायं ५:०० वा. 'बॅरिस्टर' या नाटकाचे स्क्रिनिंग होईल.

## पालिका आरोग्य विभागात रिक्त पदांसाठीही भरती

**पुणे :** पुणे महापालिकेत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानामार्फत भरती करण्यात येणार आहे. विविध पदांसाठी ही भरती असणार आहे. पीपीएम को-ऑर्डिनेटर, वरिष्ठ वैद्यकीय सुपरवायझर, टीबी हेल्थ व्हिजिटर पदांसाठी भरती जाहीर करण्यात आली आहे. एकूण १० रिक्त पदांसाठी ही भरती जाहीर करण्यात आली आहे. पीपीएम को-ऑर्डिनेर पदासाठी पोस्ट ग्रॅज्युएशन असणे अपेक्षित आहे. याचसोबत हेल्थ प्रोजेक्टसवर १ वर्ष काम करण्याचा अनुभव असावा. सिनिअर ट्रीटमेंट सुपरवायझर पदासाठी बॅचरल डिग्री प्राप्त केलेली असावी किंवा सॅनिटरी इन्स्पेक्टर कोर्स केलेला असावा. टीबी हेल्थ व्हिजिटर पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवार हा विज्ञान शाखेतून पदवीधर असावा. याचसोबत त्याला कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. या नोकरीसाठी ऑफलाइन अर्ज दाखल करायचे आहेत. याबाबत सविस्तर माहिती https://www.pmc.gov.in/या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

## चर्चा 'हवा पाण्याची'...!



**पुणे** महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वतीने स्वच्छ हवा कार्यक्रमाच्या अंतर्गत 'टॉवर्डस क्लिन एअर इन पुणे' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि अन्य पर्यावरण तज्ञांनी उपस्थित राहून पर्यावरणाची माहिती घेतली.

## स्वच्छ हवा कार्यक्रमातंर्गत कार्यशाळा संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वतीने स्वच्छ हवा कार्यक्रमाच्या अंतर्गत 'टॉवर्डस क्लिन एअर इन पुणे' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि अन्य पर्यावरण तज्ञांनी उपस्थित राहून पर्यावरणाची माहिती घेतली.

महापालिकेचे पर्यावरण अधिकारी मंगेश दिघे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अमर देसाई, परिसर संस्थेचे रणजित गाडगीळ आदींनी यावेळी मार्गदर्शन केले. पुणे शहरात वाहतूक, बांधकाम, घनकचरा आदी स्रोतांमधून निघणारी हवा प्रदूषके आणि त्यास कमी करण्याच्या उपाययोजना यासंदर्भात कार्यशाळेत चर्चा करण्यात आली. या कार्यशाळेला आरोग्य निरीक्षक, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक, वॉर्ड मेडिकल ऑफिसर, विद्युत विभाग, पथ विभाग, आरोग्य विभाग, घनकचरा व्यवस्थापन, महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळ,प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाहतूक पोलीस आदी विभागातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# 'कासवगती' सव्वादोनशे कोटींची...!

### पुणे- लोणावळा मार्गिकेचा खर्च वाढला: खर्च वाढूनही लोकल 'यार्डात'च

गेल्या काही वर्षांपासून बहुप्रतिक्षित आणि बहुचर्चित असलेल्या पुणे ते लोणावळा दरम्यानच्या तिसरी आणि चौथ्या मार्गिकेचे काम अद्याप सुरु होउ शकलेले नाही; धक्कादायक बाब म्हणजे रेल्वे प्रशासनाच्या 'संथ' कारभारामुळे या कामाला अद्याप गती मिळालेली नाही. त्यामुळे पुणे ते लोणावळा दरम्यान दररोज प्रवास करत असलेल्या हजारो प्रवाशांच्या हक्कावर गदा आली आहे, परिणामी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची प्रवाशांनी आशाच सोडून दिली होती. विशेष म्हणजे या प्रकल्पाचा आराखडा तब्बल पाच वर्षांपूर्वी तयार असूनही त्याबाबत प्रशासनाने कोणत्याही हालचाली केलेल्या नाहीत, परिणामी या प्रकल्पाचा खर्च तब्बल सव्वादोनशे कोटींनी वाढला असून त्यासाठी प्रशासन हा खर्च वसूल करण्यासाठी प्रवाशांचाच खिसा कापणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र; प्रवाशांची नाराजी दूर करण्यासाठी प्रशासनाने पुन्हा शक्कल लढविली असून त्यासाठी पुन्हा 'गाजर' दाखविण्यात येत आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एमआरव्हीसी म्हणजे मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडे या प्रकल्पाची जबाबदारी देण्यात आली आहे. यानुसार एमआरव्हीसीकडून पुणे-लोणावळादरम्यान तिसऱ्या व चौथ्या मार्गिकेचा पहिला डीपीआर म्हणजे सविस्तर प्रकल्प अहवाल पाच वर्षांपूर्वी तयार करण्यात आला होता.

पाच वर्षांपूर्वीच हा अहवाल सादर पण करण्यात आला. या प्रकल्पाचा पहिला डीपीआर सादर झाल्यानंतर सुधारित अहवालही राज्य सरकारला देण्यात आला. दरम्यान, गेल्या वर्षी एमआरव्हीसीने राज्य सरकारला अद्ययावत 'डीपीआर' सुद्धा दिला होता. तरीही प्रत्यक्षात त्याचे काम सुरु करण्यात आलेले नाही, त्यामुळे या मार्गावर दररोज प्रवास करत असलेल्या प्रवाशांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. पुणे ते लोणावळा दरम्यान तिसरी व चौथी रेल्वे लाईन टाकली जाणार आहे.

दरम्यान याच तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गिकेबाबत आता एक महत्त्वाचे अपडेट समोर आले आहे. या प्रकल्पाला कधीपर्यंत मंजुरी मिळणार यासंदर्भात एक नवीन माहिती हाती आली आहे.

मात्र अजून या प्रकल्पाला राज्य सरकारकडून मंजुरी मिळालेली नाही. यामुळे पुणे ते लोणावळा दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या माध्यमातून हा प्रकल्प बारगळला की काय असा प्रश्न उपस्थित होऊ लागला. मात्र आता या प्रकल्पाला गती मिळणार आहे.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पुणे-लोणावळादरम्यानच्या तिसऱ्या व चौथ्या मार्गिकेच्या प्रकल्पाबाबत नुकतीच अपडेट दिली. त्यांनी या प्रकल्पाचे काम लवकरात लवकर सुरू होईल असे सांगितले होते. दरम्यान केंद्रीय रेल्वेमंत्री यांच्या या विधानानंतर राजधानी मुंबईत या प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली. राज्य सरकारचे प्रतिनिधी आणि 'एमआरव्हीसी'च्या अधिकाऱ्यांची या प्रकल्पाच्या संदर्भात नुकतीच महत्त्वाची बैठक संपन्न झाली.

या बैठकीत या प्रकल्पाची कॅबिनेट नोट तयार झाली असल्याची माहिती देण्यात आली आणि येत्या आठवड्यात ही कॅबिनेट नोट कॅबिनेट समिती समोर मांडण्यात येईल आणि त्यानंतर शासन निर्णय जाहीर होईल असे सुद्धा सांगितले गेले होते. मात्र; हे वास्तव असतानाही प्रशासनाच्या वतीने आतापर्यंत कोणत्याही हालचाली सुरु करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे या प्रकल्पाला नेमका कधी मूहूर्त मिळणार असा सवाल आता प्रवासी करु लागले आहेत.

**असा होइल फायदा पण...!**

- लोकल आणि एक्सप्रेससाठी स्वतंत्र ट्रॅक
- आता पुन्हा पावसाळयानंतरचा मूहूर्त
- तरीही राज्य शासनाच्या मंजूरीची प्रतिक्षा
- सध्याची रेल्वे लाईन आहे ते फक्त लोकलसाठी वापरणार
- दोन्ही गाड्यांचे वेळापत्रक अधिक अचूक आणि जलद होईल.
- क्रॉसिंगसाठी थांबावे लागणार नाही
- वेळ वाचेल आणि प्रवास सुखकर होईल
- या प्रकल्पामुळे पुणे ते लोणावळा हा प्रवास सुपरफास्ट होणार



## 'लाडक्या बहिणींनी 'रुट' बदलला...!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एसटीची प्रवासी संख्या वाढविण्यासाठी राज्य सरकारकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. याअंतर्गत महिलांना एसटीतून प्रवास करण्यासाठी तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्यात आली होती. या महिला सन्मान योजनेला महिलांकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे. मात्र, जानेवारी महिन्यात तिकीट दरात वाढ करण्यात आले. त्यानंतर प्रवासी संख्येत घट होत असल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे.

राज्य सरकारकडून महिलांनामहाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवासासाठी तिकीट दरात ५० टक्के सवलत दिल्याने एसटीतून प्रवास करणाऱ्या महिलांच्या संख्येत गेल्यावर्षी वाढ झाली होती; परंतु जानेवारी २०२५ मध्ये तिकीट दरात वाढ केल्याने एसटी प्रवास करणाऱ्या महिलांच्या संख्येत लाखाने कमी झाली असून, उत्पन्न मात्र वाढले आहे.

पुणे विभागात जानेवारी ते एप्रिल २०२५ या चार महिन्यांत ७९ लाख ३ हजार महिलांनी प्रवास केला असून, ३८ कोटी ३० लाख २८ हजार ६९५ इतके उत्पन्न मिळाले आहे.

पुणे विभागात जानेवारी ते एप्रिल २०२४ या चार महिन्यात पुणे विभागात ८५ लाख ५७ हजार ९०३ महिलांनी प्रवास केला होता. त्यातून ३७ कोटी ६५ लाख दोन हजार इतके उत्पन्न मिळाले होते. तर २०२५ मध्ये या चार महिन्यांत ७९ लाख ३ हजार महिलांनी प्रवास केला असून, ३८ कोटी ३० लाख २८ हजार ६९५ इतके उत्पन्न मिळाले आहे. या महिन्यात जवळपास सात लाखांपेक्षा जास्त महिला प्रवासी संख्या घटले असून, उत्पन्न मात्र कोटीने वाढले आहे.

## नाट्य, कवितांतून विद्यार्थ्यांनी अनुभवली बुद्धांची शिकवण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या बावधन कॅम्पसमध्ये बुद्ध पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत मोठ्या उत्साहात बुद्ध पौर्णिमा साजरी केली. बुद्धांच्या शिकवणीतून विद्यार्थ्यांमध्ये प्रज्ञा, नैतिकता, चारित्र्य आणि एकाग्रतेचा विकास करण्याच्या उद्देशाने हे कार्यक्रम घेण्यात आले. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व उपाध्यक्षा सुषमा संजय चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

सायली हरिदास यांनी स्वागतपर भाषणात कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका मांडली. बारावी कॉमर्समधील विद्यार्थी दक्ष काहत याने बुद्ध पौर्णिमा साजरी करण्याचे महत्व, तसेच बुद्धांच्या विचारांची आजच्या काळात कशी गरज आहे, हे आपल्या मनोगतातून सांगितले. राजपुत्र ते संत असा भगवान बुद्धांचा जीवनप्रवास बारावीतील विद्यार्थिनी सान्वी मट्टीगट्टी हिने उलगडली. वेदिका बंड हिने हृदयस्पर्शी कविता सादर करीत युद्धांमुळे होणाऱ्या परिणामांवर आणि आज जगात सुरु असलेल्या युद्धजन्य परिस्थितीवर भाष्य केले.



**पुणे** सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या बावधन कॅम्पसमध्ये बुद्ध पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत मोठ्या उत्साहात बुद्ध पौर्णिमा साजरी केली.

# आगामी निवडणुकांसाठी शिबीरांची आवश्यकता : आडसूळ




**पुणे :** पायात चप्पल घालण्यासाठी पैसे नव्हते पण व्यक्ती कर्तृत्ववान होती म्हणून शिवसेनाप्रमुखांनी आपल्या हयातीत अनेक निष्ठावंत शिवसैनिकांना आमदार, खासदार,मंत्री केल्याची अनेक उदाहरणे माझ्याकडे आहेत. शिवसेनाप्रमुखांचा हाच वारसा सध्या आपले नेते एकनाथ शिंदे चालवत आहेत.असे मत शिवसेना नेते माजी खासदार आनंदराव आडसूळ यांनी व्यक्त करित ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना अप्रत्यक्षपणे टोला लगावला. तसेच उपसभापती डॉ नीलमताई गोऱ्हे यांनी आयोजित केलेल्या शिबिराचा आगामी निवडणुकीत चांगला फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिवसेना नेत्या आणि उपसभापती डॉ नीलम ताई गोऱ्हे यांच्या माध्यमांतून शिवसेना जिल्हा पदाधिकारी क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन आज पुणे येथे करण्यात आले होते. इरफान सय्यद, ममता शिवतारे लांडे, किरण साळी आदी पुणे जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

आपत्ती व युद्धजन्य परिस्थितीतील कार्यपद्धती,प्रभावी संवाद कौशल्य व नेतृत्वगुण,सायबर सुरक्षेबाबत जनजागृती, सोशल मीडियाचा संघटनात्मक वापर, तणावमुक्त मन आणि मानसिक आरोग्य, महिलांचे आरोग्य आणि सुरक्षा,पक्षाची आर्थिक शिस्त व नियोजन या विषयावर विविध मान्यवरांनी उपस्थित शिवसैनिकांना मार्गदर्शन केले. यावेळी आनंदराव आडसूळ म्हणाले,एकनाथ शिंदे यांनी पैसेवाल्यांपेक्षा कतृर्त्ववान शिवसैनिकांचा सन्मान केला आहे. येणाऱ्या निवडणुकांमध्येही हाच न्याय निष्ठावंत शिवसैनिकांना मिळेल.आगामी निवडणुका लक्षात घेऊन इच्छुकांनी आपल्या पक्षाचे विचार तळागळात पोहचविण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.



विधानसभा निवडणुकीत महायुती सत्तेत आली आहे.पण या विजयामध्ये शिवसेनेचा सिंहाचा वाटा आहे.हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे. युती झाली तर आनंदाच आहे.परंतु युती झाली नाही तर स्वतंत्र जायला लागले तर पाठीमागे वळून बघण्याची गरज नाही.त्यामुळे आपल्याला पाहिजे तेवढ्या जागा उपलब्ध होणार आहेत.

**— डॉ. नीलम गोऱ्हे,**
उपसभापती, विधानपरिषद

# महापालिका करतेय ठेकेदाराची 'पाठराखण'...!

## तीन किलोमीटर रस्त्याच्या रुंदीकरणासाठी दीड वर्षे : जुन्या मुंबई रस्त्याचा जीव गुदमरतोय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिका प्रशासनानाकडून मागील दीड वर्षांपासून जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील अंडी उबवणी केंद्रासमोरील चौक ते बोपोडी चौक या तीन किलोमीटर रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम केले जात आहे. जुन्या पुणे-मुंबई महामार्ग रुंदीकरणाचे काम पावसाळा तोंडावर आलेला असतानाही अद्याप पूर्ण झालेले नाही. एक किलोमीटर अंतरामध्ये पदपथ, दुभाजक, सेवारस्त्यांची कामे अजूनही संथ गतीने सुरू आहेत. अनेकदा मुदतवाढ दिल्यानंतरही संबंधित कामासाठी महापालिका प्रशासनाकडून आणखी मुदतवाढ दिली जाण्याची शक्यता आहे; त्यामुळे महापालिका प्रशासन या ठेकेदाराची पाठराखण करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या मालकीची जमीन, खडकी रेल्वे स्थानकासमोरील जयहिंद चित्रपटगृहाची जागा ताब्यात घेऊन बोपोडी चौक ते संविधान चौक दरम्यानच्या रस्त्याचे रुंदीकरण झाले आहे. मात्र संविधान चौक ते अंडी उबवणी केंद्र या दरम्यानच्या रस्त्याचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. संबंधित ठेकेदाराला मार्च अखेरपर्यंत काम पूर्ण करण्यास सांगण्यात आले होते. मात्र अद्यापही काम अपूर्णच आहे.

वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी वाहतूक पोलिसांकडून रस्त्याचे काम करण्यासाठी महापालिकेस वेळेची मर्यादा घालण्यात आली होती. मात्र या मर्यादेमुळे काम पूर्ण होण्यास अडथळा येईल, असे पत्र महापालिकेकडून वाहतूक पोलिसांना पाठविण्यात आले. त्यामध्ये एक ते दीड महिना काम करण्यास अडचण आली. तसेच हा परिसर लष्करी असल्याने युद्धजन्य परिस्थितीमुळे तेथे खोदाईची कामे तात्पुरत्या स्वरूपात थांबविण्याच्या सूचना लष्कराकडून दिल्या होत्या. या कारणांमुळे रस्त्याच्या कामाला विलंब होणार असल्याचा बचाव महापालिकेच्या पथविभागाकडून करण्यात आला आहे.



> संविधान चौक ते अंडी उबवणी केंद्रादरम्यानच्या कामाला पोलिसांकडून वेळेची मर्यादा घातली होती. तसेच युद्धजन्य परिस्थितीमुळेही काम करण्यास अडथळा आला होता. संबंधित काम मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.
>
> **-- मनोज गाठे,** उपअभियंता, पथ विभाग, पुणे महापालिका

### अशी आहे स्थिती

- - अंडी उबवणी केंद्रासमोरील चौक ते संविधान चौक या एक किलोमीटरच्या अंतरामधील रस्त्याच्याकडेला सीमाभिंत बांधून तयार
- - पावसाळी वाहिन्या, सेवा वाहिन्यांचीही कामे पूर्ण
- - सांडपाणी वाहिन्या टाकण्याचे काम प्रतिक्षेत
- - संविधान चौक ते टपाल कार्यालयापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पदपथ, सेवा रस्ता, पथदिवे, दुभाजकाची कामे अपूर्ण अवस्थेत
- - काम पूर्ण झालेल्या ठिकाणी राडारोडा, माती, सिमेंटचे ब्लॉक, चेंबरची झाकणे रस्त्याच्याकडेलाच पडलेली
- - या कामासाठी फिल्ड मार्शल करिअप्पा रस्ता ते टपाल कार्यालय यादरम्यान असणारा बसथांबा हटविला
- - प्रवाशांना अक्षरशः रस्त्यावर थांबण्याची वेळ



## श्री गणेश गीतेतील कर्मयोगावर प्रवचनमाला

**पुणे :** श्री गणेश नामाचा महिमा अद्वितीय आणि अगाध आहे. नाममहात्म्यानंतरचा पुढील टप्पा श्री गणेश गीतेतील कर्मयोग हा असून याविषयावरील प्रवचनमालेतून गणेशभक्तांसमोर कर्मयोग उलगडण्यात येणार आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने आयोजित प्रवचनमालेत यवतमाळ वणी येथील प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज हे निरुपण करणार असून प्रवचनमाला सर्वांसाठी विनामूल्य खुली आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली.



श्रीमंत थोरले बाजीराव रस्त्यावरील नू.म.वि.प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात दि. १८ ते २४ मे दररोज सायंकाळी ६.३० ते ८ यावेळेत ही प्रवचनमाला होणार आहे. भगवान गणेशांच्या सगुण साकार स्वरूप आणि विविध अवतारांच्या विस्मयकारी लीलांची गाथा म्हणजे श्री गणेश पुराण आहे. पुराणातील विविध कथांच्या आधारे, त्यातील कथनीय मूल्यांच्या आधारे, आपल्या जीवनाला सुंदर करण्याचा पुराण कथा श्रवण करणे हा राजमार्ग आहे. याद्वारे श्री गणेश नामाचा अद्वितीय महिमा गणेशभक्तांसमोर मागील प्रवचनमालेत उलगडण्यात आला होता.

## शेतीतील उद्योजकता विकास यावर विनामूल्य वेबिनार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कृषी क्षेत्रातील उद्योजकता आणि ॲग्री-बिझनेस कौशल्यावर आधारित विनामूल्य वेबिनार २४ मे रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत झूम प्लॅटफॉर्मवर आयोजिला आहे. कृषी व्यवसायातील सध्याच्या आणि भविष्यातील संधींवर आधारित विविध विषयांची चर्चा या वेळी होणार आहे. वेबिनारमध्ये शेती निर्यात आणि आयात, व्यवसाय संचालन, वित्त व्यवस्थापन, अन्न व कृषी स्टार्टअप्स, इंटरनेट ऑफ थिंग्स, ड्रोन, रोबोटिक्स, प्रिसिजन शेती यासारख्या तंत्रज्ञानांचा उपयोग, डिजिटल साधने, अन्न प्रक्रिया व पॅकेजिंग, मानव संसाधन व्यवस्थापन, ई-मार्केटप्लेस, डिजिटल मार्केटिंग आणि पुरवठा साखळी यावर सखोल मार्गदर्शन दिले जाणार आहे. तसेच उत्पादन मार्केट सर्व्हे, ब्रँडिंग, ग्राहक संबंध व्यवस्थापन, व्यवसाय नियम आणि अनुपालन यासारख्या महत्त्वाच्या बाबींवरही चर्चा होणार आहे. हा वेबिनार विद्यार्थी, उद्योजक, नोकरी शोधणारे आणि ॲग्री-टेकमध्ये रस असणारे यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.



## वरिष्ठ पोलीस निरीक्षकावर गुन्हा दाखल

**पुणे :** जमिनीच्या वादात आर्थिक फायद्यासाठी पदाचा गैरवापर केल्याप्रकरणी पुण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षकावर गुन्हा दाखल कऱण्यात आला आहे. वाघोलीत १० एकर जमीन प्रकरणात हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. चंदननगर पोलिस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र लांडगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लांडगे यांच्यासह चार जणांच्या विरुद्ध चंदननगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुण्यातील वाघोली येथील 10 एकर जमिन हडपण्याचे उद्देशाने संगनमत करून फौजदारीपात्र रचून स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता बनावट महिला उभी करून ती मूळ जमिनीची मालक असल्याच्या भासविण्यात आल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला आहे. पुण्यातील एका बड्या बांधकाम व्यवसायाशी देखील हे प्रकरण संबंधित असल्याचे बोलले जाते आहे. आनंद लालासाहेब भगत, शैलेश सदाशिव ठोंबरे, राजेंद्र लांडगे, अपर्णा यशपाल वर्मा अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. चंदननगर पोलिसांचे एक तपास पथक आता या गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करत आहे. या प्रकरणात वरीष्ठ पोलिसाचा संबंध आल्याने पुण्यात एकच खळबळ उडाली आहे. चंदननगर पोलिसांनी याप्रकरणी तपास पथक स्थापन केले असून, गुन्ह्याच्या मुळाशी जाण्यासाठी सखोल चौकशी सुरू आहे.

# आव्हान 'साफसफाई'चे...!

## नाल्यांच्या सफाईसाठी प्रशासनाची 'सफाईदार'उत्तरे

प्रत्येक पावसाळयात पुणेकरांची वाताहात करणे यात महापालिका प्रशासनाचा हातखंडा आहे; पावसाळा सुरु होण्याच्या आधीच काही दिवस नालेसफाईची कामे पूर्ण करा असे आदेश खुद्द राज्य शासनाने वारंवार दिले आहेत. परंतु हे वास्तव असतानाही महापालिका प्रशासन त्याकडे जाणुनबुजुन डोळेझाक करत आहे; गेल्या वर्षीही प्रशासनाने असाच हलगर्जीपणा केल्याने पुणेकरांचा संसार 'पाण्यात' गेला होता. त्यातूनच गोरगरीब पुणेकरांची कुटुंबे एक वर्षानंतरही सावरलेली नाहीत, विशेष म्हणजे हा धडा घेतला असतानाही प्रशासन यावर्षीही ताळयावर आलेले नाही. पावसाळा उंबरठ्यावर असतानाही नालेसफाईची किती कामे झाली याची 'सफाईदार'उत्तरे प्रशासनाकडून मिळत आहेत.

> शहरातील 'ईएसआर' (उन्नत पाण्याच्या टाक्या) आणि 'पावसाळी पूर्व कामे मुदतीत पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. महापालिका आणि समाविष्ट गावांमध्ये सुमारे २५ कोटी रुपयांचे कामे केली जात आहेत. त्यात १५ क्षेत्रीय कार्यालयामध्ये १३.४० कोटी रुपयांची तर समाविष्ट २३ गावांमध्ये सुमारे १२ कोटी रुपयांची कामे प्रत्यक्षात सुरु आहेत. काही कामे कोणत्याही परिस्थितीत ७ जूनपूर्वी पूर्ण केली जाणार आहेत.
>
> **- संतोष तांदळे,** अधीक्षक अभियंता, ड्रेनेज विभाग मनपा, पुणे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिका प्रशासनाने यंदाही पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांसाठी वेगवेगळ्या निविदा काढल्या आहेत. क्षेत्रीय कार्यालयामार्फत २३ निविदा काढण्यात आल्या. तर समाविष्ट २३ गावांसाठी आठ अशा एकूण ३१ निविदा काढण्यात आल्या आहेत. या निविदाही दरवर्षीप्रमाणे कमी दरानेच आलेल्या आहेत. ही मे अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवले आहे. महापालिका प्रशासनाने आत्तापर्यंत ८५. ७१ टक्के नालेसफाई झाल्याचा दावा केला आहे. ही कामे करण्यासाठी ७ जूनचे उद्दिष्ट ठेवले असून, ही कामे वेळेत पूर्ण करायचे आहे.

महापालिकेकडून दरवर्षी पावसाळ्यापूर्वी शहरातील ओढे, नाले, पावसाळी गटारे, चेंबर आदींची साफसफाई आणि राडारोडा उचलण्याची कामे केली जातात. तसेच रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी डांबरीकरण केले जाते. ही कामे दरवर्षी एप्रिलमध्ये सुरू करून पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले जाते. मात्र, लहान लहान पावसामुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरते, चेंबर तुंबतात, रस्त्यावर पाणी साचते. त्यामुळे पावसाळी कामे होण्यावर संशय व्यक्त केला जातो.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाकडून शहरातील नाले, पावसाळी लाईन, चेंबर दुरुस्ती व साफसफाईची कामे हाती घेतली असून नालेसफाईची ८५.७१ टक्के कामे पूर्ण झाल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

### महापालिका हद्दीत ६४७ किमी नाले

- - महापालिकेच्या जुन्या हद्दीत २३४ मुख्य व उपनाले आहेत.
- - समाविष्ट ११ गावांमध्ये १६४ मुख्य व उपनाले आहेत.
- - समाविष्ट २३ गावांमध्ये प्राथमिक सर्वेनुसार ४२ मुख्य व उपनाले आहेत.
- - यांवर ८० कल्व्हर्ट व १२ बंधारे आहेत.
- - पावसाळी गटारी - ३२५ किमी
- - चेंबरची संख्या - ५५,३००

# रस्ते खोदाल तर... याद राखा..

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्ते दुरुस्त करण्यासाठी महापालिकेने गुरुवारपासून महावितरण आणि एमएनजीएलला नवीन खोदाईसाठी बंदी घातली आहे. केवळ अत्यावश्यक आणि तातडीच्या दुरुस्तीच्या कामासाठीच खोदाई करता येणार आहे.अनधिकृतपणे खोदाई केल्याचे आढळल्यास कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी ही माहिती दिली. शहरात खासगी कंपन्या, महावितरण, एमएनजीएल तसेच महापालिकेच्या पाणीपुरवठा आणि ड्रेनेज विभागास खोदाईसाठी पथ विभागाकडून परवानगी दिली जाते. या परवानग्या ३१ मेपर्यंत दिल्या जातात. मात्र, या वर्षी रस्ते दुरुस्तीची कामे पावसाळ्यापूर्वीच दुरुस्त करण्यासाठी महावितरण आणि एमएनजीएल यांना पहिल्यांदाच १५ मेपर्यंत खोदाईसाठी परवानगी देण्यात आली होती.



या दोन्ही विभागानी सेवावाहिन्या टाकण्यात आल्यानंतर त्यांनी खोदाई केलेल्या ठिकाणी महापालिकेकडून रस्ते दुरुस्ती केली जाते. त्यामुळे, महापालिकेने १५ दिवस आधीच या दोन्ही विभागांच्या खोदाईस मनाई केली असून, पुढील १५ दिवसांत हे रस्ते महापालिकेकडून दुरुस्त केले जाणार आहेत. यासंबधीची नोटीस पथ विभागाकडून देण्यात आली आहे.

पोलिसांकडून शहरात १२०० ठिकाणी सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. या प्रकल्पाच्या कामास नुकतीच सुरुवात झाली आहे. या कामासाठी महापालिकेकडून केबल टाकण्यासाठी संबंधित ठेकेदारास परवानगी दिली आहे. ही मुदत ३१ मेपर्यंत असणार आहे.

या शिवाय, महापालिकेच्या समान पाणी योजनेचे काम, पालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षासाठी ओएफसी केबल टाकण्याचे कामही सुरू असून या तीन्ही विभागांना ३१ मे ही अंतिम मुदत असणार आहे. त्यानंतर या विभागांनाही शहरात खोदाईस मनाई असणार असून १ ऑक्टोबरनंतरच खोदाईस परवानगी दिली जाणार आहे.




## भरधाव टेम्पोची धडक; पादचारी ठार

**पुणे :** भरधाव टेम्पोची धडक बसल्याने गंगा प्रसाद (वय ३९, रा. आंबेगाव बुद्रुक) या पादचाऱ्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी टेम्पोचालकावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गंगा प्रसाद १३ मे रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास कात्रज परिसरात रस्ता ओलांडत होते. त्यावेळी भरधाव टेम्पोची त्यांना धडक बसली. दिली. त्यामुळे गंभीर जखमी झालेल्या गंगा प्रसाद यांचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांसह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. टेम्पोचालक अपघातानंतर जखमी पादचाऱ्याला मदत न करता पसार झाला. त्याच्या शोधासाठी सीसीटीव्ही पोलिसांनी तपासले आहे. सहायक पोलिस निरीक्षक भोजलिंग दोडमिसे तपास करत आहेत.

# शिवकालीन मर्दानी खेळ, शस्त्रे आणि युद्ध कला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोथरुड परिसरातील शिवतीर्थनगर मध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. शिवतीर्थ फाऊंडेशन तर्फे विविध कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये शिवकालीन मर्दानी खेळ, शिवकालीन शस्त्रे,

शिवकालीन युद्ध कला, दांडपट्टा इत्यादी आयोजित कार्यक्रमामुळे उपस्थिती जनसमुदायास प्रेरक उर्जा मिळाली. कोथरूड परिसरातील सर्वपक्षीय पदाधिकारी उत्साहाने सहभागी झाल्याने कार्यक्रमाला वेगळ्या प्रकारची उंची मिळाली. आपल्या मातृभूमीला जाज्वल्य इतिहास असला तरी नव्या पिढीला या पारंपारिक युद्धकलेची माहिती होण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते; परंतु सर्वपक्षीय नेते अन् कार्यकर्त्यांनी दिलेल्या भक्कम साथीमुळे एक मोठी उर्जा मिळाली असल्याचे आयोजक शिवतीर्थ फाऊंडेशन चे संस्थापक आणि मनसे शाखाध्यक्ष किरण उभे यांनी सांगितले.

आयोजन समितीत मंगेश कानगुडे, अनंता उभे, सुशांत आंबेकर, सौरभ पवार, संदेश जोरी, अमित मोहोळ, गौरव कंधारे, विकास मोहोळ, साहिल उभे , प्रथमेश तोंडे , धीरज गावडे, अभिजित खोपटकर, लकी मराडे, प्रथमेश उभे, रोहित लोखंडे , मयूरेश चव्हाण प्रशंसनीय काम केले.



पुणे नव्या पिढीला या पारंपारिक युद्धकलेची माहिती होण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते; शिवकालीन युद्ध कला, दांडपट्टा इत्यादी आयोजित कार्यक्रमामुळे उपस्थिती जनसमुदायास प्रेरक उर्जा मिळाली.



## शिबीरात ११७ जणांचे रक्तदान

**पुणे :** लोकशिक्षण मित्र मंडळ ट्रस्टतर्फे शगुन चौक दहीहंडी उत्सव व जाणीव संघटना पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्‌घाटन वीरपत्नी दीपाली मोरे यांच्या हस्ते झाले. शिबिरात ११७ जणांनी रक्तदान केले. या वेळी आमदार हेमंत रासने, संजय शंके, श्वेता ओतारी, योगेश पवार, वेदांत कुलकर्णी, रुद्र पवार, प्रणव चव्हाण, केदार पवार आदी उपस्थित होते.

# श्री तुळशीबाग महागणपतीला १५०० कलिंगडांचा नैवेद्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रंगीबेरंगी फुलांची आकर्षक आरास... चंदन उटीचे लेपन आणि तब्बल १ हजार ५०० कलिंगडांचा नैवेद्य श्री तुळशीबाग महागणपतीला दाखविण्यात आला. शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षात (१२५) संकष्टी चतुर्थीच्या दिवशी बाप्पासमोर साकारलेला कलिंगडांचा नैवेद्य व पुष आरास पाहण्याकरिता गणेशभक्तांनी मोठी गर्दी केली.



मानाचा चौथा गणपती श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट च्या वतीने कलिंगडाचा महानैवेद्य व वासंतीक चंदन उटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंडळाचे अध्यक्ष विकास पवार, कोषाध्यक्ष नितीन पंडित, उपाध्यक्ष विनायक कदम, दत्ताभाऊ कावरे, गणेश रामलिंग आणि परिसरातील व्यापारी उपस्थित होते. प्रसिद्ध पुष्प सजावटकार सुभाष सरपाले यांनी ही आरास साकारली.

संकष्टी चतुर्थी च्या दिवशी वासंतिक चंदन उटी लेपन करण्यात आले. तसेच रात्री गणेश जागर आणि महाआरती चे आयोजन करण्यात आले होते. शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त मंडळातर्फे विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# शहरात चार्जिंग स्टेशनची कमतरता

## इलेक्ट्रिक दुचाकी चालकांना फटका; नाहक मनस्ताप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे:शहरात ई-वाहने खरेदी करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. पण, त्या प्रमाणात चार्जिंग स्टेशनची संख्या वाढलेली नाही. महापालिकेने काही ठिकाणी चारचाकी वाहनांसाठी चार्जिंगची सोय केली आहे; पण दुचाकी चार्जिंगसाठी शहरात कोठेही सोय नाही. त्यामुळे नागरिकांना, इलेक्ट्रिक दुचाकीचालकांना याचा फटका बसत आहे. रस्त्यात चार्जिंग संपल्यावर गाडी बंद पडते. त्यावेळी जवळ चार्जिंगची सोय नसल्यामुळे नाहक त्रास होणार आहे.

इलेक्ट्रिक वाहन खरेदी करून एक ते दोन वर्षे झाल्यानंतर वाहनांची देखभाल दुरुस्ती, गाड्यांचे सुटे भाग मिळण्यात सातत्याने अडचणी येत आहेत. त्यामुळे नागरिकांना इलेक्ट्रिक वाहनांच्या शोरूममध्ये फेऱ्या माराव्या लागत असून, वाहन दुरुस्तीसाठी एक ते दीड महिना वाट पाहावी लागत आहे.

केंद्र सरकारकडून इलेक्ट्रिक वाहन खरेदीला प्रोत्साहन दिले जात आहे. आता राज्य सरकारकडून महामार्गावर टोल फ्री करण्यात आले आहे. शिवाय ई-वाहनांमुळे प्रदूषण कमी होते. त्यामुळे सरकारकडून ई-वाहन खरेदीसाठी सवलत देखील दिली जात आहे. त्यामुळे ई-वाहन खरेदीला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. तसेच त्यांच्याकडूनही सवलती देऊन ई-वाहने खरेदीसाठी प्रोत्साहन दिले जात आहे. नागरिकांकडून दुचाकी, तीनचाकी आणि चारचाकी ई-वाहने खरेदी केली जात आहेत. गेल्या तीन वर्षांपासून ई-वाहने खरेदी करण्याचे प्रमाण वाढले आहे; परंतु गेल्यावर्षी यामध्ये घट झाली आहे. सध्या पुण्यात लाखांपेक्षा जास्त ई-वाहने खरेदी करण्यात आली असून, रस्त्यावर धावत आहेत; मात्र, इलेक्ट्रिक वाहन रस्त्यात बंद पडल्यानंतर दुरुस्तीसाठी प्रशिक्षित मेकॅनिकची आवश्यकता असते; पण त्यांची कमतरता आहे. त्यामुळे वाहनधारकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.



इलेक्ट्रिक वाहनामध्ये बिघाड झाला तर वेळेवर दुरुस्ती करून मिळत नाही. शिवाय शहरात ई-वाहने दुरुस्त करणारी गॅरेज बोटावर मोजण्याएवढीच आहेत. अनेक ठिकाणी ई-बाइकची शोरूम बंद झाली आहेत. त्यामुळे नागरिकांना ई-वाहने दुरुस्तीसाठी शोरूम शोधत फिरावे लागत आहे. ई-वाहन बंद पडले, तर ते ढकलत अथवा क्रेन लावून नेण्याशिवाय पर्याय राहत नाही. त्यात शोरूममध्ये ई-वाहन दुरुस्ती देखभालीसाठी मोठी प्रतीक्षा यादी असते. त्यात वाहनाचे सुटे भाग मिळत नसल्याने नागरिकांना काही वेळा महिनाभर वाहन दुरुस्तीची वाट पाहावी लागते.

शहरातील इलेक्ट्रिक वाहनांची संख्या

| वर्ष | वाहन संख्या |
|---|---|
| २०२२ | २३ २५,५८८ |
| २०२३ | २४ ३२,८३६ |
| २०२४ | २५ १३,६८९ |






## दुचाकी चोरट्याला सश्रम कारावास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लोणी काळभोर (ता. हवेली) पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दुचाकी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीला अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी १ वर्ष सश्रम कारावास आणि पाच हजार रुपये दंड, तसेच दंड न भरल्यास २ महिन्यांच्या साधा कारावासाची शिक्षा सुनावली आहे. दीपक ऊर्फ जोजो टिम्बा बाबूराव सरवदे (रा. कोलवडी, मांजरी खुर्द, पुणे) असे शिक्षा सुनावलेल्या आरोपीचे नाव आहे. अंबादास वैजनाथ झाटे (वय ४५ वर्षे रा. कामठे आळी, उरुळी देवाची, पुणे) यांनी एक वर्षांपूर्वी आपल्या घराखाली स्वतःची दुचाकी लावली होती. चोरट्याने ती दुचाकी चोरून नेली. याप्रकरणी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. या गुन्ह्याचा पोलिस हवालदार संभाजी देवीकर यांनी तपास करून गुन्ह्यातील चोरट्याचे नाव निष्पन्न करून आरोपी दीपक ऊर्फ जोजो टिम्बा बाबूराव सरवदे याच्याकडून गुन्ह्यातील चोरी केलेली दुचाकी जप्त केली. तसेच, आरोपीविरुद्ध सबळ पुरावे गोळा करून न्यायालयात दोषोरापपत्र दाखल केले होते. सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्रीधर जावळे, कोर्ट पैरवी लक्ष्मीबाई यादव यांनी कामकाज पाहिले.



## भाजे लेण्याचे चित्र टपाल विभागाच्या पोस्टकार्डवर

**पुणे :** प्रसिद्ध चित्रकार सुबोध गोखले यांनी चितारलेले भाजे लेण्याचे चित्र टपाल विभागाच्या पोस्टकार्डवर विराजमान झाले आहे. बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून टपाल विभागाने प्रकाशित केलेल्या पोस्टकार्डवर हे चित्र झळकले आहे.रंगीत पेन्सिल्स वापरून साकारलेले भाजे लेणीचे चित्र ऑरकूट आणि फेसबुक या दोन्ही माध्यमांमध्ये सर्वाधिक लोकप्रिय ठरले. त्याची दखल घेऊन भारत सरकारने बुद्ध पौर्णिमेच्या मुहूर्तावर पोस्ट कार्डवर हे चित्र प्रसिद्ध केले. हा त्या चित्राचा बहुमान असून मी केवळ निमित्तमात्र आहे, अशी भावना सुबोध गोखले यांनी व्यक्त केली.हे चित्र लेणी कोरणाऱ्या अज्ञात शिल्पकारांना समर्पित करत आहे. हा खरा त्या शिल्पकारांचा सन्मान आहे, असे गोखले यांनी सांगितले.

बुद्ध पौर्णिमेनिमित्त केंद्र सरकारने प्रदर्शित केलेल्या पोस्ट कार्डवर मी रंगीत पेन्सिल्स वापरून तयार केलेले चित्र छापले आहे. हा माझ्या कला कारकिर्दीतील सर्वोत्तम क्षण आहे. वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद आणि रसिकांचे प्रोत्साहन यामुळे हे शक्य झाले.



## आर्ट ऑफ लिव्हिंग'तर्फे विविध सामाजिक उपक्रम

**पुणे :** 'पुणे : 'आर्ट ऑफ लिव्हिंग' पुणे संस्थेने संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकर यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम आयोजित करून साजरा केला. शहर आणि पिंपरी-चिंचवडमध्ये रक्तदान शिबिरे आणि मोफत आरोग्य तपासणीचे आयोजन केले होते. शिबिरांमध्ये ११३ जणांनी रक्तदान केले. तसेच खराडी येथील बालाजी रुग्णालयात रक्तदान शिबिर आणि मोफत आरोग्य तपासणी आयोजित केली होती. याचा ५५ जणांनी लाभ घेतला, तर दहा जणांनी रक्तदान केले. सिंहगड रस्ता शिबिरात येथे ५५ जणांनी रक्तदान केले. महाड येथेही रक्तदान शिबिर पार पडले.

## मोबाईल ॲपद्वारे समजणार बोअरवेलची भूजल पातळी

**पुणे :** भारत सरकारनेही दखल घेतलेले 'भूजल ॲप' हे मोबाईल ॲप अवघ्या मिनिटभरामध्ये बोअरवेलमधील भूजल पातळी मोजू शकते. यासाठी बोअरला कोणतेही यंत्र जोडण्याची गरज नाही किंवा बोअर उघडावे लागत नाही. या ॲपचा वापर कसा करायचा, त्याचा भूजल व्यवस्थापनासह शेतीची जलसुरक्षा निश्चितीसाठी कसा लाभ होतो, हे जाणून घेण्यासाठी १७ मे रोजी ऑनलाइन कार्यशाळा आयोजिली आहे. यामध्ये पाणी शाश्वतपणे कसं वापरावं, उन्हाळ्यात पाणीटंचाई टाळून पीक कसं वाचवावं, उत्पादन वाढवण्यासाठी पाण्याचा योग्य उपयोग कसा करावा, वीज व पाण्याची बचत करून खर्च कसा कमी करावा आणि जनावरांसाठी किंवा आपत्कालीन गरजेसाठी पाणी कसं राखून ठेवावं याविषयी मार्गदर्शन मिळणार आहे. शेतात बोअरवेलचा वापर करणाऱ्यांसाठी हे प्रशिक्षण उपयुक्त आहे.

## 'एफपीओ'साठी कायदेशीर व्यवस्थापन प्रशिक्षण

**पुणे :** दरवर्षी हजारो शेतकरी उत्पादक कंपन्यांना (एफपीओ) कायदेशीर अटींचे पालन न केल्यामुळे मोठ्या आर्थिक दंडाचा सामना करावा लागतो. याच पार्श्वभूमीवर 'एफपीओ'मध्ये नॉन-कम्प्लायंस कमी करण्यासाठी २४ मे रोजी ऑनलाइन कार्यशाळा आयोजिली आहे. कार्यशाळेत एफपीओंना कायदेशीर चौकट, नियामक आवश्यकता, वित्तीय व्यवस्थापनाच्या सर्वोत्तम पद्धती, पारदर्शकतेसाठी रेकॉर्ड ठेवणे, प्राप्तिकर, वस्तू व सेवा कर आणि इतर कायदेशीर जबाबदाऱ्या तसेच लेखा परीक्षण, देखरेख आणि अहवाल या सर्व बाबींचे सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. एफपीओ संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, लेखापाल आणि संबंधित सभासद यांच्यासाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरणार असून नियमांचे काटेकोर पालन, योग्य नियोजन आणि डिजिटल साधनांचा प्रभावी वापर यामुळे कंपन्यांचे आर्थिक नुकसान टाळता येईल आणि एफपीओंच्या आर्थिक स्थैर्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.

## 'महारेरा' परीक्षा पोर्टल फेज सातच्या अंतिम मुदतीत वाढ

**पुणे :** फेज सातसाठी महारेरा परीक्षा पोर्टल, जे पूर्वी १४ मे रोजी रात्री ११ वाजता बंद होणार होते, त्याची मुदत आता १८ मे रोजी रात्री ११ वाजेपर्यंत वाढवण्यात आली आहे. या मुदतवाढीमुळे उमेदवारांना परीक्षेसाठी नोंदणी करण्यासाठी आणि शेवटच्या क्षणाच्या ताणाशिवाय त्यांची तयारी पूर्ण करण्यासाठी अधिक वेळ मिळणार आहे. अद्यापही अनिवार्य असलेले महारेरा सक्षमता प्रमाणपत्र मिळवण्यासाठीचे प्रशिक्षण सर्व स्थावर संपदा अभिकर्ते आणि बांधकाम क्षेत्रातील विकसकांकडे स्थावर संपदा व्यवहार करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी पूर्ण केले नसेल, तर ते करण्याची आणि वेळेवर परीक्षेसाठी अर्ज करण्याची ही उत्तम वाढीव संधी उपलब्ध झाली आहे.

# कारवाईनंतरही परिस्थिती 'जैसे थे'

महापालिकेच्या अतिक्रमण बांधकाम विभागाच्या मदतीने नगर रस्ता, वडगाव शेरी क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील खराडी झेन्सॉर आयटी पार्क परिसर, खराडी मुंढवा बायपास रस्ता, विमाननगर आदी भागात अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई केली होती. साइड मार्जिन, रस्ते मोकळे केले होते. महापालिकेने ही कारवाई केल्यानंतर तेथून पथक निघून गेले. त्यानंतर, ज्या लोकांनी अतिक्रमण काढून घेतले, त्यांनी पुन्हा रस्ता, पादचारी मार्ग व्यापून पुन्हा त्यांचे व्यवसाय सुरू केले. त्यामुळे कारवाई नंतर अतिक्रमणाची परस्थिती 'जैसे थे' होत आहे.

> महापालिकेने अतिक्रमणांवर कारवाई केल्यानंतर पुन्हा ते रस्त्यावर येत आहेत. हा प्रकार रोखण्यासाठी पालिका सतत कारवाई करणार आहे. पालिका मोठ्या व्यावसायिक आणि अनधिकृत चौपाट्यांवरही कारवाई करत आहे.
> **- संदीप खलाटे,** उपायुक्त, अतिक्रमण निर्मूलन विभाग



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महापालिकेत ३२ गावे समाविष्ट झाली आहेत. या गावांमध्येही मोठया प्रमाणात अतिक्रमणे होत आहेत. त्यामुळे अतिक्रमण कारवाई करण्यासाठी पालिकेकडे मनुष्यबळी कमी पडत आहे.

शहरातील पदपथांवर आणि रस्त्याच्या कडेला अतिक्रमणे करून थाटलेल्या व्यावसायिकांवर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून कारवाई केली जाते; पण कारवाई करण्यासाठी अतिक्रमण पथक निघताच कारवाईची माहिती स्टॉलधारक, हातगाडी, पथारी व्यावसायिकांना मिळते. दुकानदार त्यांचे दुकानाबाहेरील साहित्य आतमध्ये घेतात. त्यामुळे अवघ्या ५-१० मिनिटांत रस्त्यावरील अनधिकृत व्यावसायिक गायब होतात. अतिक्रमण पथकाची गाडी निघून गेल्यानंतर परत रस्ता अतिक्रमणांनी गजबजून जातो. अतिक्रमणविरोधी पथकातील कर्मचारीच ही 'टीप' देत असल्याने महापालिकेची कारवाई केवळ दिखाऊ ठरत आहे.शहरातील पथारी व्यावसायिकांना महापालिकेने दिलेल्या परवान्यानुसार पथारीच्या ठिकाणी अन्नपदार्थ शिजविण्यास अथवा तयार करण्यास बंदी आहे. तरीही अनेक पथारीधारक गॅस सिलिंडर वापरत आहेत. त्यामुळे पालिकेने या व्यावसायिकांकडून गॅस सिलिंडर जप्त केले जातात; पण गॅस सिलिंडर वापरणाऱ्या पथारीधारकांवर ठोस कारवाई केली जात नाही.

गेल्या काही महिन्यांत शहरातील अतिक्रमण कारवाई थंडावल्याने सर्वच भागात मोठ्या प्रमाणात पादचारी मार्ग, रस्त्यांवर पथारी, स्टॉल, टपऱ्यांची संख्या वाढली. त्याबाबत आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याकडे तक्रार केल्यानंतर कारवाईला सुरुवात करण्यात आली. महापालिकेने अतिक्रमण कारवाई करून रस्ते, पादचारी मार्ग, इमारतींचे फ्रंट व साइड मार्जिन मोकळे केले. शहराच्या विविध भागात रात्री सातनंतर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पथारी व्यावसायिकांनी दुकाने थाटली आहेत; पण महापालिका रात्रीच्या वेळी अत्यंत किरकोळ कारवाई करत आहे.

## आयपीएफ योजनेची अंमलबजावणी करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहराच्या आरोग्य क्षेत्रातील 'लाईफ लाईन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धर्मादाय (आयपीएफ) योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी आणि ही योजना सर्वसामान्य रुग्णांपर्यंत पोहोचावी, असे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी (गुरुवारी) आयपीएफ संबंधात जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत सांगितले .

महाराष्ट्र राज्यातील धर्मादाय रुग्णालय चौकशी समिती सदस्य' या नात्याने योजनेच्या कार्यवाहीसाठी जबाबदार शासकीय अधिकारी आणि धर्मादाय रुग्णालयांचे प्रतिनिधी यांची बैठक घेण्यात आली. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत सुसज्ज आणि दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचवताना येणाऱ्या समस्या व अडचणींवर चर्चा झाली, असे आमदार शिरोळे यांनी सांगितले.

या बैठकीस प्रमुख धर्मादाय रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पुणे जिल्ह्यात सध्या सुमारे ६० रुग्णालये आयपीएफ योजनेअंतर्गत कार्यरत आहेत. या योजनेचा लाभ आर्थिकदृष्ट्या दुर्बल (निर्धन) रुग्णांना दिला जातो, अशा रुग्णांच्या तक्रारी आणि रुग्णालयांना भेडसावणाऱ्या समस्या यामध्ये समन्वय साधून योजना प्रभावीपणे कशी राबवता येईल, यावर सखोल विचारविनिमय झाल्याचे आमदार शिरोळे यांनी



सांगितले.

छत्रपती शिवाजी नगर मतदारसंघातील वैद्यकीय गरजांचा विचार करता, काही धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता भासते. येत्या काळात, योजनेअंतर्गत समाविष्ट सर्व रुग्णालयांमध्ये अधिक सक्षम समन्वय साधण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहीन, असा निर्धार आमदार शिरोळे यांनी व्यक्त केला.

बैठकीला धर्मादाय रुग्णालयांचे प्रतिनिधी, धर्मादाय कार्यालयातील न्यास निरीक्षक, समन्वयक, तसेच जिल्हा प्रशासनातील सुहास मापारी (अप्पर जिल्हाधिकारी), सुयोग दिवसे (नायब तहसीलदार, सर्वसाधारण शाखा), डॉ.मानसिंगजी साबळे (अध्यक्ष - मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे) तसेच आनंद छाजेड आणि प्रकाश सोळंकी उपस्थित होते.

## कात्रज- कोंढवा रस्त्यावरील अतीक्रमणावर हातोडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीमध्ये कात्रज-कोंढवा रस्त्यावर अतिक्रमण कारवाई करण्यात आली. नागरिकांच्या वारंवार येणाऱ्या तक्रारीमुळे व त्यांना होणाऱ्या त्रासामुळे तसेच वाहतूक कोंडीमुळे पालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

उपायुक्त परिमंडळ क्रमांक ४ अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील राजस सोसायटी चौक ते खडीमशीन चौक येथील रस्ता पदपथावरील तसेच फ्रंट व साईट मार्जिनमधील अतिक्रमणावर बांधकाम विकास विभाग व अतिक्रमण विभागाकडून संयुक्तरित्या कारवाई करण्यात आली.

अतिक्रमण उपायुक्त संदीप खलाटे, परिमंडळ चारचे उपायुक्त जयंत भोसेकर, सहाय्यक आयुक्त लक्ष्मण कादबाने यांच्या नियंत्रणाखाली उपअभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक, अतिक्रमण निरीक्षक, १० सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक, ०३ मनपा पोलीस कर्मचारी व १० महाराष्ट्र सुरक्षा बलाचे कर्मचारी यावेळी उपस्थित होते. कारवाईमध्ये एकूण ७ हाजर ५०० चौरस फूट व १६ कच्चे-पक्के शेड मोकळे करण्यात आले. तसेच ०७ ट्रक साहित्य व माल जप्त करण्यात आल्याची माहिती क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक मेघा राऊत यांनी दिली.



पुणे कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीमध्ये कात्रज-कोंढवा रस्त्यावर अतिक्रमण कारवाई करण्यात आली. पदपथावरील तसेच फ्रंट व साईट मार्जिनमधील अतिक्रमणावर बांधकाम विकास विभाग व अतिक्रमण विभागाकडून संयुक्तरित्या कारवाई करण्यात आली.

# फोटोग्राफी करताना प्रत्येक क्षण शिकवून जातो : सौरभ गोखले




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जेव्हा मी व्यावसायिक अभिनेता म्हणून काम करत नव्हतो तेव्हा मी कॅमेरा घेवून गणेशोत्वात फिरायचो तेव्हा कळले की फोटोग्राफी हे क्षेत्र किती उपयुक्त आणि इन्ट्रेस्टिंग आहे. जेव्हा तुम्ही फोटोग्राफी करता तेव्हा प्रत्येक क्षण तुम्हाल काही तरी देवून जातो काही करी शिकवून जातो. आता फोटोग्राफी क्षेत्रात खूप बदल झाले आहेत. कॅमेरे देखील सतत बदलत आहेत त्यामुळे हे खूप आव्हानात्मक झाले आहे, असे मत अभिनेता सौरभ गोखले यांनी व्यक्त केले.

स्टारविन्स फाउंडेशनच्या वतीने विविध छायाचित्रांच्या माध्यमातून जगभरातील छायाचित्रकारांना व्यासपीठ मिळवून देणारे 'क्षण' हे आंतरराष्ट्रीय छायाचित्र प्रदर्शन पुण्यात बालगंधर्व कलादालन येथे भरविण्यात आले आहे. यावेळी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणा-यांना 'क्षण' पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी आमदार हेमंत रासने, दिग्दर्शक सागर वंजारी, फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रणव तावरे, सहसंचालक राज लोखंडे, कौशिक कुलकर्णी, अक्षय जाधव, विवेक शिवेकर, सई कुलकर्णी, वृषाली वडनेरकर हे उपस्थित होते.

कलाक्षेत्रातील सौरभ गोखले, व्यवसाय क्षेत्रातील शेखर मते, छायाचित्रण क्षेत्रात दिलीप आणि प्रतिभा गोरे, सामाजिक क्षेत्रात पियुष शहा आणि क्रीडा क्षेत्रात साहिल मुजावर यांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. हे प्रदर्शन दिनांक १७ मे पर्यंत सकाळी १० ते रात्री ९ दरम्यान बालगंधर्व कलादालन येथे विनामूल्य सुरू आहे.




> पूर्वी फोटोग्राफीला एक व्यावसायिक आणि गंभीर स्वरूप होते. आज मोबाईल कॅमेऱ्यांमुळे ती सहजसोप्या रूपात आली असली तरी, तितकीच आव्हानात्मकही बनली आहे. अशा काळात छंद म्हणून फोटोग्राफी जपणे आणि ती जोपासणे खरोखरच प्रशंसनीय आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात कलेसाठी स्वतःला समर्पित करणे हे खूपच कौतुकास्पद आहे..
> **— आमदार हेमंत रासने,**

## 'वर्ल्ड मळ्याळी कौन्सिल, पुणे'च्या अध्यक्षपदी व्ही. सुधाकरन



**पिंपरी :** वर्ल्ड मळ्याळी कौन्सिल (डबल्यू एमसी), पुणे विभागाच्या अध्यक्षपदी व्ही. सुधाकरन यांची अध्यक्षपदी तर हर्ष नायर यांची सचिव तर जॉय जोसेफ यांची सभापती (चेअरपर्सन) पदी निवड करण्यात आली. वर्ल्ड मळ्याळी कौन्सिलचे माजी जागतिक अध्यक्ष टी.पी विजयन यांच्या अध्यक्षतेखाली ही सर्व साधारण बैठक घेण्यात आली. यावेळी निवडणूक घेण्यात आली. मल्याळी समुदायाच्या विकासासाठी वचनबद्ध असलेली सेवाभावी संस्था आहे. 2025-2027 या कालावधीसाठी त्यांच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची घोषणा केली .




## कोयत्याने वार करून खून;

**मोशी :** आर्थिक कारणावरून पाच जणांनी मिळून एका व्यक्तीवर कोयत्याने वार करत त्याचा खून केला. ही घटना शुक्रवारी (दि.१६) पहाटे तीन वाजताच्या सुमारास मोशी ग्रँड हॉटेल समोर घडली. पोलीस उप आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी पहाटे तीन वाजताच्या सुमारास एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोशी ग्रँड हॉटेल समोर कोयत्याने वार करून एका व्यक्तीचा खून करण्यात आला. ज्ञानेश्वर उर्फ माऊली बर्गे (चिंबळी, खेड) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी भोसरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

## चॅलेंजर पब्लिक स्कूलने राखली परंपरा


चिन्मय भुते ९७.६ टक्के


श्रावणी बडगुजर ९६.८ टक्के



अद्विका डावखर ९६.२ टक्के


जान्हवी जोशी ९५.६ टक्के


भव्यादित्य मोहंती ९५ टक्के

**पिंपळे सौदागर :** दरवर्षी प्रमाणेच पिंपळे सौदागर येथील चॅलेंजर पब्लिक स्कूलने यंदाही सीबीएसई बोर्डाच्या इयत्ता बारावी आणि दहावीच्या परीक्षेत चमकदार कामगिरी केली आहे. इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के तर, बारावीचा ९८ टक्के लागला आहे. निकालात यंदाही मुलीच सरस ठरल्या आहेत. चॅलेंजर पब्लिक स्कूलने दहावीत सतत पाच वर्षांपासून शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता बारावीतील सिद्धी पाटिल हिने ९९.४० टक्के गुण मिळवीत प्रथम तर, अमन किशोरे याने ९७.८० टक्के गुण मिळवीत द्वितीय, परी अग्रवाल ९७.६० टक्के मिळवीत तृतीय आणि पलकप्रीत भुल्लार ९७.२० टक्के, सारा देशपांडे ९५.६० टक्के गुण मिळवीत अनुक्रमाने चौथा आणि पाचवा क्रमांक पटकावला आहे. तर, दहावीच्या परीक्षेत चिन्मय भुते याने ९७.६ टक्के गुण मिळवीत प्रथम तर, श्रावणी बडगुजर हिने ९६.८ टक्के गुण मिळवीत द्वितीय, अद्विका डावखरने ९६.२ टक्के मिळवीत तृतीय आणि जान्हवी जोशी हिने ९५.६ टक्के, भव्यादित्य मोहंतीने ९५ टक्के गुण मिळवीत अनुक्रमाने चौथा आणि पाचवा क्रमांक पटकावला आहे.

## पर्यावरण प्रेमींच्या मागणीला मिळाले मोठे यश



**भोसरी :** पिंपरी-चिंचवडमधील मुळा, पवना आणि इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाच्या आराखड्यामध्ये सुशोभिकरणावर भर देण्यापेक्षा प्रदूषण होणार नाही, अशा प्रकल्पांचा समावेश करावा. यासाठी महानगरपालिका प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवडमधील पर्यावरण प्रेमी आणि स्वयंसेवी संस्था- संघटनांच्या मागणीला मोठे यश मिळाले आहे.नदी प्रदूषण आणि महानगरपालिकेचा नदी सुधार प्रकल्पातील त्रुटी याबाबत पुणे व पिंपरी-चिंचवडमधील पर्यावरण प्रेमी आणि स्वयंसेवी संस्था-संघटनांनी गेल्या दोन महिन्यांपासून आंदोलन सुरू केले आहे. दरम्यान, पर्यावरण प्रेमींनी सूचवलेले मुद्दे रास्त असून, त्याचा अंतर्भात नदी सुधार प्रकल्पामध्ये करावा, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महानगरपालिका प्रशासनाला केली होती. त्याला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पिंपरी-चिंचवड मनपा हद्दीतील इंद्रायणी नदीचे होणारे प्रदूषण कमी करणे करिता मनपामार्फत इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याला राज्य शासनाच्या अमृत योजनेतून निधी उपलब्ध होणार आहे. त्या करिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तांत्रित मान्यताही घेण्यात आली आहे.

# छत्रपती संभाजीराजे जयंती निमित्त रक्तदान शिबीर



## रक्तदान शिबिराला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** भोसरी हुतात्मा चौक येथे श्री. म्हसोबा देवस्थान मित्र मंडळ व शंभूराजे राज्याभिषेक सोहळा समिती राजधानी रायगड यांच्यावतीने धर्मवीर छत्रपती संभाजी राजे जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जम्मू काश्मीर येथील पहेलगाम हल्ल्यानंतर नागरिक तसेच भारतीय जवानांसाठी रक्ताची गरज भासू शकते या दक्षतेसाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने रक्तदानासाठी आवाहन करण्यात आले होते. या आव्हानाला प्रतिसाद देत रक्तदान शिबिराला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संभाजी महाराज जयंती निमित्त म्हसोबा देवस्थान मंदिर हनुमान कॉलनी ४ हुतात्मा चौक भोसरी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. पिंपरी चिंचवड ब्लड बँक यांच्या सहकार्याने रक्तसंकलन करण्यात आले. या शिबिरादरम्यान 25 रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. या शिबिरासाठी परिसरातील किरण भालेकर, दर्शन भुजबळ, स्वप्नील होरे, वरून गोरडे, स्वराज कराळे, ओंकार जगताप,तेजस गायकवाड,आयुष बाणेकर विशेष सहकार्य केले.

# उदय सामंतांच्या कार्यकर्त्यांना सूचना

## संघटनेसाठी दररोज एक तास द्या, ताकत देऊ





"एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विधानसभेची निवडणूक लढविली. महायुतीला चांगले यश मिळाले. लाडकी बहिणीसह विविध लोकोपयोगी योजना राबविल्या. त्याचा शिवसेनेसह महायुतीला मोठा फायदा झाला आहे. केवळ शिवसेना सदस्य नोंदणीचा आढावा घेण्यासाठी आलो नाही, तर कार्यकर्त्यांनां न्याय देण्यासाठी आलो आहे. कार्यकर्त्यांना बळ दिले जाईल. मी आणि खासदार श्रीरंग बारणे कार्यकर्त्यांना ताकद देण्यासाठी आहोत. कार्यकर्त्यांना बळ देणे शिवसेनेचे काम आहे. कार्यकर्त्यांनी झोकून देऊन काम करावे. पक्षासाठी दररोज एक तास द्यावा. त्यामुळे संघटन अधिक मजबूत, सक्षम होईल.

-मंत्री उदय सामंत



"आगामी महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना सदस्य नोंदणी हे चांगले माध्यम आहे. पिंपरी, चिंचवड, मावळमध्ये घरोघरी जाऊन सभासद नोंदणी करावी. त्याचा आगामी महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत फायदा होईल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे किती काम करतात, त्याचे अनुकरण करून पक्षासाठी काम करावे.

-खासदार बारणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पूर्वी एका रात्रीत सभासद नोंदणी केली जात होती. समोरचे नेतृत्व ही नोंदणी कशी झाली हे बघणारे नव्हते. आताचे नेतृत्व संघटना कशी वाढविली जाते हे डोळसपणे बघणारे आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वतः लक्ष ठेवून सभासद नोंदणी करून घेत आहेत. नोंदणीची पडताळणी करत आहेत.काम करणारे आणि काम चुकार कार्यकर्ते हे आम्हाला ओळखता येते. त्यामुळे संघटनेसाठी दररोज एक तास द्यावा. ताकत देण्याचे काम आमच्याकडून केले जाईल, अशी ग्वाही उद्योगमंत्री, पुणे जिल्ह्याचे संपर्क नेते उदय सामंत यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेची गुरुवारी आढावा बैठक सामंत यांच्या उपस्थितीत कासारवाडी येथे झाली. शिवसेना उपनेते, खासदार श्रीरंग बारणे, उपनेत्या सुलभा उबाळे, युवासेना पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजित बारणे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, गितांजली ढोणे, शिवसेना उपजिल्हा प्रमुख राजेश वाबळे, शिवसेना उपजिल्हा प्रमुख शरदराव हुलावळे, युवासेना जिल्हा प्रमुख राजेंद्र तरस, शिवसेना पिंपरी-चिंचवड शहर प्रमुख निलेश तरस, शिवसेना महिला शहरसंघटिका सरिता साने आदी उपस्थित होते.

पूर्वी एका रात्रीत सभासद नोंदणी केली जात होती. समोरचे नेतृत्व ही नोंदणी कशी झाली हे बघणारे नव्हते. आताचे नेतृत्व संघटना कशी वाढविली जाते हे डोळसपणे बघणारे आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वतः लक्ष ठेवून सभासद नोंदणी करून घेत आहेत. नोंदणीची पडताळणी करत आहेत. शिवसेनेचा निवडणुकांचा पाया हा सभासद नोंदणी आहे. त्यामुळे ती प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे. शिंदे कार्यकर्त्यांना न्याय देण्याची भूमिका घेतात. त्याच्या दहा टक्के भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली पाहिजे. घराघरामध्ये जाऊन सभासद नोंदणी करावी. त्यामुळे आपले, परके कळतील. घरात जाऊन आपला विचार रुजविला पाहिजे. काम करणारे आणि काम चुकार कार्यकर्ते हे आम्हाला ओळखता येते. सर्वांना विश्वासात घेऊन शासकीय समित्यांची पदे वाटली जातील. जो काम करेल, ज्याची ताकद असेल तोच महापालिकेची निवडणूक लढविणार आहे, असेही सामंत म्हणाले.

- पूर्वी घर बसल्या फॉर्म भरून सभासद नोंदणी केली जात होती. इतर पक्षही तसे करतात.
- एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदाच घरोघरी जाऊन ऑनलाइन सभासद नोंदणी केली जाते.
- सदस्य नोंदणीत मावळ मतदारसंघ राज्यात ४ स्थानावर आहे.
- संघटनेसाठी थोडा वेळ दिला तर १०० टक्के सभासद नोंदणी पूर्ण होईल.

# रेल्वे स्टेशनच्या कामाला गती द्या : खासदार बारणे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** अमृत भारत योजनेअंतर्गत चिंचवड, आकुर्डी, देहूरोड व तळेगाव दाभाडे या चार स्टेशनचा कायापालट केला जात आहे. कामात काही ठिकाणी त्रुटी आहेत, त्यात सुधारणा करावी. कामाचा दर्जा राखावा, दर्जेदार काम करावे. मुदतीत काम पूर्ण करावे, अशा सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना दिल्या.

खासदार बारणे यांनी गुरुवारी रेल्वे स्टेशनवर जाऊन कामाची माहिती घेतली. प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. रेल्वे स्टेशन सुधार अंतर्गत सुरू असलेल्या कामांची माहिती प्रवाशांना दिली. यावेळी पुणे अप्पर रेल्वे उपप्रतबंधक पद्मसिंह जाधव, पुणे मुख्य परियोजना प्रतिबंधक गती शक्ती युनिट संजय लोहत्रे, वरिष्ठ मंडल अभियंता विजय कुमार राय, वरिष्ठ मंडल विद्युत अभियंता पराग अकनुरकर, वरिष्ठ मंडल वाणिज्य प्रबंधक ए.के. पाठक, शिवसेना पिंपरी-चिंचवड शहर प्रमुख निलेश तरस व मोठ्या संख्येने कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

### दीडची लोकल पुन्हा सुरू करा

- प्रवासी संघटनांनी केलेल्या सूचना महत्वाच्या आहेत. त्याही मार्गी लावाव्यात. पुणे ते लोणावळा ही दुपारी दीडची लोकल पुन्हा सुरू करावी. सह्याद्री एक्स्प्रेस मुंबईपर्यंत धावली पाहिजे. या मागण्या रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे मांडल्या आहेत. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे नियोजन करून दुपारी दीडची लोकल पुन्हा सुरू करावी, अशी सूचनाही खासदार बारणे यांनी केली.

"अमृत भारत योजनेअंतर्गत मावळ लोकसभा मतदारसंघातील स्टेशनची कामे सुरू आहेत. रेल्वे स्टेशनवर बैठक कक्ष, लिफ्ट, पार्किंगची व्यवस्था आणि रेल्वे स्टेशनचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे.चिंचवड, आकुर्डी, देहूरोड व तळेगाव दाभाडे स्टेशन सुधारण्याच्या कामात काही ठिकाणी त्रुटी आहेत. त्यात सुधारणा करावी. कामाचा दर्जा राखावा, दर्जेदार काम करावे. ही कामे पूर्ण करण्यासाठी डिसेंबर पर्यंत मुदत आहे. या मुदतीत कामे पूर्ण करावीत. — **खासदार बारणे**

# 'स्वतःवर प्रेम करा आणि काळजी घ्या!' - डॉ. दत्ता कोहिनकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** 'स्वतःवर प्रेम करा आणि स्वतःची काळजी घ्या!' असा सल्ला ज्येष्ठ समुपदेशक डॉ. दत्ता कोहिनकर यांनी श्री स्वामी समर्थ मंदिर प्रांगण, शिवतेजनगर, चिंचवड येथे गुरुवार, दिनांक १५ मे २०२५ रोजी दिला. श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान आयोजित तीन दिवसीय श्री स्वामी समर्थ व्याख्यानमालेत 'मनाची अमर्याद शक्ती व समाजस्वास्थ' या विषयावरील प्रथम पुष्प गुंफताना डॉ. दत्ता कोहिनकर बोलत होते. शिवलिंग ढवळेश्वर अध्यक्षस्थानी होते.

खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्घाटन करण्यात आले. माजी उपमहापौर तुषार हिंगे, पिंपरी - चिंचवड व्याख्यानमाला समन्वय समितीचे अध्यक्ष राजाभाऊ गोलांडे, समन्वयक राजेंद्र घावटे, उद्योजक भगवान पठारे, प्रा. दिगंबर ढोकले, श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानचे अध्यक्ष नारायण बहिरवाडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

नारायण बहिरवाडे यांनी प्रास्ताविकातून, 'तेरा वर्षांपासून श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध आध्यात्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. आता यावर्षी व्याख्यानमालेचाही त्यात समावेश झालेला आहे!' अशी माहिती दिली. राजाभाऊ गोलांडे यांनी, 'श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान म्हणजे भक्ती - शक्तीचा संगम आहे!' असे गौरवोद्गार काढले. श्रीरंग बारणे यांनी उद्घाटनपर मनोगतातून, 'मी असुरक्षित आहे अशी माणसाची भावना असते; पण 'भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे!' असे स्वामी समर्थ यांनी म्हटले आहे. व्याख्यानमालांच्या माध्यमातून पिंपरी - चिंचवड शहरात सुमारे चाळीस वर्षांपासून प्रबोधनाची चळवळ सुरू आहे; पण तरुणवर्ग व्याख्यानांकडे वळला पाहिजे!' असे आवाहन केले. शिवलिंग ढवळेश्वर यांनी अध्यक्षीय मनोगतातून, 'मोबाइलच्या आभासी जगातून बाहेर पडून सर्वांनी प्रबोधनाच्या कार्यात सहभागी व्हावे!' अशी अपेक्षा व्यक्त केली.

# चिंचवड व निगडीतील लोकमान्य रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना निर्देश

## अहवाल सादर करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील चिंचवड व निगडी येथील लोकमान्य रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. प्रशासकीय यंत्रणांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून अहवाल सादर करावा, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी संबंधित यंत्रणेला येथे दिले.

विधानभवनात लोकमान्य हॉस्पिटल चिंचवड व निगडी येथील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत आढावा घेण्यात आला. त्यावेळी विधानसभा उपाध्यक्ष बनसोडे बोलत होते. यावेळी राष्ट्रीय श्रमिक आघाडी संघटनेचे अध्यक्ष यशवंत भोसले, कामगार आयुक्त एच. तुम्मोड, पुणे विभागाचे अपर कामगार आयुक्त वा. व. वाघ, पुण्याचे विभागीय उपनिबंधक दिग्विजय आहेर, पिंपरी – चिंचवड महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.



"चिंचवड व निगडी येथील लोकमान्य रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांची चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी चौकशी पथकाची नेमणूक करण्यात यावी. यामध्ये उपसंचालक आरोग्य सेवा पुणे मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय अधिकारी, पोलीस क्राईम विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उपायुक्त, अपर कामगार आयुक्त पुणे, सहकारी संस्थेचे उपनिबंधक, भविष्य निर्वाह निधी कार्यालयाचे अधिकारी यांचा समावेश करावा. या पथकाने चौकशी अहवाल तात्काळ सादर करावा, अशा सूचना उपाध्यक्ष बनसोडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

— **अण्णा बनसोडे,** विधानसभा उपाध्यक्ष,

संपादकीय विशेष

# बलूचिस्तानची निर्मिती; पुढे काय होणार?

पहलगाम हल्ल्याचा सूड उगवण्यासाठी झालेल्या संघर्षाप्रसंगी पाकिस्तानने नागरी वस्त्यांवर केलेल्या हल्ल्याचे प्रत्युत्तर म्हणून भारताने थेट पाकिस्तानात घुसून थेट लाहोर, इस्लामाबादवर हल्ले केले. असे असले तरी, पाकिस्तानची अजूनही कोंडी करण्याची आवश्यकता आहे. जगातील अनेक देशांकडे पाकिस्तान भीकेची याचना करत आहे. अशा वेळीच पाकिस्तानवर जगाने आर्थिक निर्बंध लादण्याची गरज आहे. तसेच पाकिस्तानला दहशतवादी देश घोषित करण्याची आवश्यकता आहे. पाकिस्तानला गाझा बनवण्याची पूर्ण तयारी झाली आहे. आपण केलेला हल्ला पिन पॉइंट होता. यामुळे संयुक्त राष्ट्रसंघानुसार तो 'ॲक्ट ऑफ वॉर' नाही. 'ऑपरेशन सिंदूर' आम्ही दहशतवादी तळ नष्ट केल्यावर संपवले होते; परंतु त्यानंतर पाकिस्तानने हल्ला केला. त्याचे उत्तर आता दिले जात आहे. भारताला युद्धात ओढण्याची एवढी हौस पाकिस्तानला होती. आता त्याचे परिणामही त्या देशाला भोगावे लागतील. पाकिस्तानी सशस्त्र दलांनी आठ आणि नऊ मे 2025 च्या मध्यरात्री संपूर्ण पश्चिम सीमेवर ड्रोन आणि इतर शस्त्रास्त्रांचा वापर करून अनेक हल्ले केले. जम्मू आणि काश्मीरमध्ये नियंत्रण रेषेवर पाकिस्तानी सैन्याने अनेक वेळा युद्धबंदीचे उल्लंघन केले. यावेळी पाकिस्तानचे ड्रोन हल्ले प्रभावीपणे हाणून पाडून योग्य उत्तर देण्यात आले. ताज्या संघर्षाप्रसंगी भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील अनेक ठिकाणी हवाई संरक्षण रडार आणि प्रणालींना लक्ष्य केले. लाहोरमधील एक हवाई संरक्षण प्रणाली निष्क्रिय करण्यात आली.

भारताने नेहमीच एक जबाबदार राष्ट्र म्हणून खूप संयम बाळगला आहे आणि संवादाद्वारे समस्या सोडवण्यावर विश्वास ठेवला आहे; परंतु पाकिस्तानचा संवादावर विश्वास नाही. देशांतर्गत परिस्थितीवरून लक्ष विचलीत करण्यासाठी पाकिस्तानने लावलेल्या आगीत आता तोच होरपळून निघणार असून, 1971 सारखे पाकिस्तानचे तुकडे पडण्याची शक्यता जास्त आहे. पाकिस्तान अगोदरच तिथल्या महागाई आणि अन्य समस्यांनी त्रस्त आहे. अशा वेळी देशाची अर्थव्यवस्था सुधारण्याला प्राधान्य देणे आवश्यक होते; परंतु तिथले सरकार आणि लष्कर जनतेऐवजी स्वतःचे खिसे भरून अडचणीच्या वेळी परागंदा होतात, असा अनुभव आहे. आताही तेच झाले. पहलगाम हल्ल्यानंतरच्या 17 दिवसांमध्ये पाकिस्तानचे वर्तन हे युद्धखोरीला निमंत्रण देणारे होते. दररोज शस्त्रबंदी कराराचे उल्लंघन केले जात होते. भारताने 'ऑपरेशन सिंदूर'मधून पाकिस्तानला पुरेसा कडक संदेश दिला होता; परंतु हाती बळ नसलेल्यांना जास्त चेव येतो. पाकिस्तान सध्या एकाच वेळी स्थानिक जनता, 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी' आणि भारताशी लढतो आहे. अशीच परिस्थिती 1971 च्या युद्धापूर्वी होती. पाकिस्तान निर्माण करत असलेल्या परिस्थितीवरून दिसते की भारत 1971 प्रमाणे पूर्ण प्रमाणात युद्ध सुरू करू शकतो. प्रश्न असा उद्भवतो की पाकिस्तानचे पुन्हा एकदा तुकडे होऊन चार देश तयार होणार आहेत का? 1971 मध्ये पाकिस्तानी सैन्याने पूर्व पाकिस्तानमध्ये केलेली दडपशाही, बंगाली मुक्ती संग्राम (मुक्तीवाहिनी) आणि भारतात एक कोटी निर्वासितांचा ओघ हे भारताला युद्धात जाण्याचे निमित्त होते.

3 डिसेंबर 1971 रोजी 'ऑपरेशन चंगेज खान' अंतर्गत पाकिस्तानने भारतातील 11 हवाई तळांवर पूर्व-हल्ले केले. त्यामुळे युद्ध सुरू झाले. अलिकडे पाकिस्ताननेही असेच काहीसे केले आणि भारतीय विमानतळांवर आपले जेट आणि ड्रोन पाठवले. भारताने पाकिस्तानची क्षेपणास्त्रे, विमाने, ड्रोन हवेत पाडली नसती, तर हा हल्ला किती घातक असता याची कल्पनाही करू शकत नाही. 1971 मध्ये पाकिस्तानच्या 'ऑपरेशन चंगेज'नंतर भारताने पूर्व पाकिस्तानमध्ये निर्णायक विजय मिळवला आणि 13 दिवसांमध्ये ढाका ताब्यात घेतला. 93 हजार पाकिस्तानी सैनिकांनी भारतीय सैन्यासमोर आत्मसमर्पण केले. आता पुन्हा एकदा पाकिस्तानची फाळणी चर्चेत येत आहे. विशेषतः बलुचिस्तान, सिंध आणि खैबर पख्तूनख्वा सारख्या प्रदेशांमध्ये फुटीरतावादी चळवळीमुळे असे होऊ शकते. आजकाल पाकिस्तानमध्ये बलुच फुटीरतावादी चळवळ शिगेला पोहोचली आहे. हे आपल्याला 1971 मध्ये पूर्व पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या चळवळीची आठवण करून देते. पाकिस्तानी सैन्य दररोज बलुच सैन्यासमोर हरत आहे. परवा तर या प्रांताने आपले स्वतंत्र राष्ट्र घोषित केले. पाकिस्तानी सैन्य आणि गुप्तचर संस्था आता बलुचिस्तानमध्ये दडपशाही करण्यास सक्षम नाहीत. भारताने सिंधू पाणी करार पुढे ढकलल्यामुळे भविष्यात पाकिस्तानमध्ये यादवी युद्ध होऊ शकते. इथूनच पाकिस्तानची आणखी शकले पडायला सुरुवात होत आहे.

बलुचिस्तान हा पाकिस्तानचा सर्वात मोठा प्रांत आहे; परंतु आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या दुर्लक्षित आहे. येथे बलुच राष्ट्रवादी चळवळ सक्रिय आहे, जी पाकिस्तानपासून स्वातंत्र्य किंवा अधिक स्वायत्ततेची मागणी करते. आजघडीला बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) सारखे गट पाकिस्तानी सैन्याविरुद्ध गनिमी युद्ध लढत आहेत. बलुचिस्तानमधील लोकसंख्येचा एक मोठा भाग पाकिस्तान सरकारच्या विरोधात आहे, जो 1971 मध्ये पूर्व पाकिस्तानप्रमाणे भारतासाठी अनुकूल परिस्थिती ठरू शकतो. बलुचिस्तानमधील ग्वादर बंदर आणि नैसर्गिक वायूसारख्या संसाधनांच्या लूटमारीमुळे स्थानिक लोकांमध्ये असंतोष वाढला आहे. यासोबतच बलुचिस्तानची सीमाही विभागली जात आहे. ते इराण आणि अफगाणिस्तानच्या सीमेवर आहे, जिथून पाकिस्तानवर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. पाकव्याप्त काश्मीर हा भारताचा भाग मानला जातो आणि 1994 मध्ये भारतीय संसदेने तो भारताचा अविभाज्य भाग असल्याचे घोषित केले. अलिकडच्या काळात, वीज, पाणी आणि मूलभूत सुविधांच्या कमतरतेमुळे पाकव्याप्त काश्मीरमध्ये स्थानिक असंतोष वाढला आहे. तिथले काही गट भारतासोबत एकीकरणाचे समर्थन करतात आणि अलीकडील निदर्शने स्थानिकांचा पाकिस्तानविरुद्धचा राग प्रतिबिंबित करतात. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर येथे कोणतीही कृती वैध करणे भारतासाठी सोपे असू शकते. 1971 मध्ये भारतापासून हजारो मैल दूर असलेल्या पूर्व पाकिस्तानच्या तुलनेत पाकव्याप्त काश्मीर भारताच्या सीमेवर आहे. त्यामुळे लष्करी कारवायांसाठी रसद सुलभ होते. पाकिस्तानची आजची परिस्थिती पाहिल्यावर पुढील पाच-दहा वर्षांमध्ये बलुचिस्तान प्रांत पाकिस्तान मधून वेगळा होईल तसेच सिंध प्रांतदेखील पाकिस्तानमधून वेगळा होईल. फक्त पंजाबच पाकिस्तान राहील, अशी शक्यता आहे.

# कृतघ्न तुर्की, अझरबैजानवर भारताचे बहिष्कार अस्त्र

जागतिक

श्याम ठाणेदार



पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी काश्मीरमधील पहलगाम येथे भ्याड हल्ला करून २६ निष्पाप पर्यटकांना ठार केले. या भ्याड हल्ल्याने भारतात संतापाची लाट उसळली. या हल्ल्याचा जगभर निषेध केला गेला. भारतीय सैन्य दलाने ऑपरेशन सिन्दुर मोहीम राबवून पाकव्याप्त काश्मीरमधील अतिरेक्यांचे अड्डे नष्ट केले. ऑपरेशन सिन्दुर मोहिमेत भारतीय सैन्यदलाने शंभरहून अधिक जहाल दहशतवाद्यांना यमसदनी पाठवून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. भारताने ऑपरेशन सिन्दुर राबवताना फक्त दहशतवाद्यांना टार्गेट केले. भारताने पाकिस्तानी नागरिक किंवा सैन्यदलाला इजा पोहचवली नाही असे असतानाही पाकिस्तानने भारताच्या नागरी वस्तीवर आणि भारतीय सैन्यदलावर ड्रोनद्वारे हल्ला करण्याचा प्रयत्न केला अर्थात भारतीय सैन्यदलाने हा हल्ला परतावून लावतानाच थेट पाकिस्तानात घुसून पाकिस्तानचे हवाई अड्डे नष्ट केले. भारत पाकिस्तान दरम्यान सुरू झालेल्या या युद्धात कारण नसताना तुर्की आणि अझरबैजान या दोन देशांनी पाकिस्तानची बाजू उचलून धरली इतकेच नाही तर तूर्कीने थेट पाकिस्तानला लष्करी मदत करत पाकिस्तानला ड्रोन आणि इतर लष्करी साहित्य पुरवले. पाकिस्तानने

**तूर्किवर आलेल्या या नैसर्गिक संकटात भारताने आपली मैत्री निभावत तूर्किला अन्नधान्य, कपडे, जीवनावश्यक वस्तू, औषधे यांचा पुरवठा केला. दुसऱ्या कुठल्या देशाच्या आधी भारताने या देशांना मानवी सहाय्य पुरवण्यासाठी धाव घेतली. त्यासाठी भारताने ऑपरेशन दोस्ती मोहीम राबवली. ऑपरेशन दोस्ती मोहिमेअंतर्गत भारताने तूर्कीला संकट काळात मदत केली त्यामुळे तेथील जनतेने भारताचे आभार मानले. मात्र तेथील सरकारने काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानला पाठींबा देत कृतघ्नपणा केला**

भारतावर हल्ला करण्यासाठी जे ड्रोन पाठवले होते ते तुर्की या देशानेच दिले होते अर्थात भारताच्या भक्कम संरक्षण दलाने ते हवेतच भेदून टाकले. तुर्की या देशाने पाकिस्तानला मदत करताना थेट भारतावर टीका केली की भारतानेच पाकिस्तानवर हल्ला केला म्हणून त्यांनी पाकिस्तानला मदत केली. वास्तविक पाकिस्ताननेच दहशतवादी हल्ला घडवून आणला त्यामुळे पुढील संघर्ष निर्माण झाला हे संपूर्ण जग मान्य केले असताना तुर्की मात्र हे मान्य करायला तयार नाही याचा अर्थ पाकिस्तानने भारतात दहशतवादी कारवाया कराव्यात, आमच्या निष्पाप नागरिकांना मारावे आणि आम्ही ते निमूटपणे पाहत बसावे असे तूर्कीला सुचवायचे आहे का ? तुर्की प्रमाणेच अझरबैजान या देशाने ही पाकिस्तानला पाठिंबा देत भारतावर टीका केली. या दोन्ही देशांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला नाही मात्र भारतावर टीका करत पाकिस्तानला पाठिंबा दिला. या दोन्ही देशांचा हा कृतघ्नपणाच आहे. कारण या दोन्ही देशांना भारताने वेळोवेळी मदत केली आहे. या दोन्ही देशांना भारताने आपले मित्र राष्ट्र मानले आहे. या देशांनी मात्र भारताशी मैत्री निभावणे तर सोडाच पण भारताचा शत्रू असलेल्या पाकिस्तानला मदत करून भारताशीच शत्रुत्व पत्करले आहे. भविष्यात याचा त्यांना मोठा फटका बसणार हे निश्चित. २०२३ साली तुर्की आणि सीरिया या देशात मोठा भूकंप झाला होता. या भूकंपात तूर्कीची मोठी वित्त आणि जीवितहानी झाली होती. या भूकंपात तूर्कितील ५० हजारांहून अधिक नागरिक मरण पावले होते. तूर्किवर आलेल्या या नैसर्गिक संकटात भारताने आपली मैत्री निभावत तूर्किला अन्नधान्य, कपडे, जीवनावश्यक वस्तू, औषधे यांचा पुरवठा केला. दुसऱ्या कुठल्या देशाच्या आधी भारताने या देशांना मानवी सहाय्य पुरवण्यासाठी धाव घेतली. त्यासाठी भारताने ऑपरेशन दोस्ती मोहीम राबवली. ऑपरेशन दोस्ती मोहिमेअंतर्गत भारताने तूर्कीला संकट काळात मदत केली त्यामुळे तेथील जनतेने भारताचे आभार मानले मात्र तेथील सरकारने काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानला पाठींबा देत कृतघ्नपणा केला आणि आता युद्धात पाकिस्तानच्या बाजूने उभे राहून भारताशी शत्रुत्व पत्करले. दरवर्षी लाखो भारतीय तुर्कीला भेट देतात. त्यातून त्यांना वर्षाला तीन ते साडेतीन हजार कोटी रुपयांचा महसूल मिळतो. अझरबैजान या देशातही लाखो भारतीय पर्यटक भेट देतात. त्यांची अर्थव्यवस्थाही भारतीय पर्यटकांवर अवलंबून आहे. या दोन्ही देशातून भारतात व्यापार चालतो. तुर्की या देशातून मोठ्या प्रमाणात फळांची आयत होते. तुर्की या देशातून येणाऱ्या सफरचंदाला भारतात मोठी मागणी आहे. तुर्की आणि अझरबैजान या देशात चित्रपट निर्माते, दिग्दर्शक चित्रपटांचे, मालिकांचे आणि वेबसिरिजचे चित्रीकरण करतात त्यातूनही त्यांना मोठा महसूल मिळतो आता या दोन्ही देशांनी जो कृतघ्नपणा केला त्यामुळे या दोन्ही देशांविरुद्ध भारतात संतापाची लाट उसळली असून या दोन्ही देशांना धडा शिकवण्यासाठी बॉयकॉट तुर्की अँड अझरबैजान ही मोहीम भारतात राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत भारतातील नागरिक या दोन्ही देशांवर बहिष्कार टाकत आहेत. बॉलिवूडने तुर्की आणि अझरबैजान या दोन्ही देशात चित्रीकरण करण्यास नकार दिला असून या देशांवर बहिष्कार टाकला आहे. पर्यटक व्यावसायिकांनीही या दोन्ही देशातील आपले बुकिंग रद्द करून त्यांच्यावर बहिष्कार टाकला आहे. व्यापाऱ्यांनीही तूर्कितून येणाऱ्या वस्तूंवर बहिष्कार टाकला आहे. भारताचे हे बहिष्कार अस्त्र या दोन्ही देशांच्या मुळावर येणार आहे. भारतीय नागरिकांनी या दोन्ही देशांवर टाकलेल्या या बहिष्कार अस्त्राने या दोन्ही देशांची अर्थव्यवस्था गोत्यात येऊ शकते. असंगाशी संग केल्याचा परिणाम या दोन्ही देशांना भविष्यात भोगावा लागणार आहे.



खेचाखेची

## लग्नाचं कारण

पप्पूचं लग्न झालं आणि त्याचा संसार सुरु झाला.
एकदा पप्पू त्याच्या बायकोला विचारतो. तू माझ्यात असं काय पाहिलंस की मला डायरेक्ट लग्नाला हो म्हणालीस ?

**पप्पूची बायको** : मी तुम्हाला एकदोन वेळेस भांडी घासताना पाहिलं.

वेगळं काही

इंग्लंडमधल्या नॉटिंघममध्ये राहणाऱ्या बॉबी गॉर्डन नामक महिलेने घेतलेल्या एका केळाची किंमत होती तब्बल ८७ हजार रुपये. ही किंमत बघून बॉबीचे डोळेच पांढरे झाले. तिने सामानाची ऑनलाईन खरेदी केली. या सगळ्या सामानाचं बिल साधारण १०० पाऊंडांपर्यंत होणं अपेक्षित होतं. पण यात एका केळाची किंमत चक्क ९३० पाऊंड म्हणजे ८७ हजार रुपये दिली होती. आता काय करायचं या प्रश्नाने ती सैरभैर झाली. मग तिने बिलाचा फोटो काढून ट्विटरवर शेअर केला. इथे तिने आपली समस्या मांडली. बिलाचा हा फोटो वेगाने व्हायरल झाला. तांत्रिक चुकीमुळे चुकीचं बिल प्रिंट झाल्याचं सुपरमार्केटने मान्य केलं.

रुचिरा


## पनीर विथ मँगो पल्प

हापूस आंब्याची चव चाखण्यात दिवस कसे जातात ते समजतही नाही. या दिवसात आंबाशौकिनांची नुसती चंगळ असते. पण केवळ आंब्याचा रस आणि पोळी या डिशवर ताव मारु नका. आंब्याच्या विविध पाककृती तयार करुन चव चाखा. आता अशीच एक चविष्ट रेसिपी जाणून घेऊ या.



साहित्य – २५० ग्रॅम पनीर, एक वाटी आंब्याचा पल्प, आंबा इसेंन्स, वेलदोडे पावडर, दीड कप पाणी, पिस्ता आणि बदामाचे काप इत्यादी.

कृती – सर्वप्रथम पनीर मॅश करून त्यात आंब्याचा पल्प मिसळून घ्या. हे मिश्रण मळून छोटे–छोटे गोळे बनवून घ्या. पाक बनवण्यासाठी एका भांड्यात साखर आणि पाणी घ्या. तार सुटेपर्यंत ढवळत रहा. दहा ते पंधरा मिनिटांनी पाक तयार होईल. नंतर पाकात वेलदोडे पावडर टाका. त्यानंतर पनीर आणि मँगोचे गोळे पाकात अलगद सोडा. भांड्यावर झाकण लावून ठेवा. थोड्या वेळाने पनीरचे गोळे नरम झालेले दिसतील. गोळे नरम झाल्यानंतर आंब्याचा इसेंन्स टाका. बदाम–पिस्त्याच्या कापांनी गार्लिश करा.




राशीभविष्य

- **मेष** : अडचणींवर मात करू शकाल. स्थावर प्रश्नात लाभ होईल. अभियांत्रिकी क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृषभ** : कर्तृत्त्वाला आणखी वाव मिळेल. नव्या संधींचा लाभ घ्यावा. कामासाठी प्रवास फायदेशीर ठरेल.
- **मिथुन** : अनपेक्षित दिलासा मिळेल. अचानक अधिक खर्च करावा लागेल. अनुभवींचं मार्गदर्शन घ्यावं.
- **कर्क** : प्रापंचिक प्रश्न हैराण करतील. अवाका पाहून जबाबदाऱ्या घ्याव्या. बोलण्यातून गैरसमज संभवतात.
- **सिंह** : कामासाठी बरीच धावपळ होईल. डोळ्यांचे विकार संभवतात. शिक्षण क्षेत्रात संधी चालून येतील.
- **कन्या** : गृहसजावटीच्या क्षेत्रात अनुकूलता राहील. वरिष्ठांशी मतभेद टाळावे. मुलांची उत्तम प्रगती होईल.
- **तूळ** : व्यवसायात चिंता निर्माण होईल. विवाहाची बोलणी लांबणीवर पडतील. थोरांचा सहवास लाभेल.
- **वृश्चिक** : चैनीवर अधिक खर्च होईल. कलाकारांना मानसन्मान लाभेल. मित्र–नातलगांचं सहकार्य मिळेल.
- **धनु** : मोठी खरेदी पार पडेल. कौटुंबिक सौख्य लाभेल. यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रात उत्कर्ष साधता येईल.
- **मकर** : मनाजोग्या घटना घडतील. निराशा, औदासिन्य दूर होईल. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल.
- **कुंभ** : उत्साहाने कार्यरत रहाल. स्वकर्तृत्त्वावर यशाचे नवे टप्पे पार कराल. भावंडांशी मतभेद टाळावेत.
- **मीन** : भागीदारी व्यवसायात विचारानं रहावं. उपजत कलांना चांगला वाव मिळेल. सुखी, समाधानी रहाल.

सुगरणीचा सल्ला

## टेस्टी मँगो चीजकेक

**सामग्री –** २० गोड बिस्किटं, पाव वाटी बटर, एक टेबलस्पून पिठीसाखर, एक वाटी मँगो पल्प, एक वाटी साखर, चवीपुरतं मीठ, चार अंड्यांचा बलक, तीन टेबलस्पून जिलेटीन, दोन वाट्या क्रीम, दोन कप दही, सजावटीसाठी आंब्याच्या फोडी इत्यादी.

**कृती–** सर्वप्रथम बिस्किटांचा चुरा करून घ्यावा. त्यात बटर आणि थोडी पिठीसाखर मिसळावी. मिश्रण एकजीव करुन केकच्या भांड्यात पसरुन घ्यावं. अर्धा कप पाण्यात जिलेटिन घालून सेट करायला ठेवावं. त्यानंतर एका पातेल्यात मँगो पल्प, साखर, मीठ आणि अंड्याचा बलक ही सामग्री एकत्र करावी. हे मिश्रण मंद आचेवर एकजीव करून घ्यावं. गरम असतानाच मिश्रणात जिलेटिन मिसळून पातेलं गॅसवरून उतरवून घ्यावं. थंड झाल्यावर त्यात क्रीम घालावं. त्यानंतर दही मिसळावं. मिश्रण पुन्हा एकदा एकजीव करून घ्यावं. आता ते बिस्किटांच्या थरावर पसरून घ्यावं. एकसारखं पसरल्यानंतर केक सेट करण्यासाठी फ्रीजमध्ये ठेवावा. ८–१० तासांनी फ्रीजमधून बाहेर काढावा. सर्व्ह करताना आंब्याच्या फोडींची सजावट करावी.

## १७ मे

दिनविशेष

- **१९७२** : प्रख्यात शिल्पकार रघुनाथ कृष्ण फडके यांचं निधन.
- **२०१३** : स्पॉट फिक्सिंग प्रकरणी एस. श्रीशांत आणि अंकित चव्हाण यांनी कृत्याची कबुली दिली.
- **२०१७** : देशात दहा स्वदेशी अणुभट्ट्या उभारण्यात येणार असल्याचं जाहीर.
- **२०१८** : कर्नाटकमध्ये भाजपाने सत्तेचा घास हिरावून घेतल्यानंतर काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाने न्यायालयाचं दार ठोठावलं.

महत्त्वपूर्ण काही...

## स्नॉर्केलिंगविषयी...

चेहऱ्यावर मास्क घालावा लागतो. पाण्यात बुडी घेताना स्नॉर्केल सोबत असतं. या स्नॉर्केलमुळे आपण श्वास घेऊ शकतो. पेहरावाचा एक भाग असणारा, माश्याच्या कल्ल्यांसारखं काम करणारा पादत्राणांचा प्रकार पायात अडकवला जातो. अशा प्रकारे विविध आयुधं आणि उपकरणांनी सज्ज झाल्यानंतर आपण स्नॉर्केलिंगचं आव्हान स्विकारण्यास सज्ज होतो.

स्नॉर्केलिंग करताना आपण पाण्याच्या पृष्ठभागावरच असतो. त्यामुळे यासाठी समुद्रातल्या उथळ भागाची निवड केली जाते. पाण्याच्या पृष्ठभागावर राहून थोडं आत तोंड घालून आपण पाण्याखालचं जग न्याहाळू शकतो. माश्यांसारख्या कल्ल्यांचा वापर केल्याने पोहताना फार हालचाल करावी लागत नाही. स्कुबा डायव्हिंगमध्ये पाण्याच्या आत जावं लागतं तर स्नॉर्केलिंग करताना पृष्ठभागावर राहता येतं. त्यामुळे स्नॉर्केलिंग कोणीही करू शकतं. यासाठी फारशा प्रशिक्षणाचीही गरज नसते.

पंचांग

**शनिवार, १७ मे २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
वैशाख कृ. ५, नक्षत्र : पूर्वाषाढा
चंद्रराशी : वृश्चिक, योग : साध्य
सूर्योदय: ६.०६, सूर्यास्त: ७.०५


फॉरवर्डस

**किती बिनतोड प्रश्न विचारला आहे पहा...**
नींद चुराने वाले पूछते हैं सोते क्यों नही,
इतनी ही फिक्र है तो फिर हमारे होते क्यों नही।

आरोग्यमंत्र

## आयुर्मानाचा अंदाज

जीवनाची आसक्ती नाही असा माणूस बघायला मिळणं विरळा... आपण खूप काळ जगावं, आयुष्याचा पुरेपुर आनंद घ्यावा असं प्रत्येकाला वाटतं. मग आपण किती वर्षं जगणार हे जाणून घेण्यासाठी माणूस ज्योतिषाकडे जातो. आपल्या हातावरची आयुष्यरेषा किती लांब आहेत हे पाहतो. खरं पाहता कोण किती जगणार, कोणाचं आयुष्यमान किती याची शाश्वती कुणीही देऊ शकत नाही. पण एका रक्ततपासणीद्वारे माणूस किती वर्षं जगणार हे कळू शकतं. अर्थातच हे वाचून कुणालाही आश्चर्यच वाटेल. पण वैद्यकीय प्रगतीमुळे साध्य होऊ घातलेली ही महत्त्वपूर्ण बाब आहे. बोस्टन विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी रक्ततपासणीद्वारे आयुष्यमान सांगता येत असल्याचा दावा केला आहे. रक्त तपासणीच्या या पद्धतीचा शोध लावल्याचं त्यांचं म्हणणं आहे. हा दावा खरा असेल तर वैद्यकशास्त्राच्या दृष्टीने ही खूप मोठी बाब असेल.



मध्यंतरी एका वैद्यकीय जर्नलमध्ये हे संशोधन प्रसिद्ध झालं तेव्हा चर्चेला तोंड फुटलं. या संशोधनासाठी विविध रक्तनमुन्यांचा बायोमार्कर डाटा जमवण्यात आला होता. या रक्ताची तपासणी करण्यात आली. रक्तदात्यांच्या गेल्या आठ वर्षांतील आरोग्याची, त्यांच्या शरीरात झालेल्या बदलांची माहिती घेऊन आयुर्मानासंबंधीचे निष्कर्ष काढण्यात आले. यातून त्यांनी अनेक गोष्टी शोधल्या आहेत. चांगलं आणि वाईट असं दोन्ही प्रकारचं भवितव्य या संशोधनातून कळू शकतं, असा शास्त्रज्ञांचा दावा आहे.

टीव्ही पाहताना

✻ दोस्तांनो, विशेषत: खेळांचं थेट प्रक्षेपण पाहताना कोणी कसं खेळायला हवं होतं, एखादा चेंडू कसा टाकायला हवा होता याबाबत सल्ले दिले जातात. हे सल्ले बसून देण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती करून दाखवा. यामुळे शरीराची हालचाल होईल. ✻ शेवटच्या क्षणापर्यंत सामना बघणाऱ्यांनी मधल्या काळात दूध प्यायला हवं. गुलकंद घातलेलं दूध हा सुद्धा चांगला पर्याय आहे. ✻ सामने बघताना तुम्ही थोडा वेळ उभे राहू शकता. थोडा व्यायाम करू शकता. शरीराला ताणू शकता.

या टिप्स फॉलो केल्या तर तुमच्या लाडक्या खेळाडूंप्रमाणे तुम्हीही ॲक्टिव्ह आणि तंदुरूस्त राहाल.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### कल्याणमध्ये अपघाताचा थरार

**मुंबई :** कल्याणमध्ये भीषण अपघात झाल्याची घटा घडली आहे. कल्याणच्या बिर्ला कॉलेज रोडवर भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. मद्यधुंद कारचालकाने रस्त्यावरील ६ ते ७ वाहनांना धडक दिली आहे. या अपघातानंतर रस्त्यावर एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस देखील घटनास्थळी पोहोचले.

### मजुराला लुटणारा रिक्षाचालक जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** घरी जाणाऱ्या मजुराला तिकडे चाललो असल्याचे सांगून रिक्षातून डुक्कर खिंडीत नेऊन मारहाण करुन लुटणाऱ्या रिक्षाचालक व त्याच्या साथीदाराला वारजे माळवाडी पोलिसांनी अटक केली आहे. आदित्य राम वाघमारे (वय २३, रा. करिश्मा चौक, कोथरूड) आणि सत्येंद्र मिठाईलाल जयस्वाल (वय २०, रा. एकता कॉलनी, वारजे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. तक्रारदार १२ मे रोजी त्याचे काम आटोपून त्याच्या बावधन येथील घरी जाण्यासाठी वारजे पुलाखाली उभा होता. एका रिक्षाचालकाने त्यांना आम्ही तिकडेच चाललो आहोत असे सांगत रिक्षात बसवले. पुढे बावधनकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडवर रिक्षा थांबवली. यानंतर रिक्षाचालकासह रिक्षात आधीपासूनच बसलेल्या एका चोरट्याने त्यांना दमदाटी करत त्यांच्या खिशातील २ हजार रोख आणि एक मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतला. त्यानंतर तक्रारदाराला 'पोलिसांकडे गेलास तर मारून टाकू' अशी धमकी दिली.

# सौरऊर्जेच्या माध्यमातून दिवसा वीज

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** राज्यात पीएम-सूर्य घर: मोफत वीज योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करुन सौरऊर्जेच्या माध्यमातून वीजनिमिर्तीवर भर देण्यात येत आहे, आगामी काळात नागरिकांच्या वीज देयकात बचत करण्याच्यादृष्टीने दिवसा वीज उपलब्ध करुन देण्यास राज्यशासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

मुढाळे येथे महापारेषणच्या २२०/३३ के.व्ही. उपकेंद्राच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महापारेषणचे मुख्य अभियंता अनिल कोळप, महावितरणचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, अधीक्षक अभियंता संदीप हाके, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार गणेश शिंदे, गट विकास अधिकारी अनिल बागल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपअभियंता राजकुमार जाधव, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, बारामती सहकारी बँकेचे अध्यक्ष सचिन सातव, माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ॲड. केशवराव जगताप आदी उपस्थित होते.

पीएम-सूर्य घर: मोफत वीज योजनेअंतर्गत १ लाख ३० हजार घरांच्याकरीता ५०० मेगॉवटपेक्षा अधिक क्षमतेचे छतावर सौरसंच बसविण्यात आले आहे तसेच या योजनेअंतर्गत १ हजार कोटी रुपयापेक्षा अधिक अनुदान लाभार्थ्यांना दिले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरकुलांनाही सोलरच्या माध्यमातून वीज उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेच्या (एआय) वापरासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यासर्व प्रयत्नामुळे वीजेच्या देयकात बचत होण्यास मदत होईल.




### मुढाळे वीज उपकेंद्रामुळे परिसरातील वीजेच्या समस्या सोडविण्यास मदत होणार

● मुढाळे गावासहित परिसरातील गावांची वीजेची समस्या विचारत घेता मुढाळे येथील महापारेषणच्या २२०/३३ के.व्ही. उपकेंद्र मंजूर करण्यात आले आहे. या उपकेंद्राकरीता सुमारे ६२ कोटी ७० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहे, उपकेंद्र कार्यान्वित झाल्यानंतर मुढाळे, माळेगाव, पणदरे, सांगवी, होळ, कऱ्हावागज, कोऱ्हाळे आदी गावांना नियमित दाबाने अखंड वीजपुरवठा होण्यासह विजेचा भारही कमी होणार आहे. ही यंत्रणा नसून राज्य शासनाच्या सक्षमीकरणाची पायरी आहे, या माध्यमातून शेतकऱ्यांना वीज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

### मोहिमेअंतर्गत १ हजार कोटी रुपयांची विकासकामे मंजूर

● राज्य शासनाच्या १०० दिवस विशेष मोहिमेअंतर्गत काळानुरुप बदल विचारात घेता नागरिकांना सोई-सुविधा मिळण्याकरीता सुमारे १ हजार कोटी रुपयांची विकासकामे मंजूर करण्यात आली आहे. ही सार्वजनिक विकासकामे करीत असताना ती दर्जेदार, टिकाऊ व वेळेत पूर्ण झाली पाहिजेत, यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहे. विकास कामे करतांना समाजातील सर्व घटकांना सोबत घेवून काम करण्यात काम करण्यात येत आहे, याकामी नागरिकांनीही सहकार्य करावे. राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात येत असून नागरिकांनी या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन श्री. पवार यांनी केले.



"ग्रामीण भागातील उद्योजक, शेतकरी आणि घरगुती वापराकरिता लागणारी वीज तसेच राज्यातील वाढते औद्योगिकरण लक्षात घेता सर्व घटकांना योग्य दाबाने वीजपुरवठा झाला पाहिजे याकरीता राज्यशासनाच्यावतीने वीजेचे उपकेंद्र उभारण्यात येत आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध व्हावी याकरीता याकरीता सुमारे २४ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. शेतात सौर कृषी पंप देण्यात येत आहेत. शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या कृषी पंपाना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला असून सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना लाभ घेतला आहे.

**—उपमुख्यमंत्री अजित पवार**

# पोलीस दलात बदल; विशेष आयुक्तपद रद्द !




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर मुंबई पोलिसांच्या गुप्तचर यंत्रणेत मोठा फेरबदल करण्यात आला आहे. विशेष पोलीस आयुक्तपद रद्द करून, त्याऐवजी गुप्तचर विभागासाठी स्वतंत्र सहपोलीस आयुक्ताचे पद निर्माण करण्यात आले आहे. या नव्या सहआयुक्त पदावरून आता विशेष शाखा थेट पोलीस आयुक्तांना अहवाल देणार, जे यापूर्वी कायदा-सुव्यवस्थेच्या सहआयुक्तांना देत होते. यामुळे स्लीपर सेल्सवर अधिक बारकाईने लक्ष ठेवणे, गुप्त माहिती तात्काळ वरिष्ठांपर्यंत पोहोचवणे आणि वेळेवर कारवाई करणे शक्य होणार आहे. पंतप्रधान व अन्य केंद्रीय मंत्री वारंवार मुंबईला येत असल्याने, या नव्या पदाची गरज होती, असे राज्य सरकारचे म्हणणे आहे. यामुळे शहराच्या अंतर्गत सुरक्षेला नवे बळ मिळणार आहे.

सध्या मुंबईत कायदा व सुव्यवस्था, गुन्हे, आर्थिक गुन्हे, वाहतूक आणि प्रशासन या विभागांमध्ये ५ सहआयुक्त होते. आता 'गुप्तचर' विभागासाठी स्वतंत्र सहआयुक्त नेमणार आहे. राज्य सरकारच्या आदेशानुसार, विशेष पोलीस आयुक्त (ADG दर्जा) हे पद आता रद्द करण्यात आले असून, त्याऐवजी नवीन सहआयुक्त (IGP दर्जा) नेमले जाणार आहेत. देवेन भारती यांच्या वरिष्ठ नियुक्तीनंतर रिक्त असलेले पद यासाठी वापरले जाणार आहे.

**नवे नियम**

या अटी पूर्ण केल्यास, हवालदारांना किरकोळ गुन्ह्यांचा तपास करण्याचा अधिकार मिळणार आहे. यामुळे ग्रामीण पोलीस ठाण्यांवरील ताण कमी होईल आणि तपास प्रक्रियाही जलद होईल. दरम्यान, मुंबई पोलीस दलात गुप्तचर विभाग अधिक बळकट होणार आहे, तर दुसरीकडे राज्यातील तपास व्यवस्था अधिक कार्यक्षम केली जात आहे. पोलिसांची ही नवी वाटचाल, सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

"या नव्या गुप्तचर सहआयुक्ताचे काम फक्त नजर ठेवणे नाही, तर दहशतवादी कृत्यांची आगाऊ सूचना देणे हे प्रमुख काम असणार आहे." राज्य सरकारने आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेत पोलीस हवालदारांनाही तपासाचे अधिकार बहाल केले आहेत. ग्रामीण भागात अधिकाऱ्यांची कमतरता आणि वाढते गुन्हे लक्षात घेऊन, सरकारने हा निर्णय घेतला आहे.

**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

# डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतले शनी दर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शनिशिंगणापूर :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शनिशिंगणापूर येथे श्रद्धाभावाने शनी महाराजांचे दर्शन घेतले. दर्शनानंतर त्यांनी मंदिर परिसरात सुरळीत सुरु असलेल्या व्यवस्थेची पाहणी केली आणि ग्रामस्थ व मंदिर विश्वस्त मंडळाशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुविधा, स्वच्छता आणि सुरक्षेबाबत समाधान व्यक्त केले. डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, शनिशिंगणापूर हे श्रद्धास्थान असून येथे येणाऱ्या भाविकांची सेवा ही अत्यंत महत्त्वाची आहे. मंदिर परिसरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी त्यांच्या भेटीनिमित्त नेवासा मतदार संघाचे शिवसेना आमदार विठ्ठल लंघे, स्थानिक पदाधिकारी, ग्रामस्थ व महिला प्रतिनिधी उपस्थित होते.

# अजित पवार यांच्याकडून महाराष्ट्राच्या युवा संघाचे अभिनंदन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रानं 58 सुवर्ण, 47 रौप्य, 53 कांस्य असं एकूण 158 पदकांची लयलूट करत 'खेलो इंडिया युवा स्पर्धे'त सलग तिसऱ्यांदा अव्वल स्थान मिळविलं. स्पर्धेच्या विजेते पदाची हॅटट्रिक ही राज्याच्या क्रीडा क्षेत्राच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी असल्याचं सांगत उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या पथकातील खेळाडू व सर्व सदस्यांचं अभिनंदन केलं आहे. सर्व पदक विजेत्या खेळाडूंच्या कामगिरीत उत्तरोत्तर प्रगती होत राहील, असा विश्वास व्यक्त करीत त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

'खेलो इंडिया युवा स्पर्धे'तील यशाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, बिहारमध्ये झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रानं केलेली नऊ स्पर्धा विक्रमांची नोंद कौतुकास्पद आहे. स्पर्धेतल्या 27 पैकी 22 खेळांमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकं जिंकली. ॲथलेटिक्समध्ये महाराष्ट्राला सर्वाधिक दहा सुवर्णपदकं मिळाली. जलतरण स्पर्धेत सात सुवर्ण पदकांसह महाराष्ट्रानं 29 पदकं जिंकली. राज्याला जिम्नॅस्टिक्स आणि नेमबाजीत प्रत्येकी सहा, वेटलिफ्टिंगमध्ये पाच तसंच कुस्ती, सायकलिंग, नेमबाजीचीही सुवर्णपदकं मिळाली. या युवा खेळाडूंच्या कामगिरीतून प्रेरणा घेऊन अधिकाधिक युवक खेळांकडे वळतील. परिश्रमानं उत्तम खेळाडू बनतील. राज्याच्या क्रीडा संस्कृतीला समृद्ध आणि राज्याला निरोगी, सुदृढ ठेवण्यासाठी ही कामगिरी मदत करेल, असा विश्वास व्यक्त करीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व खेळाडूंना त्यांच्या उज्ज्वल कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेला कळविण्यात येते की, हॉटेल पिंजरा एफ एल ३ अनुज्ञाप्ती क्र. १०१७ लांडेवाडी, भोसरी, ता. हवेली, जि. पुणे या अनुज्ञाप्तीचे अनुज्ञाप्ती धारक कै. महेश वसंत लोंढे यांचे निधन झाल्यामुळे श्रीमती कविता महेश लोंढे यांचे नावे अनुज्ञाप्ती वर्ग करण्याबाबत मा. अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क पुणे, यांचे कार्यालयात अर्ज प्राप्त झालेला आहे. तरी सदरचे अनुज्ञाप्ती वर्ग करण्यास कोणाचाही आक्षेप अथवा तक्रार असल्यास त्याबाबत योग्य त्या पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसांच्या आत मा. अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क पुणे, कार्यालय पत्ता - १६ / ए, साधु वासवानी रोड, हॉटेल लेमन ट्री समोर, पुणे ४११००१ येथे लेखी आक्षेप अथवा तक्रार नोंदवावी तसेच विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या तक्रार किंवा आक्षेप ग्राह्य धरली जाणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.

**मा. अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क पुणे,**


पान १ वरून

## कोट्यावधींचा 'महागफला'

योजना, विमा योजना, साप्ताहिक सुट्टीसह आजारपणाच्या रजा आणि अन्य रजांचा लाभ द्यावा असे बंधनकारक करण्यात आले आहे. विशेष म्हणजे तीनही वीजकंपन्यांनी ठेकेदारांशी करार करताना या बाबी त्यांना बंधनकारक केल्या आहेत. विशेष म्हणजे या नियमांची अंमलबजावणी व्यवस्थित होते अथवा नाही याची देखरेख करण्याची जबाबदारी तेथील कार्यालय प्रमुखांवर सोपविण्यात आली आहे, त्यामधे हलगर्जीपणा आढळल्यास संबधितांवर थेट निलंबनाची कारवाई करण्याचा इशारा या कराराद्वारे देण्यात आलेला आहे.

मात्र; हे वास्तव असतानाही बहुतांशी ठेकेदार या नियमांचे उल्लघंन करत असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. या ठेकेदारांनी कामगारांच्या पगारातून भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपात केली आहे, परंतु ही रक्कम या कार्यालयात जमाच केलेली नाही. यासंदर्भात कामगार संघटनांनी ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे.

## महायुतीच्या वाटेवर ' ....

नियुक्त केलेले ठेकेदार रिझल्ट देत नसतील, तर त्यांना काळ्या यादीत टाकावे. तसेच ठेकेदार किंवा अधिकारी जे जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी . आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर मोहोळ यांनी केल्या जाणाऱ्या कामाचा आढावा महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांच्यासह विविध विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत घेतला. यावेळी आमदार भीमराव तापकीर, आमदार हेमंत रासने, भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे, गणेश बिडकर, श्रीनाथ भिमाले यांच्यासह माजी नगरसेवक उपस्थित होते. बैठकीबाबत माहिती देताना मोहोळ म्हणाले, 'चेंबर साफसफाई, अतिक्रमण काढणे, नाले रुंदीकरण आदी कामाचा आढावा घेण्यात आला. पावसाने कुठे पाणी साठून नागरिकांना त्रास सहन करावा लागतो त्या जागेवर उपाययोजना करण्याचे सूचना मनपाला दिल्या आहे. पुण्यात ८७५ किलोमीटरचे एकूण नाले आहे. त्याबाबत सफाई तपासणी मनपाकडून करण्यात येत आहे. पावसाळापूर्व कामात सुसूत्रता येण्यासाठी सर्व विभागाकडून एकत्रित काम केले जाईल. नालेसफाईचे यंदा २३ टेंडर मनपाने काढली असून पावसाळी कामाबाबत १५ टेंडर काढून कामे करण्यात येत आहे. जे ठेकेदार कामाची निविदा घेऊन प्रत्यक्ष काम करत नाही, अशा तक्रारी काही तक्रारी आमच्याकडे प्राप्त झालेले आहेत. यापुढे अशी गोष्ट कुठे दिसल्यास संबंधित ठेकेदारांना काळया यादीत टाकले जाईल. शिवाय ठेकेदार किंवा अधिकारी दोषी असतील तर त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात येणार आहे.

## वानखेडेवर शरद पवार नावाचे स्टॅन्ड

यांच्या आठवणी जागवत त्यांनी देखील अल्पवधीतच एमसीए आणि क्रिकेटसाठी लक्षात राहील असं काम केले आहे. भारतीय क्रिकेट विकसित करणाऱ्या प्रशासकांमध्ये पवार साहेबांचं नाव अग्रणी असेल. एमसीए, बीसीसीआय आणि आयसीसीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेलं काम हे मोठं आहे, असेही फडणवीसांनी म्हटलं.

### संजय राऊत यांच्या पुस्तकातील दाव्याने खळबळ

# घामाघुम अमित शहा मातोश्रीच्या दारात ताटकळत होते !



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुंबई: संजय राऊत यांनी जेलमध्ये असताना लिहिलेले नरकातील स्वर्ग या पुस्तकात त्यांनी गृहमंत्री अमित शहा यांच्या भूतकाळातील काही घटनांवर भाष्य केले आहे. अमित शहा हे लहान जय शहा याला घेऊन मातोश्रीच्या दारात घामाघुन होऊन ताटकळत उभे होते . बाळासाहेब ठाकरे यांनी फोन केला म्हणून ते वाचले. असे अनेक धक्कादायक दावे या पुस्तकात करण्यात आले आहेत.

नरकातला स्वर्ग या पुस्तकात पुढे शिवसेना आणि बाळासाहेब ठाकरे यांनी मोदी आणि अमित शाह यांना केलेली मदत त्याची विस्तृत माहिती संजय राऊत यांनी मांडली. संपूर्ण देश तेव्हा मोदींच्या विरोधात होता. परंतु ठाकरे, शिवसेना आणि सामना मोदींच्या बाजूने उभे राहिला. मात्र त्याच मोदींनी पुढे शिवसेना असुरी पद्धतीने फोडली. अमित शाह यांना सुद्धा बाळासाहेब ठाकरे यांनी चौकटी बाहेर जाऊन मदत केली. अमित शाह गुजरातच्या दंगलीनंतर प्रचंड अडचणीत होते. केंद्रात यूपीएचे सरकार होते आणि दंगलीतील काही निर्घृण गुन्ह्यांचा तपास सीबीआयकडे सोपवला होता. यावेळी नरेंद्र मोदी यांना अमित शाह यांना मदत करता येत नव्हती. अमित शाह गुजरातमधून तडीपार होतेच. सीबीआयने फास आवळल्याने अमित शाह यांच्या तात्पुरत्या जामीनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. अडचणीत अडकलेल्या अमित शहा यांना एकच माणूस मदत करू शकतो ते म्हणजे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असं शाह यांना कोणीतरी सुचवले. एके दिवशी भर दुपारी ते लहान जय शाह यांना घेऊन मुंबई विमानतळ उतरले आणि विमानतळावरून काळी पिवळी टॅक्सी पकडून ते बांद्राच्या दिशेने निघाले. मात्र मातोश्रीच्या आणि कलानगर परिसराला छावणीचे स्वरूप प्राप्त झाल्याने कलानगरचे मुख्य गेटवरच अमित शाह यांना अडवून ठेवण्यात आले. कारण त्यावेळी मातोश्रीची सुरक्षा व्यवस्था अनेक अडथळ्यांची होती. अमित शाह घामाघूम होऊन बराच काळ प्रतीक्षेत होते. दुसऱ्या दिवशी अमित शाह पुन्हा एकदा मातोश्रीवर आले. यावेळी शिवसेनाप्रमुखांनी त्यांना संध्याकाळची वेळ दिली आणि अमित शाह हे मातोश्रीवर गेले.

अमित शाह दर्दभरी कहानी सांगत म्हणाले, आप बात करेंगे तो... गुजरात दंगलीत हिंदुत्वासाठी केलेल्या कामाची शिक्षा आपण व आपले कुटुंब भोगत असल्याची दर्दभरी रोमांचक कहानी शिवसेनाप्रमुखांना सांगितले . "मी अडचणीत आहे अमुक अमुक न्यायमूर्तीसमोर केस सुरू आहे तडीपारी आहे वगैरे..." अमित शहा यांनी बाळासाहेब ठाकरे यांना सांगितलं. त्यानंतर अमित शाह बाळासाहेब यांना म्हणाले." आप बात करेंगे तो न्यायमूर्ती आपकी बात मान लेंगे...तुमचा शब्द ते खाली पडू देणार नाहीत" त्यानंतर बाळासाहेब ठाकरे यांनी मनोहर जोशी यांच्या फोनवरून अमित शाह यांचे प्रकरण ज्यांच्याकडे होते त्यांना फोनवरून बोलले आणि त्यांचे शेवटचे "तुम्ही कोणतेही पदावर बसलेले असा पण तुम्ही ही हिंदू आहात हे विसरू नका"... बाळासाहेब ठाकरे यांच्या एका फोनने अमित शाह यांच्या जीवनातल्या आणि राजकीय प्रवासतल्या बहुतेक अडचणी दूर झाल्या. त्यामुळे त्यानंतर अमित शाहा यांनी पुढे काय केलं हे साऱ्या जगाने पाहिलं आणि शिवसेना आणि ठाकरे कुटुंबीयांशी ते निर्घृणपणेचं वागण्याची भावना या पुस्तकातून संजय राऊत यांनी व्यक्त केली. ईडी कोठडी संपून न्यायालय कोठडी म्हणजे आर्थर ऊर्जेच्या दिशेने जाताना संजय राऊत आणि हे सगळं आठवड्याचं या पुस्तकात सांगितलं.

## माजी एअर मार्शलने केला पाकिस्तानचा ...

सुरक्षित करण्यास सुरुवात केली. हे क्षेपणास्त्र थेट भोलारीवर आले आणि एका हँगरवर आदळले. जिथे आमचे AWACS विमान होते तिथे त्याचे नुकसान झाले. सोबतच काही लोक शहीदही झाले.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने पाकिस्तानला प्रत्युत्तर दिले. त्याने पाकिस्तानचे 5 लढाऊ विमान पाडले. यामध्ये दोन जेएफ 17 आणि एक मिराज लढाऊ विमानांचा समावेश होता. भारताने पाकिस्तानचे लष्करी तळही उद्ध्वस्त केले. दरम्यान, या कारवाई मध्ये पाकिस्तानी हवाई दलाचे झालेले नुकसानाची माहिती समोर आली आहे.

नूरखान एअरबेसवर जळत असलेले पाकिस्तानी हवाई दलाचे सी-130 विमान. व्हिडिओमध्ये आणखी एक C-130 उभे असल्याचे दिसत आहे. त्याचे किती नुकसान झाले आहे हे स्पष्ट नाही.


### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the Public at large that, my client namely Mrs. Munira Sabuwala, the undersigned Principal, do hereby revoke in its entirety General Power of Attorney which was executed and registered on 21/11/2023 at the office of Sub Registrar Haveli No. 12, Pune under Registration Serial No. 22119 in favour of Mr. Mustafa Ebrahim Sabuwala in respect of property being i) Shop No.3 and 4 on Ground Floor in the building known as Prime Avenue, situated at Kondhwa Khurd, Taluka Haveli, District Pune, ii) Shop No.2 on Ground Floor in the building known as Dorabjee Enclave situated at Kondhwa Khurd iii) Shop No. 2 on Ground Floor in the building known as Rose Avenue situated at Kondhwa Khurd iv) Shop No.10 on Ground Floor, in the building known as Tain Square situated at Wanawadi v) Shop No.5 on Ground Floor in the building known as Maurya Apartment, situated at Kondhwa Khurd vi) Flat No.902 on Ninth Floor in the project known as G N Satellite Complex situated at Wanawadi at Pune.

My client namely Mrs. Munira Sabuwala is hereby revoking, cancelling and making void the said General Power of Attorney therein given, for all matters granted to such Attorney/Agent namely Mr. Mustafa Ebrahim Sabuwala. Nothing herein shall affect any actions taken by my Attorney after the publication of this notice for revocation of General Power of Attorney. Therefore in case any person / institution enters into any transaction with Mr. Mustafa Ebrahim Sabuwala in respect of abovementioned properties, then my client namely Mrs. Munira Sabuwala will not be held responsible for any transactions done by Mr. Mustafa Ebrahim Sabuwala and thus any transaction done in respect of abovementioned properties with Mr. Mustafa Ebrahim Sabuwala will be invalid in respect of abovementioned properties.

**Adv. Rakhi Khandelwal**
**Office at: Office No.204, Second Floor, Classic Chambers Old Topkhana Rd, Shivajinagar, Pune 411 005**
**Mobile No. 9970799391**
**Place : Pune**
**Date : 17.05.2025**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, कै. सौ. रोहिणी संजय देशमुख रा. मलठण फाटा शिक्रापूर ता.शिरूर, जि. पुणे पिन ४१२२०८ यांचे ७/११/२०१८ रोजी निधन झाले. त्यांच्या नावे आरटीओ पुणे येथे नोंद असलेली दुचाकी ॲक्टिव्हा होंडा क्र. MH-12 GU 4734 असा आहे. तरी त्यांच्या पश्चात कायदेशीर वारसदार म्हणून मी त्यांचा पती श्री. संजय काशिनाथ देशमुख रा. मलठण फाटा, शिक्रापूर ता. शिरूर, जि.पुणे पिन -४१२२०८ आहे, तरी सदरील दुचाकी वाहन माझ्या नावावर करण्या करिता आरटीओ पुणे येथे अर्ज करीत आहे. याबाबत कोणाची काही हरकत, सबब, तक्रार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १५ दिवसात लेखी पुराव्यासह करावी अन्यथा मागाहून कोणाची कसलीही तक्रार, सबब हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. आज दि.१४/५/२०२५

**ठिकाण : शिक्रापूर**

**अर्जदार : श्री संजय काशिनाथ देशमुख**
रा. मलठण फाटा शिक्रापूर
ता.शिरूर, जि.पुणे पिन -४१२२०८

### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळविण्यात येते की, श्रीमती शांता अश्रुबा वनवे, राहणार शिवशक्ती नगर कॉलनी २, लांडगे वस्ती, भोसरी, पुणे ४११०३९ पुणे यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असलेले वाहने MH14- JU1194 व MH14HU1380 सदर चार चाकी वाहने त्यांची एकमेव कायदेशीर वारसदार पती श्री. आश्रुबा रामराव वनवे यांच्या नावावर पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयात करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत कार्यालयात कळवावे अन्यथा कोणाची काही तक्रार नाही हे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१६/०५/२०२५

**आश्रुबा रामराव वनवे**
शिवशक्ती नगर कॉलनी
२ लांडगे वस्ती भोसरी पुणे
पुणे-४११०३९

### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळविण्यात येते की, सुखदेव बापू नाणेकर मुक्काम पोस्ट निघोजे, तालुका खेड, जिल्हा पुणे ४१०५०१ यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असलेले MH14LJ6300 सदर चार चाकी वाहन त्यांची एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी सुरेखा सुखदेव नाणेकर यांच्या नावावर पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयात करण्यात येणार असून याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत कार्यालयात कळवावे अन्यथा कोणाची काही तक्रार नाही, हे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१६/०५/२०२५

**सुरेखा सुखदेव नाणेकर**
मुक्काम पोस्ट निघोजे
तालुका खेड जिल्हा पुणे ४१०५०१

## धावत्या रिक्षात प्रवाशांना लुटणाऱ्यांना अटक



**नवी दिल्ली :** चालत्या वाहनात प्रवाशांना बेशुद्ध करून लुटणाऱ्या रिक्षाचालक आणि त्याच्या साथीदाराला पोलिसांनी अटक केली आहे. राजा (२७) आणि सोनू (३४) अशी आरोपींची नावे असून ते जुन्या दिल्ली रेल्वे स्थानकावरून रिक्षातून एकटे प्रवासी घेऊन जात असत. रिक्षा निर्जन जागी पोहोचल्यानंतर हल्लेखोर अचानक प्रवाशाला पकडून बेशुद्ध होईपर्यंत त्याचा गळा दाबून पकडत असत. त्यानंतर पीडितेचे सर्व सामान लुटून रस्त्याच्या कडेला फेकून दिले जात असे, अशी माहिती पोलिस उपायुक्त (उत्तर) राजा बांठिया यांनी दिली.

## हिमाचलच्या सोलन जिल्ह्यात बस पलटली



**शिमला :** हिमाचल प्रदेशातील सोलन जिल्ह्यात शुक्रवारी सकाळी हिमाचल रस्ते परिवहन महामंडळाची (एचआरटीसी) बस उलटून झालेल्या अपघातात शाळकरी मुलांसह १५ हून अधिक जण जखमी झाले. अर्कीतील शीलघाटयेथून शिमलाकडे जात असताना सारियांग गावाजवळ ३० हून अधिक प्रवाशांना घेऊन बसचा प्रेशर पाईप फुटल्याने हा अपघात झाला, असा दावा प्रवाशांनी केला आहे. चालकाने प्रवाशांना वाचविण्यासाठी बस टेकडीवर आदळली आणि बस टेकडीवर आदळून उलटली. मात्र, अपघाताचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली.

## आंध्रमध्ये वादळी वारे, मुसळधार पाऊस



**अमरावती :** आंध्र प्रदेशातील काही भागात १६ ते २० मे दरम्यान वादळी वाऱ्यासह ताशी ६० किमी वेगाने वादळी वारे वाहतील, असा अंदाज भारतीय हवामान शास्त्र विभागाने वर्तवला आहे. उत्तर किनारपट्टीआंध्र प्रदेश (एनसीएपी), यनम, दक्षिण किनारपट्टी आंध्र प्रदेश (एससीएपी) आणि रायलसीमा च्या तुरळक भागात वादळी वाऱ्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. शुक्रवारी याच भागात आणि शनिवारी एनसीएपी आणि यानमच्या तुरळक भागात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने प्रसिद्धीपत्रकाद्वारे व्यक्त केली आहे.

## केरळच्या कोचीमध्ये तिरंगा यात्रा

**कोची :** गेल्या महिन्यात पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले दिवंगत एन. रामचंद्रन यांचे कुटुंबीय आणि प्रमुख व्यक्तीं नी शुक्रवारी तिरंगा यात्रेचे आयोजन केले होते. केंद्र सरकारने २०१९ मध्ये जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा काढून घेतल्यानंतर पहलगाम ची घटना हा काश्मीरमधील पहिला मोठा नागरी दहशतवादी हल्ला होता. मल्याळम चित्रपट अभिनेते-दिग्दर्शक मेजर रवी यांच्या हस्ते या यात्रेचे उद्घाटन करण्यात आले.


## पाटण्यात फक्त महिलांसाठी बस

**पाटणा :** बिहारमधील महिलांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवास मिळावा यासाठी बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी शुक्रवारी राज्य परिवहन महामंडळाच्या २० गुलाबी बसेसना हिरवा झेंडा दाखवला. राज्यातील सार्वजनिक वाहतुकीचा दर्जा सुधारण्यासाठी बिहार राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (बीएसआरटीसीएल) १६६ डिलक्स बसेसचे अनावरण ही त्यांनी केले. पाटणा येथील मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि विजयकुमार सिन्हा, परिवहन मंत्री शीला कुमारी, संसदीय कार्यमंत्री विजयकुमार चौधरी आणि राज्य सरकारचे अनेक अधिकारी उपस्थित होते.

# भारतीयांच्या पैशांवर ट्रम्प यांचा डोळा

## अमेरिकेबाहेर पैसे पाठवण्यावर मोजावे लागणार अतिरिक्त शुल्क

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेत काम करणाऱ्या विदेशी नागरिकांनी आपल्या कुटुंबियांना, नातेवाईकांना किंवा त्यांच्या देशात पाठवलेल्या पैशांवर भरमसाठ कर लावण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. म्हणजेच अमेरिकेतून परदेशात पाठवलेल्या पैशांवर रेमिटन्स टॅक्स लावण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावामुळे तेथे काम करणाऱ्या लाखो परदेशी नागरिकांची चिंता वाढली आहे. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास भारताचे दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे नुकसान होऊ शकते.

अमेरिकेच्या संसदेत 'द वन बिग ब्युटीफुल बिल' नावाचे ३८९ पानांचे विधेयक मांडण्यात आले आहे. जे लोक अमेरिकेचे नागरिक नाहीत आणि अमेरिकेबाहेर पैसे पाठवत आहेत अशा लोकांना पाठविलेल्या सर्व रेमिटन्सवर ५ टक्के कर लावण्याचा प्रस्ताव या विधेयकात आहे. हे विधेयक अनिवासी भारतीयांसह अनेक परदेशी लोकांसाठी मोठा धक्का ठरू शकते, जे नियमितपणे भारतात आपल्या कुटुंबियांना पैसे पाठवतात किंवा त्यांच्या देशात नियमित गुंतवणूक करतात.

हे विधेयक ट्रम्प काळातील करकपात सुरू ठेवण्यासाठी आणि फेडरल खर्चात कपात करण्याच्या उद्देशाने एक वित्तीय पॅकेज असले, तरी विधेयकात पृष्ठ ३२७ वर रेमिटन्सवर ५% कराचा उल्लेख आहे, जो थेट बिगर-अमेरिकन लोकांना लक्ष्य करतो. अमेरिका हे केवळ भारतीय डायस्पोराचे जगातील सर्वात मोठे केंद्र नाही तर भारतात पैसे पाठविण्याचा सर्वात मोठा स्त्रोत आहे.

भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, अमेरिकेत सुमारे ४.५ दशलक्ष भारतीय स्थलांतरित आहेत, ज्यात सुमारे ३.२ दशलक्ष भारतीय वंशाच्या व्यक्तींचा समावेश आहे. यातील बहुतेक लोक एकतर एच-१बी व्हिसावर किंवा एल-१ सारख्या तात्पुरत्या वर्क व्हिसावर अमेरिकेत राहत आहेत किंवा हे लोक ग्रीन कार्डधारक आहेत ज्यांनी अद्याप अमेरिकन नागरिकत्व मिळवलेले नाही. अमेरिकेने प्रस्तावित रेमिटन्स टॅक्स लावला तर त्याचा भारतावर मोठा परिणाम होऊ शकतो.

### दरवर्षी १.६ अब्ज डॉलरचे नुकसान

● रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दिलेल्या माहितीनुसार, २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताला जागतिक स्तरावर ११८.७ अब्ज डॉलरचा परकीय निधी प्राप्त झाला असून, त्यापैकी सुमारे २८ टक्के म्हणजे ३२ अब्ज डॉलर एकट्या अमेरिकेतून आले आहेत. अमेरिकेने सूट किंवा कपात न करता नेमका ५ टक्के प्रस्तावित रेमिटन्स टॅक्स लागू केल्यास अमेरिकेत राहणाऱ्या भारतीय स्थलांतरितांना वार्षिक १.६ अब्ज डॉलरच्या अतिरिक्त कराला सामोरे जावे लागणार आहे.

### पैसे पाठवताना कर वजावट

● अमेरिकेत राहणारा कमावणारा व्यक्ती आपल्या वृद्ध आई-वडिलांची काळजी, जेवण किंवा आरोग्यखर्च म्हणून देशाला पाठवणारी ही रक्कम असेल. किंवा काही लोक भारतीय रिअल इस्टेट किंवा म्युच्युअल फंडात माफक गुंतवणूक करतात. या सर्व कामांसाठी पाठविलेल्या पैशांवर ५ टक्के कर आकारण्याची तयारी ट्रम्प प्रशासन करत आहे. प्रस्तावित विधेयकात म्हटले आहे की, रेमिटन्स सेवा प्रदात्याकडून पैसे पाठविताना ५ टक्के कर आकारला जाईल, ज्यामुळे पारंपारिक बँक हस्तांतरण आणि एनआरई/एनआरओ खाते व्यवहार या दोन्हींवर परिणाम होईल.

# शशी थरूर यांच्यावर मोठी जबाबदारी

## दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या पाकचा बुरखा फाडण्याचे काम

केरळमधील तिरुवनंतपुरमचे खासदार शशी थरूर यांनी पक्षाविरोधात केलेल्या वक्तव्यामुळे काँग्रेसमध्ये टीकेची झोड उठली आहे. दरम्यान, केंद्रातील मोदी सरकार थरूर यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवणार आहे. खरे तर दहशतवादाबाबत पाकिस्तानच्या सत्यतेची जगाला जाणीव करून देण्याची योजना सरकारने आखली आहे. त्यासाठी थरूर यांना महत्त्वाची भूमिका देण्यात येणार आहे.







■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** नुकत्याच झालेल्या काँग्रेसच्या बैठकीनंतर सूत्रांनी सांगितले होते की, शशी थरूर यांनी भारत आणि पाकिस्तानच्या मुद्द्यावर आपल्या वक्तव्यांनी लक्ष्मणरेषा ओलांडली आहे.

माध्यमातील माहितीनुसार, परराष्ट्र विषयक संसदीय समितीचे प्रमुख शशी थरूर यांच्याकडे बहुपक्षीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी दिली जाणार आहे. त्यासाठी सरकारने थरूर यांच्याशी संपर्कही साधला आहे. विशेषत: अमेरिकेत त्यांनी शिष्टमंडळाचे नेतृत्व करावे, अशी थरूर यांची इच्छा असल्याचे सूत्रांनी सांगितले. ते परराष्ट्र विषयक स्थायी समितीचे अध्यक्ष आहेत.

मात्र, त्यासाठी सरकारला आधी काँग्रेस पक्षाशी संपर्क साधून सल्लामसलत करावी लागेल, असे त्यांनी सरकारला सांगितले आहे. यामध्ये अनेक शिष्टमंडळे तयार केली जाणार आहेत, जी परदेशात जाऊन दहशतवादावर इतर देशांसमोर पाकिस्तानचा पर्दाफाश करतील. प्रत्येक शिष्टमंडळात पाच ते सहा खासदार असू शकतात. त्यात परराष्ट्र मंत्रालयाचा एक प्रतिनिधी आणि एक सरकारी अधिकारीही असेल. सरकारने खासदारांना परदेश प्रवासासाठी लागणारे पासपोर्ट आणि कागदपत्रे तयार असल्याची खात्री करण्यास सांगितले आहे. परराष्ट्र मंत्रालयाकडून या दौऱ्याचे समन्वयन केले जात आहे. हे शिष्टमंडळ २२ मे च्या सुमारास रवाना होऊन पुढील महिन्यात ३-४ जूनपर्यंत परतयेण्याची शक्यता आहे. त्यात सरकार विविध पक्षांच्या खासदारांना पाठवणार आहे. काँग्रेस नेते मनीष तिवारी, अमरसिंह, शिवसेनेच्या प्रियांका चतुर्वेदी, भाजपचे समिक भट्टाचार्य, बीजदचे सस्मित पात्रा, शिवसेनेचे श्रीकांत शिंदे, शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे यांची नावे आहेत.

### 'थरूर यांनी लक्ष्मणरेषा ओलांडली'

● काँग्रेस खासदार शशी थरूर गेल्या काही काळापासून विविध मुद्द्यांवर सरकारच्या धोरणांचे समर्थन करत आहेत. काँग्रेस सूत्रांनी बुधवारी सांगितले की, पक्षातील प्रत्येकाला आपले मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे, परंतु थरूर यांनी भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या मुद्द्यावर नुकत्याच केलेल्या वक्तव्याने लाल रेषा ओलांडली आहे. या विषयावर वैयक्तिक मत व्यक्त करण्याऐवजी पक्षाची बाजू मांडण्याच्या सूचना हायकमांडने नेत्यांना दिल्याचेही सूत्रांनी सांगितले. मात्र, थरूर यांनी दुसऱ्याच दिवशी ही अटकळ फेटाळून लावली. थरूर म्हणाले की, त्यांना प्रसारमाध्यमांद्वारे याची माहिती मिळाली आणि प्रसारमाध्यमांनी कोणत्याही आधारावर हे खोटे दावे केले.

# भारताच्या प्रकल्पांची पाकने घेतली धास्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या दुसऱ्याच दिवशी भारताने पाकिस्तानसोबतचा सिंधू पाणी करार सहा दशके थांबवण्याची घोषणा केली होती. सिंधूसह सर्वच नद्यांचे पाणी वळविण्यासाठी कोणतीही नवी व्यवस्था करण्यात आली नसल्याने या कराराचा पाकिस्तानवर फारसा परिणाम झालेला नाही. पण भारत ज्या प्रकारे नवीन प्रकल्पांवर काम करत आहे, त्यामुळे पाकिस्तानात भीती पसरली आहे. दरम्यान, भारताकडून चिनाब नदीवर बांधण्यात आलेल्या कालव्याची लांबी दुप्पट केली जाऊ शकते, अशी चिंता पाकिस्तानी माध्यमांनी व्यक्त केली आहे. सध्या या कालव्याची लांबी १२० किमी आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास पाणीटंचाईला सामोरे जावे लागेल, अशी भीती पाकिस्तानला आहे.

'नवीन सिंधू नदी प्रकल्पाद्वारे पाकिस्तानचा पाणीपुरवठा कमी करण्याची योजना' असे पाकी माध्यमांनी म्हटले आहे. या बातमीत सूत्रांच्या हवाल्याने म्हटले आहे की, चिनाब नदीवर या कालव्याचा विस्तार केल्यास भारत दर सेकंदाला १५० घनमीटर पाणी वळवू शकेल.

चिनाब नदीच्या पाण्याचा वापर पाकिस्तानातील पंजाबमध्ये शेती सिंचन आणि जलसिंचनासाठी मोठ्या प्रमाणात केला जातो. भारतात शस्त्रसंधी झाल्यानंतरही त्यावर मंथन सुरू असल्याचे पाकिस्तानी सूत्रांचे म्हणणे आहे. पाकिस्तानात या कालव्याच्या विस्तारीकरणाचा प्रकल्प किती चिंताजनक ठरणार आहे, हे अहवालातून स्पष्ट होऊ शकते.

### पाकिस्तानचे आवाहन; सिंधू पाणी कराराचाही उल्लेख

● या कालव्याच्या विस्ताराबाबत भारताने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नसली तरी पाकिस्तानात भीतीचे वातावरण आहे. जोपर्यंत पाकिस्तानचे दहशतवादाचे धोरण कायम राहील तोपर्यंत सिंधू जल करार स्थगित राहील, असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी गुरुवारी स्पष्ट केले. हा करार थांबवल्याने पाकिस्तान हताश झाला आहे. पाणी वळवले तर ते युद्धसदृश कृत्य ठरेल, असे त्यांचे म्हणणे आहे. सिंधू आणि तिच्या उपनद्यांच्या पाण्यामुळे पाकिस्तानची ८० टक्के शेती सिंचनाखाली येते. भारतातून धरणे, कालवे वगैरे बांधायला वेळ लागेल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

# ओमर अब्दुल्ला यांची मेहबुबा मुफ्तींवर टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी पीडीपी प्रमुख मेहबूबा मुफ्ती यांच्यावर जोरदार टीका केली आहे. प्रसिद्धी आणि पाकी जनतेला त्या खूश करत असल्याचा आरोप करत, मुफ्ती यांनी सत्याकडे कानाडोळा केल्याचा आरोप ओमर अब्दुल्ला यांनी केला. सिंधू जल करार हा जम्मू-काश्मीरच्या जनतेचा सर्वात मोठा विश्वासघात असल्याचे ओमर यांनी म्हटले आहे. या कराराला मी नेहमीच विरोध केला आहे आणि यापुढेही करत राहीन, असे ते म्हणाले. अन्यायकारक कराराला विरोध करणे म्हणजे युद्धउन्माद अजिबात नाही, हे निश्चित, असेही ते म्हणाले आहेत.

ओमर अब्दुल्ला यांनी म्हटले आहे की, सिंधू जल करारात सर्वात जास्त नुकसान जम्मू-काश्मीरच्या जनतेचे झाले आहे, हे आपण मान्य करण्यास नकार देत आहात. मी याला नेहमीच विरोध केला आहे आणि यापुढेही करत राहीन. जम्मू-काश्मीरमधील जनतेला त्यांच्या वाट्याच्या पाण्यापासून वंचित ठेवण्याचा हा ऐतिहासिक अन्याय आहे. मेहबूबा मुफ्ती यांनी एका पोस्टद्वारे प्रकल्पाला विरोध केला होता. तसेच केंद्र सरकार पाण्याचे शस्त्रीकरण करत असल्याचा आरोप त्यांनी केला होता.



**इस्रायल-गाझा सीमा** इस्रायलमध्ये इस्रायल-गाझा सीमेजवळ इस्रायली टँक दिसून आल्याने, गाझा पट्टीत पुन्हा एकदा अस्वस्थता पसरली आहे.

# ब्रह्मोसने पाकिस्तानसह चीनला निष्प्रभ केले




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

### ब्रह्मोस क्षेपणास्त्रांनी पाकची झोप उडवली

● पहलगामयेथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील अनेक दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते. यानंतर पाकिस्तानने भारतावर भ्याड हल्ले सुरू केले. मात्र, भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने बहुतांश हल्ले हाणून पाडले. दरम्यान, १० मे रोजी पाकिस्तानने भारतीय लष्करी तळांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला असता भारताने चोख प्रत्युत्तर देत पाकिस्तानचे अनेक हवाई तळ उद्ध्वस्त केले. ब्रह्मोस क्षेपणास्त्राद्वारे अचूक हल्ला करून भारताने शत्रूच्या छावणीत दहशत निर्माण केली.

**नवी दिल्ली :** भारताने यापूर्वी ज्या अचूकतेने आणि सतर्कतेने ऑपरेशन सिंदूर राबवले आहे, त्यामुळे देश-विदेशातील तज्ज्ञही भारतीय सैन्याच्या पाठीवर थाप मारत आहेत. याच भागात अमेरिकेचे सुप्रसिद्ध वॉरफेअर एक्स्पर्ट जॉन स्पेन्सर यांनी ऑपरेशन सिंदूरचं कौतुक केलं आहे. जॉन स्पेन्सर यांनी म्हटले आहे की, या ऑपरेशनमध्ये आणि नंतर पाकिस्तानला प्रत्युत्तर देताना भारताने आक्रमण आणि बचावाचा उत्तम मेळ साधला आहे. पाकिस्तानात कुठेही आणि केव्हाही हल्ला करू शकतो, असेही भारताने कळवले आहे.

जॉन स्पेन्सर मॉडर्न वॉर इन्स्टिट्यूटमध्ये अर्बन वॉरफेअर स्टडीजचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. निवृत्त कर्नल जॉन स्पेन्सर यांनी ऑपरेशन सिंदूरविषयी दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, पाकिस्तानने वापरलेली चिनी हवाई संरक्षण प्रणाली भारताच्या ब्रह्मोस क्षेपणास्त्रांना कधीही टक्कर देऊ शकत नाही. स्पेन्सर यांनी बोलताना सांगितले की, ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने पाकिस्तानात घुसून हल्ला केला. त्याचबरोबर भारताने पाकिस्तानी ड्रोन आणि क्षेपणास्त्रेही यशस्वीपणे मागे हटविली.

स्पेन्सर म्हणाले की, ब्रह्मोस क्षेपणास्त्र पाकिस्तानकडून वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही चिनी हवाई संरक्षण प्रणालीला भेदण्यास सक्षम आहे. चीनची हवाई संरक्षण यंत्रणा आणि क्षेपणास्त्रे भारताच्या यंत्रणेपेक्षा कमकुवत आहेत. भारताचा संदेश स्पष्ट होता. भारत कधीही पाकिस्तानात कुठेही हल्ला करू शकतो.

## यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ



**इंदापूर :** शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती पद्माताई भोसले, सचिव डॉ. गिरीश देसाई, खजिनदार श्री. तुषार रंजनकर व विश्वस्त श्री.अरविंद गारटकर यांच्या मार्गदर्शनाखाली इंदापूर तालुक्यातील दहावीच्या परीक्षेत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान समारंभ अल्फा बाईट कॉम्प्यूटर्स येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून इंदापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी सचिन खुडे उपस्थित होते. या समारंभात श्री. ना. रा. हायस्कूल मधील तृप्ती कोल्हे, गायत्री नरुटे, भाग्यश्री व्यवहारे,श्रावणी दुधनकर, ईश्वरी चेंडगे, राधिका विद्यालयातील ईश्वरी गलांडे, असद शेख, आयेशा शेख, रोहन नरुटे, श्रुष्टी व्यवहारे, मालोजीराजे विद्यालयातील गणेश राऊत, प्रिया कांबळे,चैत्राली वाघमोडे,समृद्धी मारकड,समृद्धी वाघमोडे या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करणे व त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे हा होता. या कार्यक्रमासाठी १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संस्थेचे प्रकल्प अधिकारी सागर कांबळे यांनी केले. संस्थेचे इन्चार्ज दिपक जगताप, केदार गोसावी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती चारुशीला शिंदे, अभिजित तळेकर यांनी प्रयत्न केले.

## भगवंत कड यांचे निधन



**सासवड :** पुरंदर तालुक्यातील श्रीक्षेत्र नायगाव येथील जुन्या पिढीतील भगवंत गुलाबराव कड (वय ९३ वर्षे) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. आप्पा या नावाने ते सर्वपरिचित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. भारती सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोशिएशनचे अध्यक्ष, सी ए भाऊसाहेब कड तसेच लोकमंगल पतसंस्थेचे अधिकारी संजय कड यांचे ते वडील होते.

## पोलीस पाटील नसरीन तांबोळी यांचे निधन



**शिक्रापूर :** करडे ता. शिरुर गावच्या पोलीस पाटील तसेच कारेगाव येथील गुरुकुल इंग्लिश मिडीयम शाळेच्या आदर्श शिक्षिका नसरीन आरिफ तांबोळी (३८ वर्षे) यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले, त्यांच्या मागे पती, दोन मुले, सासु सासरे, दीर असा परिवार आहे. तळेगाव ढमढेरे गटाच्या केंद्रप्रमुख शरीफा तांबोळी यांच्या त्या पुतणी होत.

## डॉ. दरवडे स्पर्श मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी




**शिक्रापूर :** पुणे नगर महामार्गावर सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या स्पर्श मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. प्रितम दरवडे तर उपाध्यक्षपदी डॉ. मिथिलेश खाजेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. शिक्रापूर येथे स्पर्श मेडिकल असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी स्पर्श मेडिकल असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेंद्र हार्दे, डॉ. मच्छिंद्र गायकवाड, डॉ. सुनील ढमढेरे, डॉ. कोंडीबा सोनवणे, डॉ. संपत शिंदे, डॉ. अविनाश रुके, डॉ. प्रितम दरवडे, डॉ. चंद्रकांत केदारी, डॉ. मिथिलेश खाजेकर डॉ. हेमंत वाघोलीकर, डॉ. विशाल व्यवहारे, डॉ. श्रीकांत साकोरे, डॉ. संदीप वाव्हळ, डॉ. सुहास निकम, डॉ. धनंजय लोंढे, डॉ. योगेश झुरुंगे, डॉ. यशवंत पंधरकर, डॉ. सोमनाथ गव्हाणे, डॉ. प्रशांत कापरे, डॉ.बापू दरेकर, डॉ. महेश खिलारे, डॉ. भगवान पवार, डॉ. विकास भुजबळ, डॉ. संजय पाटील, डॉ. सागर शिंदे यांसह आदि उपस्थित होते. यावेळी स्पर्श मेडिकल असोसिएशनची नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली असताना अध्यक्षपदी डॉ. प्रितम दरवडे, उपाध्यक्ष पदी डॉ. मिथिलेश खाजेकर, सचिवपदी डॉ. अमोल सोनटक्के, खजिनदार पदी डॉ. भरत दरेकर, कार्यकारिणी सदस्यपदी डॉ. नितीन शिंगाडे, डॉ. विकास भुजबळ, डॉ. भरत दरेकर, डॉ. स्वप्नील गव्हाणे, डॉ. चेतन पाटील, डॉ. भगवान पवार, डॉ. पल्लवी केदारी, डॉ. ऋतुजा भोर, डॉ. प्रतिभा ताठे, डॉ. सारिका रुके यांची निवड करण्यात आली.

## चाकण शिक्रापूर रस्त्यावर गांजा जप्त; एकास अटक



**महाळुंगे :** चाकण-तळेगाव रोडवर देहूफाटा येथे एका पत्र्याच्या टपरीजवळ एक जण गांजा विक्री करत असल्याची माहिती पोलीस ना मिळाल्यानंतर त्वरित महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी गणेश अशोक भांडवलकर (रा. देहूरोड) यास अटक केली. त्याच्याकडून १७ हजार २५० रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला आहे. यात अजून कोणी सामील आहे का, याचा शोध पोलिस घेत आहेत.

## मस्तानी तलावात निसर्गाचा देखावा



सासवड आकाशात मेघ भरून आल्याने सुर्यनारायण मावळतीला जात असताना, त्याची प्रतिमा मस्तानी तलावात उमटली. एक आगळे वेगळे सौंदर्य त्यातून दिसून आले. (छायाचित्र - राजेंद्र बर्गे, सासवड)

## माळेगावचे कारभारी २२ जूनला ठरणार, निवडणूक प्रक्रिया जाहीर

### २१ मे पासून उमेदवार अर्ज दाखल होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**माळेगाव :** संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेणाऱ्या माळेगाव सहकारी साखर कारखान्याची निवडणूक जाहीर झाली आहे. त्यामुळे माळेगावची सत्ता स्थापित करण्यासाठी (दि.२२) जून रोजी मतदान होणार आहे. ही निवडणूक दुरंगी की तिरंगी होणार, याची चर्चा माळेगावच्या शिवारात सुरू झाली आहे.

. बुधवार (दि. २१) ते (दि.२७) मे उमेदवारी अर्ज दाखलची मुदत आहे. (दि.२२) जून रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी प्रकाश अष्टेकर आणि माळेगावचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंत माने यांनी हा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

(दि.२८) रोजी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जाची छाननी केली जाईल. (दि.२९) ते (दि.१२) जून या कालावधीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत असेल. (दि.१३) जून रोजी अंतिम उमेदवारी यादी जाहीर केली जाणार आहे. (दि.२२) जून रोजी मतदान प्रक्रिया पार पडेल.

# शिरूर नगरपरिषदेला १७ एकर जागेचे हस्तांतरण

## नागरिकांना आधुनिक व दर्जेदार सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिरूर :** शिरूर नगरपरिषदेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणारा निर्णय घेण्यासाठी मुंबई येथील मंत्रालयात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत शिरूर नगरपरिषदेसमोरील सुमारे १७ एकर शासकीय जागेचे नगरपरिषदेकडे हस्तांतरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही जागा लवकरच नगरपरिषदेकडे हस्तांतरित होणार असून शहरातील नागरिकांना आधुनिक व दर्जेदार सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ही जागा पूर्वी शिरूर नगरपरिषदेकडे होती. मात्र काही प्रशासनिक कारणांमुळे ती राज्य सरकारच्या ताब्यात गेली होती. अनेक वर्षांपासून जागेच्या हस्तांतरणासाठी प्रयत्न सुरू होते. अखेर बैठकीत यादृष्टीने सकारात्मक चर्चा झाल्याने स्थानिक विकासासाठी एक नवे दार खुले झाले आहे. मुंबईतील मंत्रालयात झालेल्या बैठकीत पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव, आमदार माऊली कटके, शिरूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रितम पाटील, संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी केवळ जमिनीच्या हस्तांतरणासह शिरूर व घोडनदी परिसराच्या सर्वांगीण विकासावर विचारमंथन करण्यात आले.

### असा होणार जागेचा संभाव्य वापर

● शिरूरमधील १७ एकर शासकीय जमिनीचा वापर शहराच्या योजनाबद्ध विकासासाठी केला जाणार आहे. यात तालुका क्रीडा संकुल, नाट्यगृह, शैक्षणिक संस्था, नागरी सुविधा केंद्रे, सार्वजनिक उद्याने, आदी विकासकामांचा समावेश आहे. जागेचा उपयोग शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या गरजांनुसार केला जाईल, असे संकेत बैठकीत देण्यात आले. संपूर्ण प्रक्रियेत आमदार कटके यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. त्यांनी ही जागा पुन्हा नगरपरिषदेकडे येण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. बैठकीतही त्यांनी शिरूर शहराच्या विकासाचे स्पष्ट व मुद्देसूद मांडणी केली.

## कोंढापुरीच्या तलावात पाणी आल्याने समाधान



कोंढापुरी ता. शिरुर येथील पाझर तलावात सोडलेले चासकमानचे पाणी.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कोंढापुरी ता. शिरूर येथील नागरिकांसाठी महत्वाचे असलेल्या पाझर तलावात चासकमान धरणातील पाण्याचे उन्हाळी आवर्तन सोडण्यात आल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

कोंढापुरी ता. शिरुर येथील पाझर तलाव ३.७५ दशलक्ष घनमीटर पाणी साठवण क्षमतेचा असून हा पाझर तलाव १५ दिवसांपूर्वी कोरडा पडण्याची शक्यता निर्माण झाली होती. तलावातील पाण्याला ठिकठिकाणी डबक्याचे स्वरूप प्राप्त झाले होते, तर कोंढापुरी, खंडाळे, निमगाव म्हाळुंगी, कासारी, गणेगाव खालसा शिवारातील शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांना या पाझर तलावातील पाण्याचा उपयोग होत असून काही शेतकरी तलावातील डबक्यांतील पाणी शेतातील पिकांना देवून शेतातील पिके जगविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत होते.

नुकतेच कोंढापुरी पाझर तलावात चासकमान धरणातील पाण्याचे आवर्तन सोडण्यात आल्याने शेतकरी तसेच ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

## रांजणगाव वसाहतीत वाहनतळाची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** येथील औद्योगिक वसाहती मधील वाहनतळासाठी आरक्षित भूखंड आरक्षण बदलून कंपन्यांना विकल्याने वाहन चालकांना मोठ्या अडचणीत सामोरे जावे लागत आहे त्यामुळे या ठिकाणी पुन्हा वाहनतळ उपलब्ध करून द्यावेत यावेत अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे माजी तालुकाध्यक्ष सतीश पाचंगे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

शरद पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, पर्यावरण मंत्री पंकजा मुंढे, औद्योगिक विकास महामंडळाला या निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या आहेत.

रांजणगाव औद्योगिक वसाहतीमध्ये यश इन चौक व राजमुद्रा चौक या दोन ठिकाणी वाहनतळा साठी जागा उपलब्ध केली होती, आता एक जागा कंपनीला विकण्यात आली आहे व दुसऱ्या जागेवर पेट्रोल पंप व अतिक्रमण आहे त्या मुळे आता कंपनी मध्ये येणाऱ्या वाहनांना पार्किंगची खूप मोठी समस्या आहे. वाहने रस्त्या वरती उभी राहतात त्या मुळे मोठ्या प्रमाणात अपघात होतात याबाबत आम्ही खूप वेळा औद्योगिक विकास महामंडळा बरोबर याचा पाठ पुरावा केला आहे आणि करत आहो, पण त्यांचा काहीही उपयोग होत नाही तरी आपण त्यात लक्ष घालून वाहन तळा साठी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी सतिश अंकुश पाचंगे यांनी केली आहे.



# करंदीत तिरंगा रॅलीतून देशसेवेप्रती कृतज्ञता



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** करंदी, ता. शिरूर येथे बालरंगभूमी परिषदेच्या वतीने देशसेवेप्रती कृतज्ञता व्यक्त करत भारतीय जवानांना पाठिंबा देण्यासाठी भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन हातामध्ये तिरंगा घेऊन रॅलीच्या माध्यमातून जय जवान - जय हिंद, भारत माता की जय, वंदे मातरम या देशभक्तिपर घोषवाक्यांचा जयघोष करण्यात आला.

करंदी येथे बालरंगभूमी परिषदेच्या वतीने आयोजित तिरंगा रॅली दरम्यान बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा दिपाली शेळके, नंदा ढेरे, उपसरपंच नितिन ढोकले, पोलीस पाटील वंदना साबळे, शिक्रापूरचे ग्रामपंचायत सदस्य कृष्णा सासवडे, प्रवीण ढोकले, किसान करिअर अकॅडमीचे संजय तांबे, भूषण घोलप, युवा सेनेचे वैभव ढोकले, संतोष दरेकर, मोहन घोलप, बाबुराव चौधरी, बंटी ढोकले, बाळासाहेब ढोकले, सोमनाथ कदम, संतोष खेडकर, गणेश मानकर, राजेंद्र दरेकर, बाबासाहेब दरेकर, पोपट नप्ते, अविनाश साकोरे यांसह शाळेतील बालक व नागरिकांनी सहभाग घेतला.

सदर रॅलीदरम्यान जय जवान – जय हिंद, भारत माता की जय, वंदे मातरम या देशभक्तिपर घोषवाक्यांनी संपूर्ण दुमदुमून गेला. दरम्यान कोल्हापूर येथे कला संस्कार शिबिरामध्ये सहभागी मुलांना पदाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले, तर यावेळी बोलताना अशा उपक्रमांद्वारे बालकांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण करणे आणि जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे उद्दिष्ट असल्याचे बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा दिपाली शेळके यांनी सांगितले तर युवा सेनेचे संघटक वैभव ढोकले यांनी सर्वांचे आभार मानले.

## निसर्गाची रंगपंचमी



पुरंदर सध्या क्षितिजावर निसर्गाची रंगपंचमी सुरू असून, डोळ्यांना सुखावणारे जेजुरीतील पुणे-पंढरपूर महामार्गांवरील हे मनमोहक दृश्य (छायाचित्र - विजयकुमार हरिश्चंद्रे.)

# जेजुरीगडाच्या ऐतिहासिक दीपमाळांवर प्रकाश

## शिलालेख वाचन शोधमोहीम अभियान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** राज्यात सर्वात जास्त दीपमाळा उभारणी कुलदैवत जेजुरी खंडोबा गडावर झाली असून, तत्कालीन राजे राजवडे, सुभेदार, सरदार लोकांनी नवस पूर्ततेचे प्रतीक म्हणून या दीपमाळा विविध बांधकाम शैलीत उभारले. या शेकडो दीपमाळा निर्मिती इतिहासावर प्रकाश झोत टाकण्याकरीता ऐतिहासिक संशोधन अभ्यासक रामभाऊ लांडे यांनी आपल्या वर्षभराच्या प्रयत्नातून प्रकाश झोत टाकला आहे.

खंडोबा हे कुलदैवत आणि निस्सीम भक्तीचे श्रद्धा स्थान असल्या कारणाने, अनेक ऐतिहासिक महापुरुषांचे आध्यत्मिक आणि सांस्कृतिक नाते जेजुरीशी जोडले गेले आहे. यात राजमाता जिजामाता होळकर, त्यांचे सासरे आणि परम खंडोबा भक्त मराठीचा झेंडा अटकपार करणारे सुभेदार मल्हारराव होळकर, यांच्या कन्या आणि जावई सरदार गोविंदराव बुळे, नारायनराव बुळे यांनी गड मार्गांवर दीपमाळा उभारल्या.

इतिहास अभ्यासक रामभाऊ लांडे आणि प्रा निलेश साळुंखे यांनी शिलालेख विशेष वाचन घेऊन विठोजींच्या घराण्यातील इंदोर मध्यप्रदेश येथील सरदार नारायणराव गोविंदराव बुळे यांनी शके १८२२ चैत्र शुद्ध ९ असा शिलालेख आढळतो, तर शिलालेखातील तिथीनुसार १७ एप्रिल १९१० रामनवमी असा होतो. काही शिलालेख हे नवस पूर्ततीचा उल्लेख दर्शवितात.

इंदौरच्या होळकर राजघराण्याचे खंडोबा कुलदैवत असल्या कारणाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी, मल्हारराव होळकर तुकोजीराव होळकर, महाराजा यशवंतराव होळकर, यांनी आपापल्या कारकिर्दीत जेजुरीचा कायापालट केल्याचे दिसून येते. या घराण्याचा व्यवसायिक, राजकीय आणि सांस्कृतिक वैभवाची वाटचाल खंडोबा कृपेने सुरु असल्याची होळकरांची श्रद्धा होती. सध्या अनेक दुकाने, वाढते प्लास्टिक, प्रदूषण यामुळे दीपमाळा झाकल्या गेल्याची खंत रामभाऊ लांडे यांनी व्यक्त केली असून, जेजुरीचे माझी विश्वस्त प्रमुख खंडोबा भक्त डॉ प्रसाद खंडागळे गड इतिहास संरक्षण शिलालेख संशोधन माध्यमातून प्रबंध तयार करीत असून याचा विशेष सखोल अभ्यासही सुरु आहे. यामुळे लवकरच गड इतिहास ज्ञात-अज्ञात विषयावर प्रकाश पडेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## पलांडे विद्यालयाची निकालाची परंपरा कायम

**शिक्रापूर :** मुखई, ता. शिरुर येथील कै. रा. गे. पलांडे माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविदयालय येथील विद्यार्थी नेहमी वेगवेगळ्या परिक्षेत प्राविण्य मिळवत असताना या वर्षी देखील सदर विद्यालयाचा एस एस सी परीक्षा अर्थात दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून, विद्यालयातून दहावीच्या परीक्षेला ७८ विद्यार्थी बसलेले असताना सर्व ७८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयातील रसिका किशोर गोगावले हिने ९७.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक, प्रतीक्षा एकनाथ रुपनर हिने ९६.४० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक, प्रणाली प्रदीप थोरात हिने ९५.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक, सानिष्का लक्ष्मण दोरगे हिने ९४.४० टक्के गुण मिळवत चतुर्थ क्रमांक आणि निकिता दिनेश बच्छाव हिने ९४ टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक मिळवला असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्ष जयश्री पलांडे, कार्याध्यक्ष ॲड अशोकराव पलांडे, सचिव सुरेश पलांडे, सीईओ मंगेश मोरे व प्राचार्य तुकाराम शिरसाट यांनी अभिनंदन केले

## जे जे इंटरनॅशनल स्कूलचा शंभर टक्के निकाल

**शिक्रापूर :** करंदी ता. शिरुर येथील राजा छत्रपती मेमोरियल ट्रस्ट संचलित जे जे इंटरनॅशनल स्कूल केंद्रीय माध्यमिक विद्यालयाचा सिबीएससि माध्यमाचा निकाल शंभर टक्के लागला असून या विद्यालयातील अठ्ठावीस विद्यार्थी एस एस सि अर्थात दहावीच्या परीक्षेला बसलेले असताना सर्व विद्यार्थी उतीर्ण झाले असून विद्यालयात हर्षद रमेश दरेकर याने ९३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक, प्रणिता राहुल पऱ्हाड हिने ९२ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक, प्रणित वाल्मीक गावडे याने ८७ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला असून सदर विद्यार्थ्यांमध्ये तर श्रावणी प्रकाश वर्पे हिने ९८ गुण मिळवून इंग्रजी मध्ये प्रथम, तर प्रणिता पऱ्हाड हिने ९८ गुण मिळवत आयटीमध्ये प्रथम आणि ९३ गुण मिळवून हिंदी विषयात प्रथम क्रमांक तसेच हर्षद रमेश दरेकर ९४ गुण मिळवून गणित मध्ये प्रथम मिळवला असून सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष माजी सभापती शंकर जांभळकर, उपाध्यक्ष दिलीप ढोकले, सचिव दिव्या जांभळकर, प्राचार्य लक्ष्मीकांत आहेर, समन्वयक सुनीता फुके, वर्गशिक्षका नेहा कुदळे यांनी अभिनंदन केले आहे.

## केंदूर विद्यालयाचा दहावीचा निकाल ९१.११ टक्के



**शिक्रापूर :** केंदूर, ता. शिरुर येथील सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज केंदूरच्या स्थापणे नंतर प्रथमच सर्वाधिक गुण मिळवून अवंती चंद्रकांत थिटे हि विद्यालयात आणि संस्थेच्या पुणे विभागात प्रथम आल्याची माहिती प्राचार्य अनिल साकोरे यांनी दिली आहे. केंदूर येथील सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज विद्यालयातून ९० विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसलेले असताना ८२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयातील अवंती थिटे हिने विद्यालयाचा आज पर्यंतचा विक्रम मोडीत काढत ९८ टक्के गुण मिळवत विद्यालयासह संस्थेच्या पुणे विभागात प्रथम क्रमांक मिळवला तर काढले मंथन श्रीहरी पऱ्हाड याने ९२.६० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक आणि आदिती उमेश साकोरे हिने ९०.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला असून विद्यालयाचा विक्रम मोडणाऱ्या अवंती थिटे हिचा सरपंच प्रमोद पऱ्हाड, उपसरपंच मंगेश भालेकर, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर चे पुणे विभागीय सदस्य राम साकोरे, प्राचार्य अनिल साकोरे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला, या प्रसंगी माजी सरपंच सूर्यकांत थिटे, अमोल थिटे, अशोक भोसुरे, सुनील थिटे, शहाजी सुक्रे, उद्योजक बन्सी पऱ्हाड, उमेश साकोरे, श्रीहरी पऱ्हाड, प्रा. जितेंद्रकुमार थिटे यांसह आदी उपस्थित होते. यावेळी अनेकांनी अवंती थिटेच्या विक्रमाचे कौतुक केले.

# रांजणगाव एमआयडीसीतील एमईपीएलच्या प्रदूषणाची पाहणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



रांजणगाव एमआय डीसी, ता.शिरुर येथील एमईपीएल कंपनीच्या प्रदूषणाची पाहणी ज्येष्ठ नेते शरद पवार व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी करत ग्रामस्थांशी संवाद साधला. छायाचित्र - पोपट पाचंगे, कारेगाव.)

**कारेगाव :** येथील पंचतारांकित औद्योगिक वसाहत ता.शिरुर येथील महाराष्ट्र पॉवर एनव्हायरो पॉवर लिमिटेड (एमईपीएल) या कंपनीतून निमगाव भोगी गावच्या हद्दीत पडणाऱ्या दूषित, रसायनयुक्त व घातक पाण्यामुळे परिसरातील दूषित पाण्याचे स्तोत्र दूषित होऊन जमिनी नापिक झाल्याच्या स्थानिक नागरिक व ग्रामस्थांच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर उद्योगमंत्री उदय सावंत यांच्यासह ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी गुरुवारी या परिसराला भेट देऊन पाहणी केली.

उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी आमदार ॲड अशोक पवार, सूर्यकांत पलांडे, विकास लवांडे, देवदत्त निकम,राहुल पाचर्णे, शेखर पाचुंदकर, उषा बढे, वाल्मिकराव कुरुंदळे,पांडुरंग थोरात,सतिश पाचंगे, राहुल गवारे, विश्वास ढमढेरे, शशिकांत दसगुडे, बापूसाहेब शिंदे,दामू घोडे, आबासाहेब सरोदे, दादा पाटील घावटे आदी यावेळी उपस्थित होते. परिसराला भेट देऊन त्यांनी ग्रामस्थ व शेतकरी यांच्या समस्या जाणून घेतल्या. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी जगन्नाथ साळुंखे, एमआयडीसीचे मुख्य अभियंता नितीन वानखेडे, उपमुख्यकार्यकारी अधिकारी भिसे, अभियंता संजय कोतवाड, प्रादेशिक अधिकारी अर्चना पठारे, राहुल तिडके, उपअभियंता मिलिंद कासार, गटविकास अधिकारी महेश डोके, निमगावच्या सरपंच ज्योती सांबारे, माजी सरपंच अंकुश इचके, संजय पावशे, उत्तम व्यवहारे, सचिन सांबारे, धर्मराज रासकर, नवनाथ शेवाळे, संतोष सांबारे, कर्डेलवाडीच्या सरपंच लता कर्डीले, विठ्ठल घावटे, संतोष शिंदे, अमोल वर्पे आदिसह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

गावातील तलाव आणि कंपनीच्या मागील बाजूस जेथे रसायनयुक्त पाण्यामुळे दुर्गधी सुटली आहे, या भागाची पवार यांनी स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांसह पाहणी केलीकंपनीच्या दूषित पाण्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना फार मोठी किंमत मोजावी लागत आहे. एमआयडीसीमुळे स्थानिक तरुणांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला असून, आर्थिक जीवनमान उंचावले आहे. विकासासाठी उद्योगधंदे गरजेचे आहेत. मात्र, स्थानिक शेतकऱ्यांना उध्वस्त करणारे प्रकल्प नको, अशी भूमिका पवार यांनी मांडली. तसेच शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी पुढील १५ दिवसात शासनाने मुख्यमंत्री फडणवीस,उद्योगमंत्री सामंत व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्यासमवेत स्थानिक शेतकऱ्यांची बैठक घेण्यात यावी, असे त्यांनी म्हटले. या बाधित शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारे अन्याय होणार नसून, शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच यापुढे निर्णय घेऊ. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यामुळेच राज्यात मोठया प्रमाणात औद्योगिक विकास झाला असून, शासन शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी कटीबद्ध आहे. शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारे अन्याय होणार नाही यासाठी शासन प्रयत्न करेल, असे मंत्री सावंत यांनी आश्वासन दिले. सूत्रसंचालन प्रकाश थोरात यांनी केले. तर आभार पांडुरंग थोरात यांनी मानले.

## सासवड आगारास दिली उपमहाव्यवस्थापकांनी भेट



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अंतर्गत हिंदुह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान राबविण्यात येत असून, त्या अनुषंगाने परीक्षणच्या हेतुने सासवड एसटी आगारात उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्रमांक दोनच्या अधिकारी अनघा बारटक्के यांनी भेट देऊन अभियानाच्या तयारीची पाहणी केली.

नियंत्रण समितीच्या वरिष्ठ सांख्यिकीय अधिकारी अनिता कोकरे, पुणे विभागाचे सांख्यिकी अधिकारी दादासाहेब गाडे या प्रसंगी उपस्थित होते. सासवड आगारात या अभियानाच्या अनुषंगाने परिसराची रंगरंगोटी, झाडांना रंग, दर्शनी भागात घड्याळ, प्रवाशांच्या सोयीसाठी दर्शनी भागात गाड्यांचे वेळापत्रक अधिकाऱ्यांची नावे, संपर्क नंबर, तक्रारीसाठी नंबर लावण्यात आले आहेत. कुंड्या व फुलझाडे लावून स्टँड सुशोभित करण्यात आले आहे. स्वच्छतागृह, कार्यशाळा, कार्यालयीन विभाग व एकूणच परिसर स्वच्छ व आकर्षक केला असून, त्याचे परिक्षण बारटक्के यांनी केले. आगार व्यवस्थापक सागर गाडे यांनी या अधिकाऱ्यांना माहिती दिली व आगाराच्या वतीने त्यांचे स्वागत केले.

स्थानक प्रमुख प्रवीण माळशिकारे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक राजाराम गायकवाड वाहतूक नियंत्रक प्रवीण गायकवाड, कैलास जगताप यांसह रामचंद्र गावडे, अमित वाल्मिकी, वाजीद तांबोळी, संपूर्णानंद नाझरे, शिपाई शिवानी जगताप, प्रवाशी संघटनेचे तानाजी सातव आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. अभियानाच्या तयारीची पाहणी केल्यानंतर सर्वच अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

## २८ वर्षांनी ते विद्यार्थी पुन्हा आले एकत्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** इंदापूर तालुक्यातील काटी येथील श्री काटेश्वर विद्यालयाच्या २८ वर्षांपूर्वी एकत्र शिकत असलेल्या माजी विद्यार्थ्यांची स्नेह संमेलना निमित्त पुन्हा एकदा शाळा भरली. चाळीशी ओलांडलेल्या विद्यार्थ्यांनी त्याकाळी बाकावरच्या मित्र - मैत्रिणी सोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा देत आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

काटी येथील श्री काटेश्वर विद्यालयामध्ये सन १९९६-९७ साली शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन इंदापूर तालुक्यातील लोणी - देवकर आणि पळसदेव यांच्या मध्यभागी व उजनी धरणाच्या निसर्ग रम्य वातावरणात काटी विद्यालयाचे सन १९९७ बॅच मधील विद्यार्थी, उद्योजक रणजीत बोराटे यांच्या निसर्गरम्य देवराई फार्म या ठिकाणी संपन्न झाले. स्नेहसंमेलनात ७० पैकी ४५ विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या. यावेळी घनश्याम सोमा लोंढे, पांडुरंग विठोबा खंडागळे, अशोक बाबुराव सरताळे, पांडुरंग महादेव सपकळ, अनिल महादेव सोनटक्के या शिक्षकां प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी आल्यानंतर प्रथम उत्कृष्ट नाष्टा, त्यानंतर कोल्हापुरी फेटे बांधून स्वागत करण्यात आले. त्यानंतर देवराई फार्म मधील उत्कृष्ट मिनी निसर्ग बसमधून सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षक यांना कार्यक्रम सभागृहाकडे नेण्यात आले. स्नेह संमेलनाच्या सुरवातीस विद्येची देवता सरस्वती प्रतिमेचे पूजन सर्व गुरुवर्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपली ओळख करून देताना शाळेतल्या गमतीजमती सांगत जुन्या आठवणींना उजाळा दिला. समाजात वावरताना एकमेकांना आलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली.

यावेळी प्रज्ञा खाडे, सारिका भोसले, कैलास पवार, धनंजय गायकवाड, रणजीत बोराटे, प्रकाश कुलकर्णी, युवराज मिसाळ, जयदीप ननवरे, प्रशांत साखरे, शरद गोरे, मेजर दत्तात्रय तांबे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन नितीन वाघमोडे सर यांनी तर आभार तुकाराम मोहिते यांनी मानले.



(इंदापूर : श्री काटेश्वर विद्यालय काटी मधील सन १९९६ -९७ च्या दहावीचे माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन. छाया - कैलास पवार)

# मंचर वनपरिक्षेत्रामध्ये २७ ठिकाणी प्राणी गणनेचे आयोजन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** बौद्ध पौर्णिमेनिमित्त पान स्थळावरील प्राणी पाहणी, निसर्ग अनुभव कार्यक्रमांतर्गत मंचर वनपरिक्षेत्रामध्ये २७ ठिकाणी प्राणी गणनेचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये दहा गावातील २३ पानवट्यावर सुमारे ४४ प्राणी पक्षी आढळून आल्याची माहिती मंचर वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी दिली.

मंचर वनपरिक्षेत्र अंतर्गत कळंब, वळती, धामणी व मंचर या चार परिमंडळातील २७ ठिकाणी वन विभागाने प्राणी गणनेचे आयोजन केले होते, यामध्ये कळंब परिमंडळातील लौकि येथे दोन ससे, दोन कोल्हे, चार मोर. महाळुंगे पडवळ येथे एक रानमांजर, तीन कोल्हे, सुंभेमळा येथे एक कोल्हा, एक ससा, एक तरस, सात मोर आढळून आले.

वळती परिमंडळातील मेंगडेवाडी येथे दोन टिटवी, एक ससा, एक उदमांजर, एक कोल्हा आढळून आला. अवसरी बुद्रुक येथे दोन कोल्हे, दोन रातवा पक्षी, एक टिटवी आढळून आली.

रांजणी येथे दोन मोर, एक कोल्हा, एक तरस आढळून आला. धामणी परिमंडळामधील खडकवाडी येथे तीन मोर, काठापुर येथे तीन कोल्हे, आढळून आले मंचर वन परिमंडळातील निघोटवाडी, अवसरी खुर्द, चिंचोडी येथील पाणवठ्यावर एकही प्राणी आढळून आला नाही.

मात्र मागील २० ते २२ वर्षापासून आंबेगाव तालुक्यात दहशत निर्माण करणारा एकही बिबट्या या पाणवठ्यावर आढळून आला नाही हे विशेष. वनविभागाच्या म्हणण्यानुसार ४४ प्राणी पक्षी आढळून आले असले, तरी यापेक्षाही मोठ्या प्रमाणावर प्राणी पक्षी आढळून आले असते.


मात्र बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी आठ ते रात्री अकरा वाजेपर्यंत मोठ्या प्रमाणावर अवकाळी पाऊस झाला त्यामुळे प्राणी गणना करण्यास बाधा आली. प्राण्यांना पक्षांना पावसामुळे इतरत्र पाणी उपलब्ध झाल्याने ते पाणवठ्याकडे फिरकले नाहीत, असे विकास भोसले यांनी सांगितले.

या गणनेसाठी वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले , सर्व वनपाल, सर्व वनरक्षक, वनमजूर, गावडेवाडी बिबट कृती दलाचे सदस्य व प्राणी मित्र यांनी प्रयत्न केले.

# असे असतात मॉल रोड

**जाणून घ्या**

छोट्या मित्रांनो; तुम्ही शिमला, मसूरी, मनाली किंवा नैनिताल यासारख्या हिल स्टेशनवर गेला असाल तर त्या त्या ठिकाणचा प्रसिद्ध मॉल रोड पाहिलाच असेल. हे रस्ते फक्त बाजारपेठाच नसतात तर प्रत्येक पर्यटकाला अनुभव घ्यावासा वाटणारा भाग असतो. त्यामुळेच लोक तिथे गर्दी करतात. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की, या रस्त्यांना 'मॉल रोड' का म्हणतात आणि ही परंपरा कुठून सुरू झाली? चला, आज जाणून घेऊ या.



मुलांनो, पूर्वी 'मॉल' या शब्दाचा अर्थ वेगळा होता. ब्रिटीश राजवटीत मॉल हा शब्द खुल्या आणि रुंद मार्गासाठी वापरला जात असे. हा मार्ग विशेषतः चालण्यासाठी आणि सामाजिक मेळाव्यासाठी बांधला जायचा. १८ व्या आणि १९ व्या शतकात भारत ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली असताना ब्रिटीश अधिकारी आणि त्यांचे कुटुंब उन्हाळ्याच्या हंगामात डोंगरावर जात असत. दिल्ली आणि कोलकात्याच्या कडक उन्हापासून वाचण्यासाठी ते शिमला, मसूरी आणि दार्जिलिंग सारख्या हिल स्टेशनवर जात असत. मग तिथे एक मुख्य रस्ता बांधला जायचा ज्यावरुन लोक संध्याकाळी फिरायचे, गप्पा मारायचे आणि सामाजिक जीवनाचा आनंद घ्यायचे. नंतर हेच रस्ते 'मॉल रोड' म्हणून ओळखले जाऊ लागले.

कालांतराने हे मॉल रोड केवळ ब्रिटिश अधिकाऱ्यांसाठी राहिले नाहीत तर स्वातंत्र्यानंतर ते सामान्य स्थानिक आणि पर्यटक अशा दोघांनाही आकर्षित करू लागले. स्थानिक हस्तकला, खाद्यपदार्थ, कपडे आणि सजावटीच्या वस्तू येथे मिळू लागल्या. हळूहळू हे मॉल रोड प्रत्येक डोंगराळ शहराची ओळख बनले.

तर मित्रांनो, अशाप्रकारे भारतात काही प्रमुख मॉल रोड आहेत. त्यामध्ये मसूरी मॉल रोड (उत्तराखंड) चा समावेश होतो. डोंगरांची राणी म्हणून ओळखला जाणारा मसूरीचा मॉल रोड संध्याकाळचा चहा घेण्यासाठी आणि सुंदर दृश्यांसाठी ओळखला जातो. शिमला मॉल रोड (हिमाचल प्रदेश) ब्रिटिश काळातील इमारती, जुन्या चर्च आणि सुंदर दुकानांनी सजलेला असून तो अजूनही इतिहास जपून ठेवतो आहे. त्याचप्रमाणे नैनीताल मॉल रोड (उत्तराखंड) नैनी तलावाच्या काठावर असून तो साहसी खेळ, खरेदी आणि स्वादिष्ट स्ट्रीट फूडसाठी प्रसिद्ध आहे. दार्जिलिंग मॉल रोड (पश्चिम बंगाल) चहाच्या बागांचा सुगंध, शांत वातावरण आणि दूरवर दिसणाऱ्या पर्वतांसाठी ओळखला जातो. दार्जिलिंगचा मॉल रोड प्रत्येक पर्यटकाचे मन जिंकतो.



**टेक्नो टॉक**

# असे वाढवा बॅटरी लाइफ

आजकाल सगळ्या स्मार्टफोनमध्ये शक्तिशाली प्रोसेसर आणि हाय-रेझोल्यूशन डिस्प्ले यासारखी प्रगत वैशिष्ट्ये असतात. यामुळे मोठी सोय होत असली तरी फोनची बॅटरी लवकर संपते. तथापि, काही गोष्टींची काळजी घेतल्यास डिव्हाइसचे बॅटरी लाइफ वाढवता येते. तेव्हा तुम्हीही या टिप्स अवश्य लक्षात ठेवा.

**ब्राइटनेस कमी करा**

मोबाईलची बॅटरी लाइफ वाढवण्यासाठी ब्राइटनेस कमी ठेवा. यामुळे बॅटरीचा वापर कमी होतो. यासाठी तुम्ही अ‍ॅडॉप्टिव्ह ब्राइटनेस फीचर देखील वापरू शकता. ते चालू केल्यास स्मार्टफोन बाह्य प्रकाशानुसार स्क्रीनचा ब्राइटनेस स्वयंचलितपणे सेट करेल. याचा फायदा म्हणजे तुम्हाला पुन्हा पुन्हा ब्राइटनेस नियंत्रित करावा लागणार नाही.

**कीबोर्डचे व्हायब्रेशन बंद करा**

आपण फोनमध्ये हॅप्टिक फीडबॅक (स्पर्श करताना व्हायब्रेशन) वापरतो. परंतु यामुळे जास्त बॅटरी खर्च होते. अशा परिस्थितीत फोनचे हे फीचर बंद करा. असे केल्याने बॅटरीचा वापर कमी होईल आणि बॅटरी लाइफ वाढेल.

**बॅकग्राउंड मोबाईल ॲप्स बंद करा**

बऱ्याचदा स्मार्टफोनमध्ये ॲप्स वापरतो आणि बंद करण्याचे विसरतो. पण यामुळे, ॲप फोनच्या बॅकग्राउंडमध्ये चालू राहतो. अशाने बॅटरीचा वापर वाढतो. म्हणूनच डिव्हाइसमध्ये ॲपचा वापर झाल्यानंतर ते बंद करा आणि बॅकग्राउंडमधूनही काढून टाका. यामुळे मोबाईलची बॅटरी लाइफ वाढेल.

**स्क्रीन टाइमआउट कमी करा**

बहुतेकजण स्क्रीन टाइमआउट एक किंवा दोन मिनिटांवर सेट ठेवतात. पण यामुळे बॅटरी लवकर संपते. अशा परिस्थितीत स्क्रीन टाइम आउट ३० सेकंदांवर सेट करा. यामुळे बॅटरी पॉवर वाढेल.

**जीपीएस बंद करा**

जीपीएस स्मार्टफोनची बॅटरी सर्वात जास्त वापरतो. तो सुरू ठेवल्याने बॅटरीचा वापर वाढतो. म्हणूनच वापरात नसतो तेव्हा जीपीएस बंद ठेवा. यामुळे बॅटरी पॉवर वेगाने वाढेल. याशिवाय फोनमध्ये वाय-फाय आणि ब्लूटूथही बंद ठेवा. यामुळेही बॅटरी लाइफ वाढण्यास मदत होईल.



# कचऱ्याचं काय होतं?

**नॉलेज**

छोट्यांनो, तुम्ही कचरा व्यवस्थापनाबद्दल ऐकलं असेल. तुमच्या सोसायटीतही ओला आणि सुका कचरा वेगळा करायला सांगितलं असेल. अशाप्रकारे कचरा वेगळ्या केल्यामुळे ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती करणं सोपं जातं तर प्लास्टिक, कागद यासारख्या कोरड्या कचऱ्याचा पुनर्वापर करता येतो. आता तुमच्या घरातल्या या कचऱ्याचं नेमकं काय होतं हे जाणून घेऊ.

घराघरातून गोळा केलेल्या कचऱ्यापैकी ३२.२ टक्के कचऱ्याचा पुनर्वापर म्हणजेच रिसायकलिंग केलं जातं किंवा ओल्या कचऱ्यापासून खत तयार केलं जातं. १२.५ टक्के कचरा जाळला जातो तर जवळपास ५५ टक्के कचरा पुरला जातो. आता अशा प्रकारे कचरा पुरल्यामुळे पर्यावरणाचं खूप नुकसान होतं. महत्त्वाची बाब म्हणजे १९६० नंतर कचरा पुरण्याचं प्रमाण दुपटीने वाढलं आहे. कचरा पुरण्यामध्ये इंग्लंचा पहिला क्रमांक लागतो. रिसायकल करता न येणारा करचा पुरण्याचा निर्णय घेतला जातो. मात्र आता बऱ्याच ठिकाणी नव्या तंत्राज्ञानाचा वापर केला जात असल्यामुळे पर्यावरणाची हानी होणार नाही, याची काळजी घेतली जाते. योग्य व्यवस्थापन केल्यामुळे कचऱ्याचा चांगल्या प्रकारे उपयोग करता येतो. अनेक ठिकाणी नव्या पद्धतीचा अवलंब केला जात आहे. आपणही घरातला कचरा कमी करण्यासाठी प्रयत्न करू शकतो. तुमच्या घरात बाग असेल तर ओल्या कचऱ्यापासून घरच्या घरी नैसर्गिक खत तयार करता येईल. प्लास्टिक किंवा इतर वस्तूंचा पुनर्वापर करता येईल.



# असा असतो कोब्राचा फणा

**विचार करा**

छोट्या दोस्तांनो, तुम्हाला सापांच्या विश्वाविषयी कुतूहल वाटत असेल ना? हे स्वाभाविक आहे कारण त्यांचे जग खरोखर अनेक रहस्यांनी भरलेले आहे. कुतूहलाचा असाच एक भाग म्हणजे किंग कोब्राचा फणा. फण्याचा आकार आणि उसळून वार करण्याच्या शैलीसाठी कोब्रा जातीच्या नाग वेगळा दिसतो. तेव्हा हा फणा कसे काम करतो आणि तो इतर सापांपेक्षा कसा वेगळा आहे? हे आज जाणून घेऊ या.

मित्रांनो, कोब्राचा फणा ही एक विशेष प्रकारची शारीरिक रचना असून नागाच्या मानेभोवती असलेल्या स्नायू आणि कशेरुकांद्वारे ती नियंत्रित केली जाते. कोब्राला धोका जाणवताच मान वाढवतो आणि त्याचाच फणा तयार होतो. या प्रक्रियेत सापाच्या कशेरुकांदरम्यान असणारी हाडे आणि स्नायू एकत्र काम करत एक सपाट, पसरलेला पृष्ठभाग तयार करतात.

हा फणा कोब्राच्या शरीराच्या इतर भागांपेक्षा पूर्णपणे वेगळा दिसतो. नाग फणा पसरवताच तेव्हा केवळ त्याचा आकारच वाढवत नाहीत तर समोरच्या प्राण्याला किंवा भक्ष्याला घाबरवण्यासाठी एक भयानक प्रतिमा देखील तयार करतात. म्हणजेच संरक्षणात हा फणा महत्त्वाची भूमिका बजावतो. एखादा शिकारी किंवा शिकार नागाजवळ येतो तेव्हा नाग फणा काढून इशारा देतो. आपण त्याच्यासाठी धोकादायक ठरु शकत असल्याचेच जणू तो सांगत असतो. नागाच्या फण्याचा आकार तो हल्ला करण्यास तयार असल्याचेही सूचित करतो. त्यामुळेच अनेक प्राणी आणि माणूसदेखील नागाला पाहून घाबरतात आणि त्याच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात.

इतर सापांच्या तुलनेत नागांकडे पाहिले तर आढळेल की त्यांचा आकार सर्वात वेगळा आहे. सामान्य सापांच्या शरीरात मान नसते तसेच त्यांचा शरीराचा आकार खूप लवचिक आणि साधा असतो. दुसरीकडे कोब्राच्या शरीरात एक कठीण आणि मजबूत भाग असतो जो त्यांना फणा तयार करण्यास मदत करतो. याशिवाय इतर साप वेग, विष किंवा आकाराद्वारे आपली ओळख तसेच धोका दर्शवून देतात परंतु कोब्रा आधीच फण्याद्वारे हा संदेश देतात. फण्यामुळे कोब्राची प्रतिमा अधिक भीतीदायक होते. खेरीज फणा मादी कोब्रासाठी आकर्षणाचे कारणही असतो. नर कोब्रा फणा पसरवतो तेव्हा त्याची शक्ती आणि आकारही प्रदर्शित करतो. त्यामुळे मादी कोब्रा त्याच्याकडे आकर्षित होऊ शकतात.

# घरीच करा सरबत

**झटपट रेसिपी**

उन्हाळ्यात थंड आणि ताजेतवाने होण्यासाठी सतत काहीतरी प्यावेसे वाटते ना... पण बाजारात मिळणाऱ्या कोल्ड्रिंक्समध्ये भरपूर साखर आणि अनेक हानिकारक घटक असतात. ते आरोग्यासाठी चांगले नसतात. अशावेळी तुम्ही घरीच एक खास शरबत बनवू शकता. ते केवळ चविष्टच नाही तर आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. चला तर मग, ते कसे करायचे ते जाणून घेऊ या.

मित्रांनो, बडीशेपमध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात हे तुम्ही जाणता. बडीशेप पचनक्रिया निरोगी ठेवते, पोटातील उष्णता कमी करते आणि शरीर थंड ठेवते. तेव्हा अशा या बडीशेपच्या सरबताने तुमची तहान भागतेच त्याचबरोबर उन्हापासून आरामही मिळतो. हे सरबत करण्यासाठी दोन टेबलस्पून बडीशेप, एक कप साखर, चार कप पाणी आणि थोडासा लिंबाचा रस तसेच बर्फाचे तुकडे हे साहित्य घ्या.




सर्वप्रथम पाणी आणि बडीशेप एका भांड्यात रात्रभर किंवा किमान चार-पास तास भिजत ठेवा. आता भिजलेल्या बडीशेपचा सर्व अर्क पाण्यात येईल. नंतर भिजवलेली बडीशेप मिक्सर किंवा ब्लेंडरमध्ये बारीक करुन घ्या. थोडे पाणी घालून घ्या आणि बडीशेपचे मिश्रण चांगले बारीक करा. आता स्वच्छ कापड किंवा चाळणी मिश्रण गाळून घ्या. यानंतर, बडीशेपचा जाड रस बाहेर येईल आणि साले वेगळी होतील. आता एका भांड्यात बडीशेपचा रस, साखर घाला आणि चांगले मिसळून गॅसवर ठेवा. साखर विरघळली की गॅस बंद करा आणि शरबत थंड होऊ द्या. थंड झाल्यावर त्यात थोडा लिंबाचा रस घाला. यामुळे शरबत चवदार होईल. हे स्वादिष्ट बडीशेप सरबत बर्फाचे तुकडे घालून पिता येईल.

## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) रक्ताभिसरण क्रियेचा शोध कोणी लावला?
२) राष्ट्रीय हक्क दिवस कधी असतो?
३) विजेचा सर्वात उत्तम वाहक कोण?
४) मौर्य काळातली प्रसिद्ध शैक्षणिक संस्था कोणती?
५) एनइएफटीचं पूर्णरूप काय?
६) सर्वात थंड ग्रह कोणता?
७) सर्वात छोटा खंड कोणता?
८) सर्वात मोठ्या पर्वतरांगा कोणत्या?
९) जगातला सर्वात उंच धबधबा कोणता?
१०) जगातलं सर्वात उंच धरण कोणतं?

उत्तर : १) विलियम हार्वे २) १० डिसेंबर ३) खारं पाणी ४) तक्षशिला ५) नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड्स ट्रान्स्फर सिस्टिम ६) नेपच्यून ७) ऑस्ट्रेलिया ८) अँडीज ९) अँजल(व्हेनेझुएला) १०) जिनपिंग १ (चीन)






# अंगभूत कौशल्ये वाढवा

**स्वयंविकास**

मित्रांनो, तुम्ही भरपूर अभ्यास करता. चांगले गुण मिळवता. पण फक्त पुस्तकी किडा असून भागत नाही. आपलं व्यक्तिमत्त्वही उठून दिसायला हवं. आपल्या अंगी काही कौशल्यं असायला हवीत किंवा अंगची कौशल्यं विकसित करायला हवीत. तुमच्या अंगी धीटपणा असायला हवा. यासाठी शाळेत तसंच सोसायटीत आयोजित होणाऱ्या स्पर्धांमध्ये सहभागी व्हा. वक्तृत्व, गायन, नृत्य, चर्चासत्र, विविध गुणदर्शनसारख्या स्पर्धांचं आयोजन केलेलं असतं. या स्पर्धांमध्ये तुम्ही सहभागी होऊ शकता. आंतरशालेय स्पर्धांचीही धूम असते. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी विशेष तयारी करावी लागते. या स्पर्धांच्या निमित्ताने तुम्ही इतर शाळेतल्या मुलांना भेटू शकता. तुमच्या मित्र-मैत्रिणींची संख्या वाढू शकते.

आंतरशालेय वक्तृत्त्व, गायन, नृत्य, वादविवाद, बुद्धीबळ अशाही स्पर्धा घेतल्या जातात. निबंध स्पर्धांचंही आयोजन केलं जातं. यातून तुम्ही तुमचे विचार मांडू शकता. वादविवाद स्पर्धेत भाग घेतल्याने भांडण न करता स्वतःचा मुद्दा पटवून देण्याचं कौशल्य तुम्ही अंगी बाणवू शकता. वक्तृत्त्व स्पर्धेत भाग घेऊन तुम्ही स्टेजची भीती घालवू शकता. एखाद्या खेळात प्रवीण असाल तर शाळेच्या संघात सहभागी होऊ शकता. बॅडमिंटन, टेनिससारख्या खेळांच्या स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकता. खो-खो, कबड्डीसारख्या खेळांसाठी शाळांचे संघ निवडले जातात. या संघांसाठीच्या निवड चाचणीत तुम्ही सहभागी होऊ शकता. अंगात चपळता असेल तर तुमची निवड होऊ शकेल. चित्रकला, हस्तकला येत असेल तर शालेय तसंच राष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धांमध्ये सहभागी होता येईल. शाळेतर्फे एखादं मासिक निघत असेल तर त्यात तुम्ही लिखाण करू शकता.

**ठिपके जुळवा**



**दोस्त हे मस्त**

### असा आहे टकिन



मित्रांनो, भूतान हा आपला शेजारी देश. या देशाबद्दल आपल्याला थोडीफार माहिती असायला हवी. म्हणूनच आपण या सुंदर देशातल्या एका मुक्या दोस्ताबद्दल जाणून घेऊ. या दोस्ताचं नाव आहे टकिन. टकिन हा भूतानचा राष्ट्रीय प्राणी. टकिन हा बकऱ्यांच्या प्रजातीचा प्राणी आहे. हे प्राणी साधारण २० जणांच्या कळपात राहतात. उन्हाळ्यात ३०० जणांचा कळपही तयार होतो. टकिन डोंगराळ तसंच गवताळ भागात आढळतो. अरूणाचल प्रदेश तसंच चीनमध्येही टकिन आढळतो.

**खादाडी**

### टेस्टी नूडल्स विथ चीझ

छोट्यांनो, नूडल्स तुम्हाला आवडतातच. पण एकाच प्रकारचे नूडल्स खाऊन कंटाळा आला असेल तर तुम्ही त्याला ट्विस्ट देऊ शकता. नूडल्स विथ चीझ ही रेसिपी तुम्हाला ट्राय करता येईल.



यासाठी एक कप नूडल्स, एक कप दूध, मीठ, अर्धा चमचा मिरपूड आणि चीझ असे पदार्थ घ्या. नूडल्स शिजवून घ्या. एका कढईत दूध गरम करा. मग त्यात चीझ घाला.नूडल्स घालून दूध आटवून घ्या. मग मीठ आणि मिरपूड घालून खा.

**टेक ग्यान**

### ही पद्धत धोक्याची...

बरेच जण लॅपटॉपवर काम करता करता मोबाईल चार्ज करतात. यासाठी चार्जरची वायर लॅपटॉपला जोडली जाते.



पण यामुळे मोबाईलमधली माहिती हॅक होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा प्रकारे मोबाईल चार्ज करण्याआधी थोडा विचार करा. शक्यतो लॅपटॉपला वायर जोडून मोबाईल चार्ज करूच नका.

**समाजभान**

### उत्सव असावे इको फ्रेंडली

दोस्तांनो, सण-उत्सवांचा आनंद लुटताना पर्यावरणाचं भान राखणंही गरजेचं असतं. अगदी छोट्या छोट्या बदलांनी आपण पर्यावरणाचा जागर करू शकतो.



आपल्याला थर्माकोलचा वापर टाळता येतो. देवाला वाहिलेली फुलं तसंच इतर निर्माल्य कलशात टाकता येतं. लाउड स्पीकरचा आवाज कमी ठेऊन ध्वनी प्रदूषण टाळता येतं.







# शौर्या, सैफची सुवर्ण धाव, स्वानंदीला रौप्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्राच्या धावपटूंनी शर्यतीत ७व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत ॲथलेटिक्समधील मुलींच्या १०० मीटर अडथळा शर्यतीत सुवर्णपदकाचा डबल धमाका केला. पहिल्या क्षणापासून आघाडी घेतलेल्या मुलींच्या गटात शौर्या अंभुरे व मुलांच्या गटात सैफ चाफेकर सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. प्रतिस्पर्धींनी धावपट्टी चुकविल्याने सातव्या स्थानावर असलेल्या महाराष्ट्राच्या स्वानंदी सावंतला रौप्य पदक बहाल करण्यात आले.

पाटलीपुत्र स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सोमवारपासून सुरू झालेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या धावपटूंनी पहिल्याच दिवशी धमाल केली. १०० मीटर अडथळा शर्यतीत पहिल्या क्षणापासून आघाडी घेतलेल्या शौर्या अंभुरे हिने १४.११ सेंकद वेळेसह सुवर्णपदक जिंकले. पश्चिम बंगालची सोनाली दास १४.६३ सेंकद वेळेसह तर केरळची विष्णूश्री एन. एस ही १४.६२७ सेंकद वेळेसह कांस्यपदकाची मानकरी असल्याचे घोषित करण्यात आले होते. या दोघींसह चौथ्या, पाचव्या च सहाव्या धावपटूंनी धावपटू चुकल्याने सातव्या स्थानावर असलेल्या स्वानंदी सावंतला पदक बहाल करण्यात आले.

मुलांच्या १०० मीटर अडथळा शर्यतीतही महाराष्ट्राच्या सैफ चाफेकरने १३.४८ सेकंदात शर्यत पूर्ण करून सुवर्ण कामगिरी केली. तामिळनाडूच्या आर सी अर्जूनने रौप्य तर झारखंडच्या एम डी साजीदने कांस्य पदकाचे यश संपादन केले. नवी मुंबई सराव करणाऱ्या सैफ हे खेलो इंडिया स्पर्धेतील हे पहिलेच पदक आहे. गत स्पर्धेत त्याला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले होते. यंदा सुसाट धाव घेत त्याने सुवर्णयशाला गवसणी घातली. सुवर्णपदक विजेती शौर्या अंभुरे ही आयपीएस अधिकारी अविनाश अंभुरे यांची मुलगी असून १० वीच्या परिक्षेत तीले ९० टक्के गुण संपादन केले आहे. ज्युनीयर आशियाई कांस्यपदक जिंकणाऱ्या शौर्याने पदार्पणातच खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्ण धाव घेतली आहे. ठाणे शहरात डॉ. अजीत कुलकर्णी यांचे तीला मार्गदर्शन लाभते.



## गुजरातला धक्का! बटलरशिवाय खेळावी लागणार प्लेऑफ



**नवी दिल्ली :** आजपासून सुरु होणाऱ्या उर्वरित आयपीएलमध्ये कोण कोण परदेशी खेळाडू खेळणार, हे आता निश्चित होत आहे. गुजरात टायटन्स संघाला प्लेऑफमध्ये हुकमी फलंदाज जॉस बटलरशिवाय खेळावे लागेल. त्याच वेळी कोलकाता संघातील इंग्लंडच्या मोईन अलीने भारतात न परतण्याचा निर्णय घेतला आहे. इंग्लंड आणि वेस्ट इंडीज यांच्यात २९ मेपासून व्हाईट बॉल क्रिकेटची मालिका सुरू होत आहे. बटलर आता कर्णधार नसला तरी तो इंग्लंडचा हुकमी फलंदाज आहे. गुजरातचा संघ सध्या गुणतक्त्यात पहिल्या स्थानावर आहे. ११ सामन्यांतून त्यांनी १६ गुणांची कमाई केलेली आहे, त्यामुळे प्लेऑफ त्यांच्यासाठी निश्चित आहे. शुभमन गिल कर्णधार असलेल्या या संघाचे दिल्ली कॅपिटल्स (१८ मे), लखनऊ (२२ मे) आणि चेन्नई (२५ मे) असे तीन साखळी सामने शिल्लक आहेत. या तिन्ही सामन्यांत खेळून बटलर मायदेशी रवाना होईल. उपलब्ध माहितीनुसार गुजरात संघाने प्लेऑफसाठी बटलरऐवजी श्रीलंकेच्या कुसल मेंडीसला करारबद्ध केले आहे. कोलकाता संघातून खेळणारा मोईन अली, जोफ्रा आर्चर (राजस्थान), सॅम करन आणि जेमी ओव्हरटन (दोन्ही चेन्नई) या इंग्लंडमधील खेळाडूंनी साखळी सामन्यांसाठीही भारतात न परतण्याचा निर्णय घेतला आहे. इंग्लंडचा लिएम लिव्हिंगस्टन आणि ऑस्ट्रेलियाचा टीम डेव्हिड बंगळूर संघात दाखल होत आहेत. मोईन अलीने दुखापतीमुळे माघार घेतल्याचे सांगण्यात येत आहे. वेस्ट इंडीजचा रोवमन पॉवेलही परतणार नसल्याचे कोलकाता संघाकडून सांगण्यात आले.

## जिम्नॅस्टिकमध्ये अनुष्का पाटीलचा डबल धमाका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रिदमिक प्रकारात पदकांची लयलूट केल्यानंतर सातव्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत मुलींच्या आर्टिस्टिक जिम्नॅस्टिकमध्ये महाराष्ट्राने पदकांचा धडाका कायम राखला. मुंबईच्या अनुष्का पाटीलने सुवर्ण आणि रौप्यपदक जिंकून दिवस गाजवला.



नवी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या आर्टिस्टिक जिम्नॅस्टिकमध्ये रौप्यपदक जिंकणाऱ्या मुंबईच्या १६ वर्षीय अनुष्काने बुधवारी तर कमाल केली. तिने अनइव्हन बार प्रकारात सुवर्णपदक जिंकले. शिवाय टेबलवॉल्ट प्रकारात ती रौप्यपदकाची मानकरी ठरली. याच प्रकारात मुंबईच्या सारा राऊळ हिने कांस्यपदक मिळवले.

अनइव्हन बार प्रकारात अनुष्काने १०.४३३ गुणांची कमाई करीत सुवर्णपदक जिंकले. अनुष्का ही विशाल कटकदौंड यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. ९.८३३ गुण घेणारी यजमान दिल्लीची स्नेहा तरिया रौप्यपदकाची मानकरी ठरली. तेलंगणाच्या निशिका अगरवालने (९.७००) कांस्यपदक मिळवले. महाराष्ट्राची उर्वी वाघ ९.०६७ गुण घेत चौथ्या क्रमांकावर राहिली.

टेबलवॉल्ट प्रकारात अनुष्काचे सुवर्ण केवळ ०.२३४ गुणांच्या फरकाने हुकले. तेलंगणाच्या निशिका अगरवाल हिने १२.३३४ गुण घेत सुवर्णपदक आपल्या नावे केले. रौप्यपदकावर समाधान मानावे लागलेल्या अनुष्काने १२.१०० गुण मिळवले. १६ वर्षीय सारा राऊळने ११.७०० गुण मिळवत कांस्यपदक आपल्या नावे केले. ती महेंद्र बाभुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. साराने आर्टिस्टिक जिम्नॅस्टिकमध्ये कांस्य जिंकले होते.

## ॲथलेटिक्समध्ये पदकाचा षटकार, महाराष्ट्राचा आदित्य वेगवान धावपटू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्राच्या धावपटूंनी ७व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत पदकांचा षटकार झळकवित दिवस गाजविला. स्पर्धेतील वेगवान धावपटूंचा मान महाराष्ट्राच्या आदित्य पिसाळने पटकविला. शौर्या अंबुरेने पदकाची हॅटट्रिक पूर्ण केली. ३ सुवर्ण, १ रौप्य व २ कांस्य पदकाची कमाई महाराष्ट्राने केली.

पाटलीपुत्र स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत मुलांच्या शंभर मीटर शर्यतीत आदित्य पिसाळला सुवर्ण, तर रूद्र शिनीला कांस्यपदक मिळाले. मुलींच्या गटात शौर्या अंबुरे हिने रौप्यपदकाची कमाई केली. ४०० मीटर शर्यतीत कशिश भगतने कांस्यपदक जिंकले. मुलींच्या १५०० मीटर शर्यतीत जान्हवी हिरूडकर सुवर्ण धाव घेतली.

मुलांच्या शंभर मीटर शर्यतीत महाराष्ट्राने दुहेरी धमाका केला.



आदित्य पिसाळने १०.६२ सेंकद वेळेसह सुवर्णपदकावर नाव कोरले, तर रूद्र शिनी याने १०.७८ सेंकद वेळेसह कांस्यपदक जिंकले. नवी मुंबईतील ठाणे जिल्ह्यातील हे दोघे खेळाडू श्रीनिवास गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. बिहारच्या पिन्स कुमारने १०.६४ सेंकद वेळेसह रौप्यपदकाला गवसणी घातली.

नागपूरच्या जानवी हिरूडकर हिने १५०० मीटर शर्यतीत ४ मिनिटे ३५.६९ सेंकद वेळेसह सुवर्णपदकावर नाव कोरले. दिल्लीची माही ४ मिनिटे ४२.८९ सेंकद वेळेसह रौप्यपदकाची मानकरी ठरली, तर कर्नाटकच्या प्रणाथी हिने ४ मिनिटे ४५.०८ सेंकद वेळेसह कांस्यपदक जिंकले.

मुलांच्या ४ बाय १०० मीटर रिले शर्यतीमध्येही महाराष्ट्राने सुवर्णपदकाला गवसणी घातली. आदित्य पिसाळ, अर्जून् देशपांडे, रूद्रा शिंदे व सैफ चाफेकर यांनी महाराष्ट्रासाठी सोनेरी कामगिरी केली.

अडथळा शर्यतीत सुवर्णपदक मिळविलेल्या शौर्या अंबुरे हिने मुलींच्या शंभर मीटर शर्यतीत १२.०२ सेंकद वेळेसह रौप्यपदकाची कमाई केली. हरयाणाची प्रिशा मिश्रा ११.८५ सेंकद वेळेसह सुवर्णपदकाची मानकरी ठरली, तर तिचीच सहकारी आरती हिने १२.०५ सेंकद वेळेसह कांस्यपदक जिंकले. १५ वषीय शौर्या अंबुरे ही गेल्या ९ वर्षांपासून अजित कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. सौदी अरेबियात झालेल्या युवा आशियाई स्पर्धेत कांस्यपदकाची कमाई केली होती.

मुलींच्या ४०० मीटर शर्यतीत नागपूरच्या कशिश भगत हिने ५६.८३ सेंकद वेळेसह महाराष्ट्राला कांस्यपदक जिंकून दिले. ती राम वाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. तमिळनाडूच्या इदविना जॅसन हिने ५५.९० सेंकद वेळेसह सुवर्ण, तर हरयाणाच्या दीपिकाने ५६.६६ सेंकद वेळेसह रौप्यपदक जिंकले.

## गंभीरने इंग्लंड दौऱ्यावर जाण्यापूर्वी घेतला बाप्पांचा आशीर्वाद



**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमिअर लीग २०२५ नंतर भारतीय क्रिकेट संघ इंग्लंड दौऱ्यावर पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी जाणार आहे. या दौऱ्यासाठीच्या संघाची घोषणा येत्या काही दिवसांत होणे अपेक्षित आहे आणि निवड समितीसोबतच्या चर्चेसाठी गंभीर मुंबईत आला आहे. यावेळी त्याने पत्नीसह दादर येथील सिद्धिविनायक मंदिरात बाप्पांसमोर नतमस्तक झाला. रोहित शर्मा व विराट कोहली यांच्या कसोटीतून निवृत्तीनंतर युवा संघांच्या जोरावर टीम इंडियाला इंग्लंडला भिडणार आहे. शुभमन गिल याची कर्णधारपदी निवड होण्याची दाट शक्यता आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२७ मधील टीम इंडियाची ही पहिलीच कसोटी मालिका असणार आहे. गंभीरच्या प्रशिक्षणाखाली भारतीय कसोटी संघाची कामगिरी काही विशेष राहिलेली नाही. नुकत्याच झालेल्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी २०२४-२५ मध्ये संघाला इंग्लंडविरुद्ध १-३ असा पराभव पत्करावा लागला. त्याआधी भारताला घरच्या मैदानावर न्यूझीलंडकडून ०-३ अशी हार पत्करावी लागली. सुधारीत वेळापत्रकामुळे आयपीएलचे सामने ३ जूनपर्यंत चालणार आहेत. त्यामुळे इंग्लंड दौऱ्यासाठी भारताचे खेळाडू केव्हा रवाना होतील, हा प्रश्न आहेच. भारताचा संघ अद्याप जाहीर केलेला नाही आणि २३ मे रोजी त्याची घोषणा होण्याची शक्यता आहे. गौतम गंभीर त्यानंतर पहिल्या बॅचसह ६ जूनला इंग्लंडसाठी रवाना होईल आणि त्यानंतर उर्वरित खेळाडू येतील.

## आयुषा, सुजयची सुवर्णपदकाला गवसणी; कुस्तीमध्ये दोन सुवर्ण, एक रौप्य, चार ब्रॉंझ पदक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पाटना :** महाराष्ट्राच्या खेळाडूंनी खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेतील कुस्ती या खेळामध्ये सात पदकांवर मोहर उमटवत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. मराठमोळ्या कुस्तीगीरांनी दोन सुवर्णपदकांसह एकूण सात पदकांची लयलूट केली. आयुषा गाडेकर व सुजय तनपुरे यांनी सुवर्णपदक जिंकून आखाडा गाजवला. या कुस्ती स्पर्धेत १८ पदकांची लयलूट करीत सर्वसाधारण उपविजेतेपदही महाराष्ट्राच्या संघाने पटकावले. मुलींच्या फ्री स्टाइल प्रकारातील ५७ किलो गटात वाशिमच्या आयुषा गाडेकरने अव्वल दर्जाच्या कुस्तीचे प्रदर्शन घडवत सुवर्णपदक पटकावले.



हरियानाच्या अंशुलविरुद्ध सुरुवातीपासून आयुषाने आक्रमक लढत दिली. ६-० गुणांनी आघाडीवर असताना एक मिनिटातच झोळी डावावर तिने अंशुलला चीतपट करीत मैदान गाजवले. मुंबईत साईच्या कुस्ती केंद्रात सराव करणाऱ्या आयुषाने पहिल्याच खेलो इंडिया स्पर्धेत पदक पटकावण्याची किमया करून दाखवली. १५ वर्षांखालील आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या आयुषाने लौकिकाला साजेसा खेळ करीत सुवर्ण कामगिरी केली.

फ्री स्टाइलच्या ७१ किलो गटात आहिल्यानगरच्या सुजय तनपुरेने चंडीगडच्या सुशांत वशिष्ठला ६-० गुणांनी मात करीत पदार्पणातच सुवर्णयशाला गवसणी घातली. पहिल्या फेरीत २-० गुणाने आघाडी घेत सुजयने आपले वर्चस्व दाखवले. मुलांच्या ग्रीको रोमन प्रकारातील ६० किलो गटात कोल्हापूरच्या ऋषिकेश नाईक याला चुरशीच्या अंतिम फेरीत दिल्लीच्या प्रांजल दाहियाकडून पराभूत व्हावे लागले.

## ४ जागांसाठी ७ संघ शर्यतीत; उद्यापासून सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध कोलकाता नाइट रायडर्स यांच्या लढतीने इंडियन प्रीमिअर लीग २०२५ पुन्हा सुरू होतेय. इंडीया-पाकिस्तान वॉरमुळे लीग आठवड्यासाठी स्थगित केली गेली होती. पण, शनिवारी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर लीग पुन्हा नव्या दमाने खेळण्यासाठी सज्ज झाली आहे. पण, आता प्ले ऑफच्या गणितांचीही जुळवाजुळव सुरू झाली आहे. सनरायझर्स हैदराबाद, राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्स हे तीन संघ प्ले ऑफच्या शर्यतीतून बाद झाले आहेत, परंतु ४ जागांसाठी ७ संघ अजूनही शर्यतीत आहेत.

चेन्नई सुपर किंग्सने १२ पैकी ३, राजस्थान रॉयल्सने १२ पैकी ३ ,तर सनरायझर्स हैदराबादने ११ पैकी ३ सामने जिंकल्याने ते प्ले ऑफच्या शर्यतीतून बाद झाले आहेत. पण, या संघांच्या निकालांवर इतरांचे गणित अवलंबून आहे. सीएसकेला उर्वरित सामन्यांत राजस्थान ( २० मे) व गुजरात टायटन्स ( २५ मे) यांच्याशी सामना करायचा आहे. गुजरातने हा सामना गमावल्यास त्यांना फटका बसू शकतो. राजस्थानला पंजाब किंग्स ( १८ मे) व चेन्नई सुपर किंग्स ( २० मे) यांच्याविरुद्ध खेळायचे आहेत आणि पंजाबच्या सामन्यावर सर्वांचे लक्ष असणार आहे.

## टीम इंडियाच्या कसोटी कर्णधारपदासाठी तिसरा 'भीडू' शर्यतीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली:** टीम इंडियाचा माजी कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी अनुक्रमे ७ आणि १२ मे रोजी कसोटीतून निवृत्ती जाहीर केली. त्यांच्या निवृत्तीमुळे संघात नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे. रोहित ४ वर्ष टीम इंडियाचा कसोटी कर्णधार होता, तर कोहलीच्या नेतृत्वाखाली संघाने ८ वर्षांत परदेशात १५ कसोटी सामने जिंकले. आता भारतीय संघ पुढील महिन्यात इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे आणि त्यासाठी लवकरच संघ जाहीर होण्याची शक्यता आहे. याचवेळी टीम इंडियाचा नव्या कसोटी कर्णधाराचीही घोषणा होईल.

संघात जसप्रीत बुमराह, लोकेश राहुल, मोहम्मद शमी आणि रवींद्र जडेजा हे काही वरिष्ठ खेळाडू उरले आहेत. राहुल आणि बुमराह यांना कर्णधारपदाचा अनुभव आहे. त्याच वेळी संघ व्यवस्थापन शुभमन गिल आणि ऋषभ पंत या युवा खेळाडूंचाही कर्णधार म्हणून विचार करत आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर बुमराहने २ कसोटी सामन्यांमध्ये कर्णधारपद भूषवले होते आणि पर्थमध्ये संघ जिंकलाही होता. सिडनी कसोटीच्या पहिल्या डावात बुमराहला दुखापत झाली आणि त्याने पाठीच्या दुखापतीमुळे माघार घेतली. भारत दुसऱ्या डावात दबाव निर्माण करू शकला नाही आणि सिडनी कसोटी ऑस्ट्रेलियाने जिंकली.



बुमराहला अनेकदा तंदुरुस्तीचा त्रास सहन करावा लागला आहे, २०२२ मध्ये दुखापतीमुळे तो सुमारे १५ महिने क्रिकेटपासून दूर होता. पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेदरम्यान त्याच्यावरील वर्कलोडचा विचार करणे आवश्यक आहे आणि अशात त्याला १-२ सामन्यांसाठी विश्रांती देणे देखील महत्त्वाचे आहे.

### फॅफ ड्यू प्लेसिस अन् डोनोव्हन फरेरा यांचा भारतात येण्यास नकार

## स्टार्कनंतर दिल्लीला आणखी दोन धक्के!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उद्यापासून म्हणजेच शनिवारपासून इंडियन प्रीमियर लीग पुन्हा सुरू होणार आहे. मात्र, त्यापूर्वी दिल्ली कॅपिटल्सला मोठा धक्का बसला आहे. मिशेल स्टार्कनंतर आता फाफ डू प्लेसिस आणि डोनोव्हन फरेरा यांनीही उर्वरित आयपीएलमधून माघार घेतली आहे. त्यामुळे दिल्लीला प्लेऑफसाठी बराच संघर्ष करावा लागण्याची शक्यता आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्टार्कनंतर दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार फाफ डू प्लेसिसने आयपीएलमधून माघार घेतली आहे. डू प्लेसिसने यंदाच्या हंगामाच्या सुरुवातीला चांगली फलंदाजी केली. मात्र, दुखापतीमुळे तो काही सामने खेळू शकला नाही. त्याने 6 सामन्यांत 128 च्या स्ट्राइक रेटसह 168 धावा केल्या, यामध्ये 2 अर्धशतकांचा समावेश आहे. तर



डोनोव्हन फरेराला एका सामन्यात इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळण्याची संधी मिळाली, परंतु त्याला म्हणावा तसा प्रभाव पाडता आला नाही.

फाफ डू प्लेसिसच्या अनुपस्थितीमुळे दिल्लीसमोर सलामी फलंदाजांचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. यापूर्वीच जेक फ्रेझर-मॅकगर्कनेही आयपीएलमधून माघार घेतली आहे. त्यामुळे सलामीला कोण येणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दिल्लीला आणखी तीन सामने खेळायचे आहेत, अशा वेळी अभिषेक पोरेलसह करुण नायर किंवा केएल राहुल सलामीला येण्याची शक्यता आहे. दिल्लीने जेक फ्रेझर-मॅकगर्कच्या जागी बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला संघात सामील करून घेतले आहे. मात्र, तो भारतात येणार की नाही, याबाबत अद्याप अनिश्चितता आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाकडून त्याला परवानगी मिळाली नसल्याची माहिती आहे. दक्षिण आफ्रिकेचा युवा खेळाडू ट्रिस्टन स्टब्स उर्वरित आयपीएलसाठी भारतात परतणार आहे. मात्र, तो केवळ साखळी सामने खेळणार आहे.

#रा